

# मनसोक्त

डॉ. स्मिता दामले

# मनसोक्त

डॉ . स्मिता दामले

ई साहित्य प्रतिष्ठान

# मनसोक्त ( ललित )

डॉ. स्मिता दामले

smitasuhas67@rediffmail.com

suhasdamle341@hotmail.com

Mobile: 9867364634

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

या पुस्तकात व्यक्त केलेली मते व नोंदी ही लेखिकेची असून प्रकाशक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.

प्रकाशन : १९ फ़ेब्रुवारी २०१७ (शिवजयंती)

©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. स्मिता दामले



ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. हिंमते मर्दा. मददे खुदा. किंवा हल्लीच्या भाषेत सांगायचं तर सच्ची लगन हो तो अपने सपने हासिल करनेके लिये सारी कायनात एक हो जाती है. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. या आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया. त्याचबरोबर दर्जेदार लिखाण करणारे लेखकही या चळवळीत जोडले जात आहेत. डॉ. स्मिता दामले या त्यातीलच एक. "सुर्यपुत्र लोकमान्य" हे लोकमान्य टिळकांचे एक वेगळया अंगाचे, त्यांच्या मानवी कंगोऱ्यांचे दर्शन घडवणारे चरित्र, "रक्षा" हा रक्षा या शब्दाच्या विविध अर्थांतून निर्माण होणाऱ्या कथांच्या संग्रहानंतर त्यांनी कलाटणी हे भारताच्या हजारो वर्षांच्या भव्य इतिहासाचे मिनिएचर दर्शन घडवणारे

पुस्तक लिहीले. अशा पुस्तकांनी ई साहित्य चे पुस्तक संग्रहालय समृद्ध होत आहे. आज त्यांचे “मनसोक्त” हे वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर उमटलेल्या तरंगांचे पुस्तक आम्ही प्रकाशित करत आहोत. ई साहित्य तर्फ़े डॉ. स्मिता दामले यांचे हे चौथे पुस्तक. चारही पुस्तके वेगवेगळी आणि तरीही एकाच धाग्यातली. तो धागा म्हणजे इतिहास.

डॉ स्मिता दामले यांना  राजकारणाची आवड असल्यामुळे आजवर इतिहासाचा अभ्यास करून त्यातच लेखन केलं. इतिहास म्हणजे पूर्वकालीन सत्ताधीशांच्या यशापयाशाची कहाणी. इतिहास विषयातच त्यांनी Ph.D केलं. इतिहास वाचत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे १७ व्या आणि १८ व्या शतकातील उत्तर भारतातील राजकारणावर आणि शिंदे-होळकर-मोगल आणि थोरले बाजीराव यांच्यातील सत्तेच्या रस्सिखेचावर विपुल लेखन लिहिलं गेलं आहे. पण १८ व्या शतकात दक्षिण भारतात मोठं राजकारण खेळणाऱ्या संभाजी पुत्र शाहू, पेशवाईचे संस्थापक बाळाजी विश्वनाथ, हैदर अली, त्याचा  पुत्र टिपू सुलतान आणि या सर्वांचा लढा झाला  त्या प्रबळ इंग्रजांवर मराठीत लेखन झालेलं नाही. म्हणून मनोव्यापाराच्या आधाराने, कादंबरी अंगाने, इतिहास मांडणारं लेखन त्यांनी अभ्यासपुर्वक केलं. ते लेखन म्हणजे, शिवरायांच्या पश्चात संभाजी-राजाराम-शाहू या त्यांच्या तीन वारसांचा आणि पेशवाई शतकाची स्थापना करणाऱ्या बाळाजी विश्वनाथ- पुत्र बाजीराव - आणि नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीचा, बाजीरावांच्या

मातोश्री राधाबाई ज्यांनी ७५ वर्षाचं दीर्घायुष्य मिळाल्यामुळे राजकारण फार जवळून पाहिलं त्यांना  नायिका करून इतिहास सांगणारी " मातोश्री" ही कादंबरी.

त्यानंतर त्यांनी मिरजेचे सरदार पटवर्धन  यांच्या घराण्याचा इतिहास मांडणारी " उदयास्त " ही कादंबरी लिहीली.

त्यांनी लिहीलेलं " मी टिपू सुलतान " हे टिपू सुलतानचं राजकीय आणि व्यक्तिगत चरित्र नुकतंच प्रसिध्द झालं आहे.

त्यांनी आजवर लिहीलेल्या इतिहासावरील पुस्तकांना नामवंत प्रकाशकांनी मानधनासहित प्रसिद्धी दिली. वाचकांची उदंड पसंती त्यांना मिळाली. अशा वेळी ई साहित्य ही संस्था कोणतेही धन देत नसताना त्यांनी आपली चार मौल्यवान पुस्तकं ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य द्यावीत यातच त्यांची खरी ओळख होते.

ई साहित्य डॉ. स्मिता दामले यांची कायम ऋणी राहील.

**टीम ई साहित्य**

# अर्पण पत्रिका

संत कबीरजी म्हणतात...

सबद सबद हर कोई कहे। सबदके हाथ न पांव।
एक सबद औसुध करे। एक सबद किनी घाव।
(शब्दांना भले हातपाय नसतील, पण एक शब्द औषधाचं, मलमाचं काम करतो, तर एक घाव करणाऱ्या शस्त्राचं)

ज्या माध्यमांनी मनात विचारांचा कल्लोळ माजवला त्या शब्दांनाच हे लेखन समर्पित.

---डॉ. स्मिता दामले

# मनोगत

रोजचं वर्तमानपत्र सकाळीच चहाबरोबर वाचणे हा आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे. विविध विषयातील छोट्या छोट्या बातम्यांनी जगाबरोबर राहणं त्यामुळे सहज शक्य झालं आहे. कितीतरी बातम्यांवरून नुसती नजर फिरते. काही बातम्या मनात रुततात. काही बेचैन करतात. काही विचारशक्तीला गती देतात. एखादं कपाट आवरायला काढावं तशा अनेक आठवणी त्यादिवशी मनातून बाहेर पडतात.

मनात आलेलं मग लिहावसं वाटतं. प्रस्तुतचे लेख हे असेच लघुनिबंध आहेत. विज्ञान, वर्तमान, इतिहास, यांचा त्यांना संदर्भ आहे. एकेक लेख अनेक छोट्या छोट्या बातम्यांचे कोलाज आहेत.
सर्वांना आवडतील अशी आशा आहे.

डॉ.स्मिता दामले.
३०३, सुकल्याण,
२९, आयडीयल कॉलनी,
कोथरुड,
पुणे ४११०३८
Email :- Suhasdamle341@hotmail.com

Smitasuhas67@rediffmail.com

Mobile :- 9867364634.

# मनसोक्त

# ओंजळ.

युगं सरली. शकं संपली, संवत्सरं मागे पडली.

येशू ख्रिस्ताच्या मृत्यूलाही वीस शतकं होऊन गेली. काळाच्या ओंजळीतून विसाव्या शतकाच्या अनंत क्षणाची वाळूची एक मूठ रिती झाली. या क्षणांमधे काही क्षण रक्त गोठवणारे, काही क्षण चमकवणारे, काही भुलवणारे, काही थिजवणारे, काही खुलवणारे.

संपलेलं शतक वेगळंच.

www.com या तीन अक्षरांनी आणि एका लहान ठिपक्यांनी जगाचा गोल गर्रकन फिरवला. शतक संपता संपता हे डब्ल्यू.डब्ल्यू.डब्ल्यू शब्द पृथ्वीला व्यापून गेले. यांनी नव्या युगाचा पाया घातला. जुन्या भिंती धाडधाड कोसळल्या. त्यांनी इतिहास बदलला, भूगोल बदलला, विज्ञान- वैज्ञानिक, कुटुंब-कुटुंब व्यवस्था, समाज-व्यापार उद्योग, सारं विश्वच बदललं. जगाचा चेहराच बदलून टाकणारी ही तीन अक्षरं म्हणजे प्लास्टीक सर्जरी करून माणूसच बदलून टाकण्याची किमया करणारी मूळाक्षरं.

W. वर्ल्डवॉर. या पहिल्या मूळाक्षराने दोन जागतिक महायुध्दं घडवली. शतकाच्या सुरूवातीचा एक डबल्यू.

W. विन्स्टन चर्चिल यांचा. त्यांनी दोस्तराष्ट्रांचा विजय मिळवून जगाचा भूगोल – इतिहास, नकाशा बदलला.

W. शतकाच्या अखेरीच्या काळात विल्यम गेट्सच्या विंडोज् ने तर क्षणात जग एकत्र येईल अशी किमया केली. मारुततुल्य वेगम् हे वाक्य खोडून काढलं.

हिटलर आणि चर्चिल यांच्या मुष्टीयुध्दात-गुद्दागुद्दीत भारत मात्र स्वतंत्र झाला. हे स्वातंत्र्य हिटलरमुळे की चर्चिलमुळे हा न संपणारा विषय. लोकशाही संकल्पनेने भारलेला भारत देश उदयाला आला. शतकानुशतके लहान लहान संस्थानिकांमधे वाटला गेलेला हा देश उपखंड नावाने ओळखला जायला लागला. हसू आणि आसूचं दुःख मनात बाळगून नेहरू-पटेल-देश चालवू लागले. सुभाषचंद्रांचा आणि महात्मा गांधीचा अनपेक्षित अंत भारतीयांना चटका लावून गेले. असं का होतं ? दरोडेखोर आणि दहशतवादी एकीकडे आणि मार्टिन ल्युथर किंग, गांधीजी, केनेडी यांचेही मृत्यू बंदुकीच्या गोळीनेच व्हावेत ? उद्योग-व्यापार-शिक्षण-तंत्रज्ञान-विज्ञान साऱ्यातच भारत बाळसं धरायला लागला. टाटा-बिर्ला-किर्लोस्कर अशा अनेकांनी उद्योग विस्तारायला सुरुवात केली.

याच विसाव्या शतकाच्या सुरुवातीला विमानाची घरघर पंख पसरून आकाशाला गवसणी घालू लागली. जग क्षणात इकडून तिकडे हिंडायला लागलं. जग जवळ आलं. तरुण कामासाठी जगभर हिंडायला लागले. विमानाचा शोध लागून वर्षं झाली आणि त्यातून जन्मला रडार. रडारचा शोध लावणारे शास्त्रज्ञ स्पेन्सर रडारमधल्या मॅग्नेट्रॉनच्या जवळ उभे असतांना त्यांच्या लक्षात आलं की या मॅग्नेट्रॉनमुळे त्यांच्या खिशातलं चॉकलेट विरघळलं आहे. त्यातून जन्मला मायक्रोवेव्ह. आज घराघरात अन्न गरम करून देण्याचं अन्नपूर्णेचं काम करणारा मायक्रोव्हेव्ह, त्याची ही जन्मकथा आहे.

अनुभव क्षेत्र विस्तारायला लागले. जगभरचे कपडे, चेहऱ्याला लावायची लोशनस्, क्रीमस्, जगभर कुठेही मिळायला लागली. अनेक देश जगभरच्या नागरिकांचे मेल्टींग स्पॉट झाले. जातीपातीच्या, आंतरजातीय विवाहांच्या शृंखला गळून पडायला लागल्या. अमेरिका सरळ चंद्रावर पोचलेली पाहून पत्रिकेतील चंद्र बघणारे गोंधळले. कल्पना चावला..आपल्या देशाला अभिमान वाटावा अशा एका भारतीय मुलीने अवकाशात जाण्याची उंची गाठली पण परत येतांना वाटेतच तिचा अंत झाला. अंतराळक्षेत्रात भारत पुढे गेला.

याच शतकात टेस्टट्यूब बेबीचा जन्म झाला. आधुनिक द्रोणाचार्य मातेच्या उदराबाहेर जन्माला आला. साठ वर्षाच्या महिलेला अपत्यप्राप्ती होणं हे केवळ मानवाने आपल्या मेंदू नावाच्या

एका छोट्याशा मूठभर मांसाच्या गोळ्याने साध्य करून दाखवलं. पुत्रप्राप्तीसाठी पुरुषाशी संबंध येणं गरजेचं राहिलं नाही. शुक्रजंतू विकत मिळायला लागले. त्याच्याही बँका निघायला लागल्या. मग ‘‘ पप्पा सांगा कुणाचे ‘‘ ह्या गाण्याला अर्थ राहिला नाही. डी.एन.ए. टेस्टने नाती ओळखण्यात क्रांतीच आणली.

समलिंगी विवाहांना मान्याता मिळाली. आपली मुलं सून आणि मुली जावईच घरात आणतील याची शाश्वती राहणार नाही. कुणास ठाऊक! एखाद्या पुरुष दांपत्याला मूल होण्याची सहजसुलभ भावना निर्माण झाली तर गर्भाशयाशिवाय उदराच्या पोकळीत बाळ वाढेल आणि अपत्यप्राप्तीचा आनंद त्या जोडप्याला मिळेल. आज मुलगी झाल्यावर कष्टी होणारे आणि मुलगा होईपर्यंत बायकोला छळणारे पुरुष या प्रसूती वेदनांचा अनुभव घेतल्यावर एकाच मुलावर थांबतील. किडनी-लिव्हर-डोळे-हृदय यांच्या रोपणातून सर्व अवयव स्वतःचेच असणारा माणूस दुर्मिळ होत जाईल. ह्या अवयवांच्या आदान-प्रदानांमुळे परलोकी जीव गेल्यावर त्यांच्या अवयवांचा हिशेब ठेवण्याचं कर्मकठीण काम चित्रगुप्ताला फार कठीण जाईल. हा मूळचा कायस्थ असणार. कारण कायस्थ लोक हिशेब ठेवण्यात फार पटाईत. हा चित्रगुप्त म्हणजे दोघे चित्रे आणि गुप्तेच असण्याची शक्यता नाकारता येत नाही. चित्रगुप्त हा आपला संगीतकार वेगळा, तो हा नव्हे.

कॅमेरा या शब्दाने तर भुताटकी वाटावी असा मन दडपणारा अनुभव दिला. एकोणिसाव्या शतकात युरोपातील काही संशोधक कॅमेराचा शोध लावण्यात दंग होते. पहिलं यश आलं ते पॅरिसच्या एमिल रेनॉड याला. पंधरा मिनिटं चालणारी फिल्म त्याने बनवली. पॅरिसमधील लोकांना ती फिल्म दाखवत हिंडायला लागला. त्यात मोठी भर घातली ती थॉमस अल्वा एडिसनने! नवीन शतकारंभापर्यंत चलत् चित्रांच्या दुनियेत मोठीच क्रांती झाली. अमेरिकेतील इस्टमन नावाच्या संशोधकाने पहिली फिल्म बनवली आणि पाठोपाठ प्रोजेक्टर- मूव्ही कॅमेरा रिळं यांची गाडी जोरात धावू लागली. इ. स. १९०३ मधे पहिला सिनेमा बनला –

द ग्रेट ट्रेन रॉबरी.

मग आला मूक चित्रपटांचा जमाना. ग्रिफिथ नावाच्या वैज्ञानिकाने आपला ठसा या चित्रपटसृष्टीवर उमटवला. १९१० च्या जवळपास सिनेमा बनवण्याचा ध्यास घेतलेले तरूण

कॅलिफोर्नियात जम बसवण्यासाठी जमू लागले. विपुल निसर्गसपत्ती आणि स्वस्तातील मजूर या दोन टेकूंमुळे कॅलिफोर्नियात चित्रपटांना बहर आला. त्यातूनच विकसित झाली हॉलीवूड नगरी. ग्रिफिथपासून फुटलेल्या मॅक सेनेटने स्वतःची चित्रपट कंपनी स्थापन केली. कीस्टोन कंपनी. . .त्याला जो हिरा मिळाला त्याचं नाव चार्ली चॅप्लीन. . .जगातील पहिली सिने नायिका ठरली ग्रेटा गार्बो..सिनेसृष्टी अनेक अंगांनी बहरू लागली. कार्टून फिल्मस्, बोलपट, रंगीत चित्रपट, या भिंती तिने धडाधड ओलांडल्या. भारतात सिनेसृष्टीचा पाया घातला तो दादासाहेब फाळक्यांनी. अनेक गंधर्व अप्सरा, यांनी आपली सिनेनगरी सजली. रेडियो तर गावागावात, घराघरात, ऑफीसमधे शिरला. खेड्यापाड्यातील लोकांना घरबसल्या ज्ञानाची, जगाची ओळख व्हायला लागली. रेडियोवरच्या ज्ञानगंगेने करमणूक, विज्ञान, आरोग्य, शारीरिक विज्ञानाची ओळख व्हायला लागली. रेडियो-ट्रान्झिस्टर- रेकॉर्ड प्लेयर –कॅसेटॅ-सिडी अशी प्रगती होता होता यंत्र लहान लहान होत गेलं.

फोनचा शोध आधी लागलाच होता. एकमेकांशी घरबसल्या बोलणं सोपं झालं. जाण्यायेण्यात वेळ घालवायला नको, आलेल्या पाहुण्याला चहा करायची कटकट नको, सगळं सोपं झालं बघता बघता फोन घराघरात शिरला. शतकाच्या उंबरठ्यावर मानव उभा असतांना जग लहान करण्याच्या मोबाईलचा शोध म्हणजे उत्क्रांतीच होती. यंत्र लहान होत गेलं आता खिशात राहिलसं झालं आणि रस्त्याने चालतानाही मोबाईल फोनवर बोलणं सोपं झालं. जुन्या काळी रस्त्याने एकट्याशी बोलत जाण्याचा हक्क फक्त वेड्या माणसाला होता. त्याचा तो हक्क शहाण्याने हिरावून घेतला. हॉटेलात जेवायला येणाऱ्या कुटुंबातला प्रत्येकजण आपापल्या मोबाइलकडे बघत बसायला लागला. ॐ सहना ववतु । सहनौ भुनक्तु । हा मंत्र अंधुक झाला.

आता तर कॅमेरा आणि फोन एकत्र झालेत. त्याचा गैरफायदा घेणारेही लगेच कामाला लागले.. त्यातही विवेकाला जागा राहिली नाही. रोमन हॉलिडे आठवतोय? ग्रेगरी पेकच्या मित्राकडे एडी आल्बर्टकडे सिगारेट लायटरमधे बसवलेला कॅमेरा होता. राजकन्येचे त्याने गुपचुपपणे काढलेले फोटो तिला परत केले.. त्याचा गैरवापर केला नाही, मग आत्ताच लोकांची नीती अशी का भ्रष्ट झाली? स्टींग ऑपरेशनला उत का आला?

संगणकाचा जन्म झाला आणि अरेबियन नाईटस् मधल्या दिवा घासल्यावर बाहेर येणाऱ्या भूतासारखा हात जोडून उभा राहायला लागला. माणसाला जगभरची बातमी क्षणात पुरवू लागला. बिल गेटससाख्या संशोधकांनी सर्व जगाच्या खिडक्या उघडून दिल्या.

शतकाची मूठ संपत आली. शतकाच्या सुरूवातीला असलेला सुवर्णकाळावरचा रंग खरवडला जायला लागला. सिनेसंगीताचा बहर ओसरला. देशभक्ती-अंगाई-बहिणभावावरची गाणी सिनेमातून हद्दपार झाली. निरनिराळ्या तत्वज्ञानाने भारलेले पक्ष धोरण विसरले, फक्त सत्तेच्या विळख्यात अडकले. सोशालिझम्-कम्युनिझम-कॉँग्रेस, सगळे इझम्स विटक्या रंगांचे झाले. भ्रष्टाचार बोकाळला. चावडीवर, बागेमधे- नदीकाठावर-इमारतीच्या अंगणात लोकांचा जो गप्पांचा फड रंगत असे तो संपला. सर्वजण संध्याकाळी टी.व्ही.समोर बसायला लागले. बातम्यांच्या भडिमारात अडकले.

वर्तमानपत्राचं स्वरूप बदललं. अनेक क्षेत्रात काम करून अनुभव गाठीला बांधणाऱ्या प्रत्येकाला आपला अनुभव लिहायची संधी मिळायला लागली.

प्रत्येकजण मनसोक्त लिहायला लागला...मनात आलं म्हणून!

# स्रोत.

लख्ख, शुभ्र हिमनग, निळेभोर नभ, कृष्ण-धवल मेघांचे पुंजके, हिमथरांना स्पर्शून जाणारा बोचरा वारा, आपल्याच नादात खुळखुळत पुढे सरकणारे अल्लड, आरस्पानी जलप्रवाह, त्यांच्या उरावरचं विलोभनीय नभनीळ उत्तरीय, नभाशी सलगी करू पाहणारी, भव्य, हृदय दडपून टाकणारी शिखरं, औषधी वनस्पतींचं जन्मस्थान, लखलखता दिवस, श्यामल संध्याकाळ. काळीकुट्ट रात्र, क्षणात बोचरे वारे, क्षणात पातळ-नितळ-कोमल हिमअभ्रक. सूर्यप्रकाशात चकाकणारा बर्फ. धाप लागणारा चढ. डोळे खिळवणाऱ्या खोल दऱ्या. भूस्खलन. विरळ प्राणवायु. रात्रीच्या अंधारात कुणाकुणाला भेटणारा यती. हिमालयाच्या कुशीत हा असा सारा निसर्ग मुक्त होतो.

बलदंड देवदार, पायदळीची नाजूक फुलं, मानव आपल्या इवल्याशा नेत्रबिंबात साठवतो. मूठभर हृदयात सामावतो. कर्तृत्ववान, तेजस्वी पुरुषासमोर आपण नतमस्तक होतो, तसं हिमालयासमोर आपण मूक-स्तब्ध होतो. मग मनात स्त्रवायला लागतं सरस्वतीपुत्र कालिदासाचं मेघदूत. कालिदासाचं मेघदूत सर्वसामान्यांपर्यंत पोचवण्याचं काम पहिल्यांदा केलं ते कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी. हा मेघ काळाभोर आहे. कैलासावर पोचून उतरणीला आला की खांद्यावर काळी वस्त्रे घेतलेल्या गोऱ्या बलरामाची आठवण करून दिल्याशिवाय राहात नाही असं कालिदास म्हणतो.

गेला असेल का कालिदास हिमालय बघायला? कुमारसंभवात हिमालयाशिवाय काहीही न लिहिणारा कालिदास शास्त्र, नाट्य, चित्र, शिल्प, या सर्वावर त्याच्या ज्ञानाचा ठसा उमटवत, लिहीत गेला, पण स्वतःबद्दल न लिहिता गेला. हिमालय त्याने पाहिला की नाही हे न सांगता गेला. तसं तर महाभारत लिहिणाऱ्या व्यासमुनींनी आणि गणपतीने तरी आपण कुठल्या लिपीत हे लिहितोय हे तरी कुठे सांगितलं? ‘‘ आषाढस्य प्रथम दिवसे ’’ ही मेघदूतातली ओळ अजूनही आषाढात प्रत्येकाच्या मनात उमटून जातेच. कृष्णशास्त्री चिपळूणकर, सी.डी. देशमुख,

शांताबाई शेळके, कुसुमाग्रज, अशा भल्याभल्यांना या काव्याचं समश्लोकी रूपांतर करण्याचा मोह आवरता आला नाही.

सी.डी देशमुखांनी अनुवाद केला,

‘‘ आषाढाच्या प्रथम दिनी तो मेघ शैलाग्रि पाहे ।

दन्ताघ्रातिं तटिं गज कुणी भव्य खेळताहे ।।

कुसुमाग्रजांनी लिहिलं, ‘‘ आषाढाच्या प्रथमदिनी ।

त्या दिसे पर्वतावरी नयनरम्य घन ।

करी कड्यांवर गज या क्रीडांगण ।

हिमालय! हे रुद्राचं वसतिस्थान. हिमालय आणि मेना या दांपत्याची कन्या पार्वती हिचं जन्मस्थान. गणेश आणि कार्तिकेयाचं बाललीलांचं स्थान. देहातली उर्जा आटल्यावर, षड्रसांच्या लीला भोगल्यावर सारे भोगी वानप्रस्थासाठी हिमालयाचा मार्ग आक्रमत. ज्या देशाचे राजे होतो त्याकडे पाठ फिरवून हिमालयाच्या पायथ्याशी विरक्तीचा अनुभव घेत विसावत.. आपला हिमालय असा तपस्व्यांचा- वानप्रस्थांचा.

या हिमालयाच्या सप्तकन्या म्हणजे गंगा-यमुना-सतलज-सिंधू-चिनाब-रावी-झेलम.गंगोत्री, जमनोत्री, अनंतनाग, इथल्या जलकुंडांच्या पाळण्यामधल्या त्या सरिता, जग बघायला निघतात. काठांवरचं जीवन तृप्त करत, स्थूलरूप धारण करत, आता पूर्वीसारखं जलद वाहाणं जमत नाही असं म्हणत सागरात विलीन पावतात. उगमापासून निर्माण झालेले हे झरे अखंडपणे स्त्रवत ठेवणं ही विधात्याची लीला. असे झरे आणि असे स्त्रोत सजीव कुंडांमधूनही विधाता पाझरवतो. कंठातून अखंड स्वरप्रवाहाला भीमसेन जोशी म्हणतात, वाणीतून ज्ञानगंगा प्रसवणाऱ्या जीवंत प्रपातांना तुकोबा-ज्ञानोबा म्हणतात, वीररसाचे अग्निद्रव्य ज्या धगधगत्या कुंडात

साठतं त्याला शिवराय-राणा प्रताप-सुभाषचंद्र बोस म्हणतात. पदन्यासाच्या चक्राला गोपीकृष्ण, श्वासातून सुरांचे मळे शिपंडणाऱ्या सूरकुंडाना बिसमिल्ला, पन्नालाल घोष म्हणतात. यांच्या काठावर स्वर्गीय आनंद लुटणारा रसिक, ईश्वराचा साक्षात्कार अनुभवत विसावा घेत असतो.

त्याउलट पाश्चिमात्य देश. आपला हिमालय. त्यांचा आल्प्स्. इटालीतून सुरू झालेल्या या पर्वतरांगा जर्मनीत संपतात. मनस्वी कुतूहल आणि धाडस यांच्या जोरावर तिथल्या मुलांनी बर्फाळ वाट तुडवायला सुरुवात केली. अनुभवाच्या शिदोरीतून गिर्यारोहणाचं शास्त्र निर्माण केलं. त्यासाठी लागणारी शस्त्र-अस्त्रं घडवली गेली. अल्पाईन क्लायंबिंग हे मोहिमेचं नाव पडलं. एका तरुणाने दहा नियम तयार केले. ग्रिवेल नावाच्या गिर्यारोहकाने १९३२ साली आणखी २ नियम त्यात घातले. मग जेवणाचे हवाबंद डबे, कपडे, बूट, तंबू, फावडी, यात उद्योजक शिरले. अल्पाईन बर्फ म्हणजे सतत गोठणे-वितळणे - या क्रियेतून साठलेला हिमढीग. आणि दुसरा पाण्याचा बनलेला बर्फ. असे दोन प्रकार झाले. हिमढीग ओलांडणं कर्मकठीण.

त्या काळात भारत ब्रिटीशांच्या सत्तेखाली होता. सर्व्हे ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांनी त्रिकोणमितीच्या माध्यमाने हिमालयातील सर्वात उंच शिखर शोधून काढले. उंची २९,०२८ फूट. या शिखराला त्या खात्याचे जुने ख्यातनाम अधिकारी जॉर्ज एव्हरेस्ट यांचे नाव दिले गेले. ही उंची अनुभवायला १९१३ मधे जॉन नोएल गेला. मग १९२१ मधे जॉर्ज मेलेटी प्रयत्न करून आला. युरोपियन लोकांना हिमालय साद घालू लागला. १९५० मधे हिलमन-ह्यूस्टन जोडगोळी असफल होऊन परत आली. १९४० मधे तिबेट हाती आल्यावर चीनने त्याबाजूने गिर्यारोहणाला बंदी आणली. १९५० मधे परत गिर्यारोहकांसाठी दारं उघडली. त्यांमधे एक तरुण होता एडमंड हिलरी. १९१९ साली न्यूझीलंडमधे ऑकलंड शहरात याचा जन्म झाला. बर्फाच्छादित डोंगर त्याने सरावाने सोपे केले होते. आता त्याचं लक्ष्य होतं माउंट एव्हरेस्ट. २९ मे १९५३ रोजी त्याने शेर्पा तेनसिंगबरोबर ही चढाई यशस्वी केली. मग तो हिमालयाच्या प्रेमातच पडला. सी टू स्काय ही आणखी एक मोहीम त्याने यशस्वी केली. नंतर मुलाला घेऊन आला. यावेळी मात्र हिमालयाने त्याला प्रवेश नाकारला. ब्रिटीश गेले. पण भारतीय हुशार झाले.

आता दिवस बदललेत. भारतीय मुलांनी आव्हान स्वीकारलंय. १९६१ मधे '' अन्नपूर्णाची '' वाट लेफ्ट. कोहलींनी मळवली. ' नीलकंठ ' शिखर ओ. पी. शर्माने घेतलं. ' त्रिशूळ

’ पण सर झालं. मुंबईचे सुरेंद्र चव्हाण हिमालयाची माती- नव्हे बर्फ कपाळी लावून आले. बचेंद्री पाल या मुलीने मग हे यशस्वी साहस दाखवलं. पेम दोर्जे शेर्पा आणी मोना मुलेपोटी या तरुण जोडप्याने ३० मे २००५ रोजी एव्हरेस्टवर जाऊन दहा मिनिटे मास्क काढला आणि प्लॅस्टीकचे हार पिशवीतून काढून एकमेकांच्या गळ्यात घालून लग्न केलं. बरोबरच्या शेर्पाने त्यांचा फोटोही काढला. शंकर- पार्वतीनंतर हिमालयात साजरं झालेलं दुसरं लग्न!

एक शिवजी आणि गिरिजा, दुसरे पेम दोरजी आणि मोना.

आत्ता आत्ता कृष्णा पाटील हे साहस करून आली आणि आता ही पुण्यातली गिरिप्रेमी आणि सागरमाथाची धडाडीची मुलं. आज या मुलांनी एव्हरेस्टवर पाऊल रोवलंय! क्षणात साऱ्या भारताला, जगाला हे कळलंय की पुण्यातली मुलं सर उठाके म्हणत आहेत... आम्ही एव्हरेस्ट सर केलाय.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

# बेन्टेक्सचा सेल.

बेन्टेक्सच्या दागिन्यांच्या सेलची मोठी पानभर जाहिरात वाचली. १० % ते ५० टक्के सूट मिळणार होती. दागिने संपतील म्हणून लगेच दुकान गाठलं. बिंदीपासून पैंजणापर्यंत दागिन्यांनी दुकान सजलं होतं. सोन्याची झळाळी, तशीच आणि घडाईही तशीच, किंमत मात्र ज्या दागिन्याला २५००० रुपये पडतील, त्याची किंमत २५० रुपये होती. प्रवासाला जायचं म्हणून बांगड्या मंगळसूत्राची खरेदी केली आणि बाहेर पडून दुकानाच्या पायरीवर वर येणाऱ्या लोंढ्याला जागा करून देण्यासाठी उभी राहिले. त्या दुकानात शिरण्यासाठी वर येणाऱ्या बायकांमध्ये उभी होती माझ्या घरात काम करणारी कल्पना.

" काय गं! इथे कुठे? "

माज्या भावाचं लग्ण आहे ना, तेच्यासाठी दागिणे घ्यायला आलेली मी माज्या आयबरोबर.." ती म्हणाली. कल्पना नाव तिचं. कल्पणाच्या ऐवजी कल्पना म्हणायला मीच शिकवलं. ९ इयत्तेपर्यंत शाळेत गेली आणि मग गरिबीमुळे शाळा सोडून घरी बसली. सकाळी ८ वाजल्यापासून ११ वाजेपर्यंत घरकाम करून ११ ते ४ वाजेपर्यंत एका घरात लहान मुलीला सांभाळायला जाते. घरी गेल्यावर घरातल्या मशीनवर बसते, आणि आजूबाजूच्या घरातल्या लोकांचे फाटलेले कपडे मशीनवर शिवते, काही दिवस एका ब्युटी पार्लर मध्ये काम करत होती. तिथे केस कापणं शिकली आणि रविवारी तिथल्याच मुलींचे केस कापून देऊन पैसे मिळवते. थोडीही विश्रांती

न घेता लहान लहान कामातून पैसे मिळवत राहते. तिच्या अंगात माझ्या मुलीचा मीच दिलेला पंजाबी ड्रेस होता.

तिच्याशी बोलून मी पायऱ्या उतरताना मला तो दिसला. अचानक..ध्यानी-मनी नसतांना..विसरूनच गेले होते त्याला..त्याची भेट झाली होती खूप वर्षांपूर्वी..त्याचं द्रष्टेपण मनाला भावून गेलं होतं..कालगतीच्या विरोधात पोहत जाऊन समाजाला नवीन मार्ग दाखवण्याची त्यात तळमळ होती. त्यासाठी खस्ता खाण्याची मनाची तयारी होती. बदलत्या काळाची पावलं ओळखून जनमानसाच्या मनावरची परंपरेची जळमट खरवडून टाकण्याची घाई होती., ढम्म बसलेल्या तरुणांना भविष्याची वैचारिक फटक्यांनी जाणीव करून देण्याची दृष्टी होती. त्याचं द्रष्टेपण आज कल्पनाच्या रूपाने माझ्यासमोर उभं राहिलं होतं. हाच फरक असतो सामान्य आणि असामान्य विचारवंतांमध्ये..माझ्याकडे पाहून तो मंद हसला.

त्याचं नाव गोपाळ गणेश आगरकर.

इ.स.१८८८ च्या डिसेंबर मध्ये लोकमान्य आणि आगराकारांमध्ये वादाची ठिणगी पडली आणि आगरकर केसरी मधून बाहेर पडण्याचं ते निमित्त झालं. त्यानंतर इ स. १८९० मध्ये सुधारक सुरू करून समाजातील बुरसटलेल्या विचारांना बदलून टाकण्याच व्रत आगरकरांनी घेतलं, तेव्हा मी आणि कल्पना एकाच पायरीवर उभ्या असलेल्या त्यांनी पाहिलं. समाज प्रवाही असतो, तो बदलत राहिला पाहिजे हे त्यांनी ओळखलं. समाजाला बदलण्याचं असिधारा व्रत त्यांनी हाती घेतलं.

काय सांगितलं आगरकरांनी सुधारकातून?

“ टाकातून अक्षरे काढण्याचं सामर्थ्य असेल व ती वाचण्यास एकतरी इसम असेल तोपर्यंत मी लिहिणार, इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार” या आपल्या वचनांचं त्यांनी शेवटपर्यंत पालन केलं. सुधारक काढण्याचा हेतू सांगतांना त्यांनी स्वच्छपणे लिहिलं कि जो खरा विचारी आहे, लोककल्याणाची ज्याला खरी कळकळ आहे, सत्य बोलणे, आणि तसे आचरण करणे यातच ज्याचे

समाधान आहे अशा माणसाने, विचारशून्य क्षुद्र लोकांच्या अवकृपेला, रागाला किंवा उपहासाला यत्किंचितही न भिता आपल्या मनास योग्य वाटेल ते लिहावे व सांगावे हेच उचित आहे. त्याच्या ह्याच वर्तनात जगाचे हित आणि जन्माची सार्थकता आहे.

रूढीप्रिय समाजाच्या जीवनाच्या विविध पैलूंवर आगरकरांनी घणाघाती हल्ला चढवला. अन्त्यसंस्कारांच्या ओंगळ विधींवर सुधारकातून खरपूस समाचार घेतला.. आणि स्वत:च्या आईच्या बाराव्याला दोन पायली तांदळाचा भात करून एकेक मूद भात आणि एकेक पैसा शंभर विद्यार्थ्यांमध्ये वाटून टाकला. हा वेगळाच पाठ समाजाला घालून द्यायला जराही कचरले नाहीत.

“ स्त्रियांचा पेहराव “ या विषयावर लेख लिहिल्यावर आपल्यावर बोचऱ्या मधमाशांसारखं मोहोळ उठणार याची कल्पना आधीच त्यांना आली. म्हणून आपल्या लेखाची सुरुवात त्यांनी केली ती अशी,

“ नाईलाज झाल्याशिवाय कोणत्याही गोष्टीत आपणहून फेरबदल करणारे आम्ही लोक नाहीत. कित्येकांचे पित्त खवळून उठेल हे आम्हास पक्के ठाऊक आहे.” असं म्हणत आपले विचार सुस्पष्टपणे मांडले. दर्शनीयता आणि उपयुक्तता हे दोन गुण पेहेरावासाठी महत्वाचे आहेत हे त्यांनी मानलं. उपयुक्ततेच्या दृष्टीने निरनिराळया व्यवसायांप्रमाणे निरनिराळे कपडे हवेत. पोशाख असा हवा कि जो घातल्याने हातपायादी अवयवास चलन व्यापार सहज होऊन शरीरास कुठल्याही प्रकारे कष्ट होऊ नयेत आणि विरुपातही दिसू नये असा विचार त्यांनी मांडला. स्त्रियांची मान आणि कंबर पूर्णपणे झाकली जाऊन कोपरापासूनचे हात मोकळेपणे फिरावेत, मोठमोठाले पदर एकसारखे सावरत बसण्यापेक्षा घराच्या घरी शिवलेली जाकिटे साडीवर घालावीत हा विचार घराघरात बॉम्ब स्फोट करून गेला असेल. कमीजची नुसती कल्पना मांडून आगरकर थांबले नाहीत तर त्याही पुढे जाऊन त्यांनी लिहिलं की, त्यामुळे स्त्रिया जे भरतकाम करतात ती नक्षी सर्वांना पाहता येईल. आणि गळयात दागिना घालायची बायकांना जी हौस असते, ते घालत असल्याने सर्वांना पाहताही येतील. घरात घालण्यासाठी सुती मलमली आणि बाहेर जाताना

घालण्यासाठी रेशमी जाकिटे असावीत याचीही सूचना त्यांनी त्या लेखात केली. ही जाकिटे म्हणजेच कमीज लांब असावीत हे सांगायला ते विसरले नाहीत.

इतकं लिहून आगरकर थांबले नाहीत. सनातनी लोकांना, मडमांचे पोशाख चांगले असं आम्ही मानतो असा भ्रम होईल, असं म्हणत मडमांच्या कपड्यातील दोषांवरही एक लेख लिहिला. बालवयीन विधवा मुली जेव्हा लाल आलवणं नेसलेल्या ते पाहत, तेव्हा त्यांच्या अंत:करणाला पीळ पडत असे. ती प्रथा बंद करण्यासाठी त्यांचा जीव तीळतीळ तुटत असे. त्यांच्या पत्नीने त्यांचाच मार्ग अवलंबला. लाल अलवण त्यांनी नाकारलं, केशवपनही केलं नाही. त्यांच्या घरच्यांनी त्यांच्या हातून पाणी पिण्याच नाकारलं तेव्हा घट्ट मनाने तो विरोध सहन केला.

कल्पना आज केरवारे भांडी घासण्यासाठी पंजाबी ड्रेस घालून येते. ऑफिसला जाणार्या मुली चलनवलनाला योग्य ट्राउझर्स आणि शर्ट असे कपडे घालतात. कमीज वरच्या नक्षीसाठी अनेकांना रोजगार मिळतोय. ड्रेस डिझायनर हा नवीन उद्योग भरभराटीला आलाय. पोलीस-वैमानिक-पोस्टमन या नोकर्यांवर असणाऱ्या स्त्रियांचे पोशाख व्यवसायाला पूरकच आहेत. आगरकरांची दूरगामी विचार प्रत्यक्षात अवतरायला १०० वर्षे लागली.

त्यानंतर आगरकार तुटून पडले ते सोन्याच्या अलंकारांवर. त्यात आगरकरांनी पहिल्याच वाक्यात पुरुषांची फिरकी घेत लिहिलं,

“ बोलण्यात साधेपणाची तारीफ करायची आणि मौल्यवान दागिने घालून ठुमकत जाणार्या स्त्रीकडे अभिलाषापूर्वक पाहिलं नाही असा पुरुष सापडेल काय? आगरकरांनी हेही मान्य केलं की जोपर्यंत स्त्रीपुरुष एकमेकांना प्रिय होण्याचा प्रयत्न करत राहणार तोपर्यंत दागिन्यांचा नाद सर्वत्र दिसत राहणार. चांगले कपडे, चांगले घर, दागिने यांचा उपभोग घ्यायला हवा हेही त्यांना मान्य होतं. पण सोन्याच्या साठवणीमुळे चोर्या दरोडे खून होतात.म्हणून दागिन्यांपासून होणारा फायदा राखून नुकसान टाळता येईल अशी सोपी युक्ती आहे. ती म्हणजे खोटे दागिने घालणे. खोटे

दागिने श्रीमंतांपासून गरीबांपर्यंत सर्वांना वापरता येतील. सोन्यात अडकून राहणारा (डेड इन्वेस्टमेंट) पैसा उद्योगासाठी वापरावा हेही त्यांनी त्यात सूचित केलं. पैशाची बचत करून त्यातील थोडासा पैसा कपड्यांवर खर्च करावा. सुंदर कपडे घातल्याने आत्मविश्वास वाढतो हा तरुणांना दिलेला तेव्हाचा सल्ला आज घराघरात रुळला आहे.

आज शंभर वर्षांनी बेन्टेक्सची दुकानं दागिन्यांनी भरली आहेत. हे दागिने बनवणार्यांचा व्यवसाय तेजीत आहे. मी आणि कल्पना त्यांच्या स्वप्नाचे प्रतिनिधी आहोत. पहाटे लगबगीने कामाला जाणार्या मुली आज पंजाबी ड्रेस घालतात, त्यावर शोभतील असे दागिने घालतात.आणि कामाला जातात. आगरकरांनी हेच स्वप्न १२५ वर्षांपूर्वी पाहिलं.

आगरकरांनी स्त्रियांसाठी आणखी एक विषय निवडला तो म्हणजे स्त्रियांच्या उपजीविकेला योग्य असं व्यवसाय देणाऱ्या शिक्षणाची गरज.

त्या लेखाच्या सुरुवातीला त्यांनी अत्यंत कडवटपणाने लिहिलं,

" नवऱ्याच्या मरणाची बातमी ऐकल्यावर जी स्त्री प्राणोत्क्रमण करते ती साध्वी क्रमांक एक आणि जी अफू किंवा विहीर जवळ करते ती साध्वी नंबर दोन असेल तर पुरुषानेही पत्नी गेल्यावर प्राणहत्या करणे प्रशस्त होईल. स्त्रियांची ही वर्तणूक अलौकिक हे जर कुणी उघडपणे आम्हाला सांगेल तर त्यास आम्ही ब्राह्मदेवाचेही ब्रह्मदेव म्हणू. हा सारा भरणा वरिष्ठ जातींच्यामधेच आहे. खालच्या वर्गात नाही. ज्या बायका पतीनिधनानंतर आत्महत्या करतात, त्या अविचारी, किंवा पुढील निष्ठूर जीवनाला घाबरून जाणार्या असतात. कारण स्वचरितार्थ चालवता येईल असं व्यवसाय आणि शिक्षण त्यांना नसतं. "

आगरकरांनी पुढे लिहिलं की मुलीना शिक्षण मिळालं तर त्यांच्या अपत्यांची आबाळ होणार नाही. ती सशक्त होतील. त्यासाठी मुलीना शिक्षण मिळणं गरजेचे आहे. तरुणांना मनासारखी बायको निवडता येईल. उद्योग करता येतील. त्यांचे संसार सुखांचे होतील.

आगरकरांची सगळी मतं आज १०० वर्षांनंतर खरी झालेली दिसतात. खोटे दागिने सर्वमान्य झाले, कमीज घरात रोजचे झाले, स्त्रिया स्वत:च्या पायावर उभ्या रीहू लागल्या. संतती सुदृढ निपजायला लागली.

आज आगरकर असते तर आजच्या सामाजिक दोषांवरही सुधारणा शिकवत राहिले असते. त्यांना टी. व्ही.ची जोड मिळाली असती. नोकरी करणाऱ्या दाम्पत्याच्या मुलांची आबाळ या विषयावर सुचवत राहिले असते.

जाहिरात वाचून कल्पना दागिने घ्यायला आली. पूरक व्यवसाय करून ती मिळवती झाली आहे. ब्युटी पार्लर, केटरिंग, शिकवण्या हे घराघरात शिरलेले व्यवसाय स्त्रियांना घरबसल्या अर्थार्जन करून देत आहेत.

मंगळसूत्र घेऊन घरी आल्यावर मीही सूटकेसमधून साड्या काढल्या आणि पंजाबी ड्रेस भरले. नक्षीकाम केलेले. खोटे दागिने घेतले.

हे सगळं आगरकरांना बरं वाटावं म्हणून ... आणि मलाही!

# सास ननद मोरी देगी गारी

लांबरुंद आणि ५०० माणसं बसतील असा मोठा हॉल. एक भाग खुर्च्यांनी नीट मांडलेला. उरलेल्या भागात सतरंज्या घातलेल्या. स्टेजवर सतरंज्या आणि बिछायत अंथरलेली. त्या स्टेजवर ५ माईक्स होते. त्यातले ३ माईक्स पुढे, आणि दोन माईक्स मागे.. माईकला जोडल्या गेलेल्या वायर्सचं भेंडोळं लांब एका टेबलापाशी गोळा झालं होतं. तिथे रेकॉर्डिंग मशिन होतं. टेबलाच्या मागे एक खुर्ची होती. स्टेजच्या मागे प्रायोजकांच्या नावाचा फलक. इतर ठिकाणी इतर प्रायोजकांचे फलक. हॉलच्या दाराशी आणखी एक टेबल खुर्ची. आयत्या वेळच्या तिकीटविक्रीसाठी होतं ते! हॉलच्या बाहेर चहा-कॉफी मांडायला एक लांबलचक टेबल आणि त्याला लागूनच सीडी आणि कॅसेटस्च्या विक्रीसाठी लावलेलं टेबल. ह्या सर्व नेपथ्यावरून इथे कुणातरी गायकाचं गाणं होणार हे नक्की होतं.

हॉलमधे तुरळक लोक होते. अगदी हाताच्या बोटावर मोजण्यासारखे. काही ऑफिसमधून परस्पर आलेले, काही पाठ टेकायला भिंत मिळण्याची जागा पकडावी म्हणून, काही खुर्ची मिळावी म्हणून, काही स्वभावच घाईचा म्हणून आणि काही इथे येऊन मित्रांशी, नातलगांशी आधी थोडा वेळ गप्पा माराव्यात म्हणून! गाण्याची वेळ संध्याकाळची ५ वाजताची होती. त्या वेळेला जागणारा बरोबर ५ वाजायला ५ मिनिटे कमी होती तेव्हा अवतरला. ते लगेच ओळखता आलं. हळूहळू गर्दी जमायला लागली. ५.३० ला संस्थेचे कार्यकर्ते अवतरायला लागले. कॉफीवाला आला, सीडीवाला आला, रेकॉर्डिंगवाला ५.४५ ला आला. गाणं अर्ध्या एक तासात सुरू होणार याची लक्षणं दिसायला लागली. हॉटेलमधे जेवणाची ऑर्डर दिल्यावर टेबलावर प्लेट येते तेव्हा अंदाज येतो तसंच हे!. भारतीय वेळेसाठी एक तास उशीर म्हणजे काहीच नाही. भारतात घड्याळं का विकली जातात हे एक कोडंच आहे..अंधश्रध्दा ? की दागिना ?

हळूहळू मात्र हॉल पूर्ण भरला. तंबोरे व्यासपीठावर विसावले. तबला-पेटीही आपापल्या जागी येऊन जागा पकडून बसले. लोक उत्सुकतेने गायकबुवांची वाट पाहू लागले. इतक्यात संस्थेचे सूत्रसंचालक आणि पाठोपाठ गायक आपल्या साथीदारांच्या लवाजम्यासकट प्रवेशले.

लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. बुवा स्टेजच्या मध्यभागी स्थानापन्न झाले. संगत करणारे आपापली शस्त्रे परजायला लागले. तंबोरे-पेटी-तबला एका सूरात जमले. बुवांनी मांडीवर शाल पसरली. तोंडात लवंग टाकली. हातातलं घड्याळ काढत श्रोत्यांवर एक सराईत नजर टाकली. नवशे कोण, गवशे कोण, आपले फॅन कोण, परिचित कोण, खरे जाणकार कोण याचा आढावा घेतला. मागे बसलेल्या जाणकारांना पुढे आपल्या समोर बोलावलं. सगळी वाद्यं नीट लागली आहेत की नाही याची खात्री करून घेतली. मग बुवा गंभीर झाले. शरीरातील उर्जा गोळा करत त्यांनी आपल्या दमदार आवाजात षडज् लावला आणि हॉल एकदम शांत झाला. पेपर वाचणाऱ्यांनी पेपर घडी करून ठेवला. मातीत पाणी झिरपत जावं तसा त्यांचा सुरेल षडज् हॉलमधे पसरला, श्रोत्यांच्या मनात पसरला, देहात पसरला. सर्वजण बुवांच्या गाण्याचा आनंद घेऊ लागले. डोलायला लागले. डावीकडून उजवीकडे माना डोलवू लागले..फिरत्या टेबल फॅनसारखे.. म्हणूनच चाहत्यांना फॅन शब्द आला असेल.

त्या वातावरणात स्थितप्रज्ञ असतो तो एकच जीव. मैफील सुरू झाली की हा आत्मा सदेह बाहेर पडतो आणि त्याच्या रेकॉर्डिंग मशिनने कू ऽऽऽऽ अशी साद घातली की आत येतो आणि आवाजावर नियंत्रण मिळवतो. सगळीकडेच असं! मीराबाईने म्हटल्यासारखं...बडे बडे नयन दिये मृगनको, घारीला मात्र आकाशातून नजर ठेवण्यासारखी बारीक डोळ्यांमधे बारीक नजर..बूटपॉलीश करणाराला बूट नाहीत, गवंड्याला स्वतःचं घर नाही, शालेय पुस्तकांचं दुकान चालवणाऱ्याला विद्यापीठाचं पदवीचं प्रमाणपत्र नाही..

विलंबित ख्याल सुरू झाला. चीजेचे शब्द कुणालाही कळत नव्हते, पण शास्त्रीय संगीतात ते चालतं, कारण सूर महत्वाचे. समेवर यायला कोणताही शब्द गायक घेईना का! बाराखडीची चीज केली तरी चालेल. ख्याल रंगत गेला. बुवांबरोबर प्रत्येकजण मनातल्या मनात तीच आलापी म्हणत होता, आणि जेव्हा जमत नव्हतं तेव्हा,‘‘ वा!, क्या बात है! बहोत अच्छे! असं म्हणत दाद देत होते. बुवांनी पाऊण तास ख्याल रंगवला आणि मग द्रुत चीज सुरू झाली. सास ननद मोरी देगी गारी.. नेहमीचे शब्द! सास ननद या दोघींना बुवा सूरांच्या झोपाळ्यावर बसवून खाली-वर नाचवायला लागले, तानांच्या फेऱ्यामधे अडकवून समेवर आणून आपटायला लागले. बिचाऱ्या दोघी. आपली बहू रात्री कान्ह्याला भेटायला जाते असं कळल्यावर कोणत्या घरात हंगामा होणार नाही? त्यात त्यांचा काय दोष? सास ननदची हाडं मात्र बुवांनी खिळखिळी करुन टाकली.

असं का व्हावं? पुरुषांनी चिजा बांधल्या. मग त्यात कोंबड्यांची झुंज, शेतातील पिकं, पतंग यांच्यावर चिजा नकोत का? असं तर झालं नसेल? घरातला गायक मुलगा, पहाटेचा रियाज झाल्यावर, घरातले पुरुष शेतावर कामाला गेल्यावर एकटाच चारपाईवर पडून संगीतावर विचार करत पडला असेल. तोपर्यंत घरात जाग येऊन सैपाकघरातील धुसफुस सुरू झाली असेल, ह्याच्या मनात एक राग आणि घरात बायको-आई- बहिण यांच्यात दुसराच राग..तिथेच त्याला आपल्या लाडक्या पत्नीची व्यथा कळून सासननद देगी गारी चीज त्याने बांधली असेल. चीज तयार झाल्यावर अत्यानंदाने त्याने आत पत्नीला निरोप पाठवला असेल, रात्री नदीकाठी फिरायला जाऊ, तुला चीज ऐकवायची ्आहे.. आतून उत्तर येतं, '' कैसे आऊँ जमुनाके तीर, पाँव पडी जंजीर..'' आमचा गायक पत्नीच्या या नवीन मुखड्यावर जाम खूष.. काय हुशार आहे बायको आपली.. रात्री झोपायच्या वेळी तरी ही चीज तिला ऐकवायची म्हणून तो वाट पाहात राहिला . दिवसभर भाकऱ्या बडवून, गायी म्हशींचं करून दमलेल्या बायकोने पाठ गादीवर टेकवली आणि त्याच्या चीज ऐकवण्याच्या उत्साहावर विरजण टाकत म्हणाली,

'' झोपा आता, दमलेय मी खूप..चारपाईसे मैं गिरा, छूली मैने धरा, असले शब्द घातलेत तरी मला त्याचं काही नाही. उद्या पाहुण्यांसाठी मला जास्त भाकऱ्या बडवायच्या आहेत.. मग तो बिचारा रात्रभर जागत बसला. '' रतिया कटत तारे गिनगिन '' ही चीज तेव्हाच त्याला सुचली. आपल्या आईबहिणीच्या त्रासावर बांधलेली चीज कुणाला कळू नये म्हणून त्या बिचाऱ्या आमच्या गायकाने आपल्या कृष्णाचा आश्रय घेतला. कृष्णाचं एक बरंय! तो कुणाच्याही मदतीला धावून जातो..मग कान्हा-बरजोरी- सुरू झालं.

आपल्या शास्त्रीय संगीतातला मेरूमणि म्हणजे तानसेन. भारतीय संगीतात गोपाळ नायकाने भर घातली आणि नायकी कानडा निर्माण केला. संगीतक्षेत्रातही अनेक घराणी झाली. जयपूर-अंत्रोली-किराणा या साऱ्या घराण्यांची ग्वाल्हेरपासून सुरूवात झाली. कर्णाचं गाव म्हणून ओळखल्या जाण्याऱ्या किराणा घराण्याने आपलं किराणा माल न मिळणारं रिटेल शॉप कर्नाटकात बसवलं. त्यांचे सगळे गायक कानडी. जुन्या काळी राजाच्या पदरी राजगायक असत. दुसऱ्या राज्यातून आलेल्या गायकाची आणि राजगायकाची जुगलबंदी होत असे. दोन भिन्न धर्माचे असले तरी त्याला दोन गटात जुगलबंदी अशी सरकारी संज्ञा नव्हती. किंबहुना संगीत क्षेत्रात अजूनही धर्म आड येतच नाही. कोणत्यातरी बुवांना तबल्याच्या अथवा पेटीच्या साथीला कुणीतरी खान असतो . जुन्या काळी राजे लोक आपली खुषी दाखवायला कलाकाराला आपल्या गळ्यातील

मोत्याचा कंठा काढून देई. ते मात्र जरा संशयास्पद वाटतं. राणीला तेच तेच दागिने घालायचा कंटाळा आला की ती कदाचित '' आज हे खपवा '' म्हणून राजाजवळ देत असावी. मग त्यादिवशीच्या कलाकाराला कंठा बक्षीस!

शास्त्रीय संगीतातील अढळ ध्रुव तारा म्हणजे अमीर खुस्त्रो. याचं खरं नाव अबुल हसन. याचा बाप अमीर सैफुद्दीन तुर्कस्थानातून हिंदुस्थानात आला आणि सुलतान अल्तमशच्या पदरी १०,००० रुपयांची जागीर घेऊन राहिला. अमीर खुस्त्रोचा जन्म मोमिनाबादला झाला. सैफउद्दीन आपल्या बाळाला फकीराच्या पायावर घालायला गेले, तेव्हा बाळाचा चेहरा पाहून फकीराने भविष्य सांगितलं की हा एक फार मोठा शायर होईल.

त्याप्रमाणेच अमीर खुस्त्रोचं काव्य आणि कविता नावाजल्या जाऊ लागल्या. गायल्या जाऊ लागल्या. अमीर खुस्त्रो फार मोठा विद्वान होता. नक्षत्रांचा प्रवास, सूफी धर्माची तत्त्वे, आणि विज्ञान यात त्याचा मोठा अभ्यास होता. अरबी-तुर्की-इराणी भाषेवर त्याचं असामान्य प्रभुत्व होतं. त्याने फारसी भाषेत ४/५ लाख शेर लिहिले आहेत. या भाषा आणि ब्रजभाषा-अवधीभाषा- खडी बोली तसेच संस्कृत-प्राकृत भाषा यांच्या संगमातून त्यानेच उर्दू ही भाषा तयार केली. त्यामुळे प्रजेला आणि राजा, त्याचे अधिकारी आणि सैन्याला एकमेकांचे विचार कळायला लागले.. अमीर खुस्त्रोने आपल्या हयातीत दिल्लीच्या अकरा बादशहांची सत्ता अनुभवली आणि सात नोकऱ्या केल्या. सतारीचा- सहतार- तीनतारचा तोच निर्माता. त्याने अरबी-तुर्की आणि इराणी संगीताचा भारतीय संगीताशी मिलाफ करून अनेक रागांची निर्मिती केली. चीजा बांधल्या. लोकगीतं रचली. ७२ वर्षे जगला आणि निजामुद्दीन औलियाच्या शेजारी त्याचं दफन झालं.

अमीर खुस्त्रोनंतर अनेकांनी अनेक बंदिशी बांधल्या. पण ख्यातनाम झाले सदारंग अणि अदारंग. पण सगळ्यात सास आणि ननद असायचीच. संगीताचे जलसे, कीर्तनकार, कथेकरीबुवा, यांनी लोकांच्या मनोरंजनाचं व्रत चालवलं. युरोपात जसेजसे वैज्ञानिक शोध लागायला लागले, तसतशी काळाच्या ओघात आधुनिक करमणुकीची साधनंही नंतर बदलत गेली. चित्रपट आले, रेडियो आला. मग आला टी. व्ही.

इ. स. १८४३ पासून संशोधकांचे टी. व्ही. जन्मासाठी प्रयत्न चालू होते. कॉन्स्टन्टाईन परस्क्यी याने जागतिक संमेलनात आपल्या पेपरमधे प्रथम '' टेलिव्हिजन हा शब्द वापरला. अनेकजणांच्या अनेक प्रयत्नांनंतर टेलिव्हिजन अखेर अमेरिका आणि इंग्लंडमधे दुसऱ्या

महायुध्दानंतर शिरला. त्या देशांमधे १९६० मधे रंगीत टीव्ही आला. आपल्याकडेही दूरदर्शन अवतरलं, इ.स. १९५९ मधे. दिल्लीतील लोकांना दूरदर्शनची चटक लागायला लागली. महाराष्ट्रात आला १९७२ मधे. ८४ साली इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत भारतीयांनी एशियाड खेळाच्यावेळी रंगीत संचात खेळांचा आस्वाद घेतला.

सुरुवातीला आवो मारी साथे, गजरा, फुल खिले है गुलशन गुलशन, मुलाखती, प्रतिभा आणि प्रतिमा असे सुंदर आणि दर्जेदार कार्यक्रम दूरदर्शनमधे रंग भरायला लागले. आठवड्याल फक्त रविवारी सिनेमा पाहायला मिळे, तो हळूहळू रोज बघता येऊ लागला. डिस्कव्हरी, ॲनिमल प्लॅनेटी तर आकाश आणि पाताळ विश्व जगासाठी खुलं केलं. बघता बघता खाजगी वाहिन्यांची भर पडली. कार्यक्रमांची रेलचेल झाली. या वाहिन्यांच्या भाऊगर्दीत हळूहळू गाडी सास-बहूवर कधी घसरली ते कुणालाच कळलं नाही. घराघरातली मंडळी सासवासुनांची भांडणं पाहण्यात दंग व्हायला लागली. मै तुम्हारे बच्चेकी माँ बननेवाली हूँ ह्याच वाक्यात मंडळी रमायला लागली. तंबाखूचं व्यसन बरं, कारण तंबाखू खाताखाता निदान माणूस काम तरी करत असतो, पण हे सिरियलचं व्यसन कुटुंबाला नाकाम करायला लागलं. रडणाऱ्या सुनांना पाहून प्रेक्षक खूष होऊ लागले. व्यासांनी कौरव-कुंती, आणि वाल्मिकींनी कैकयी-कौसल्या ही कथा यशस्वी होण्यासाठी वापरलेली ‘‘ क ‘‘ ची युक्ती एकताने वापरली आणि तीही यशस्वी झाली. ना त्या कथांना दर्जा, ना उत्कट अभिनयाला वाव, ना काही चांगलं पाहिल्याचं समाधान..सास ननद मधून कुठे ते प्रतिभेचा आनंद देणारे गवईबुवा आणि कुठे या सासवा-सुना!

पतिनिधनानंतर, सासरच्या लोकांनी घराबाहेर काढल्यावर स्त्रियांनी आपलं आयुष्य दुःखी करू नये म्हणून मागच्या शतकात आगरकर-फुले-कर्वे यांनी आपल्या आयुष्य संकटात घालून स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभं करण्यासाठी स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. त्यांनी स्वतःचं आयुष्य कशाला बरबाद केलं कुणास ठाऊक! मै तुम्हारे बच्चेकी माँ बननेवाली हूँ ही मुलींवर वेळ येऊ नये म्हणून र. धों. कर्व्यांनी संततीनियमनाच्या प्रसाराला वाहून घेतलं..आणि समाजाचा रोष ओढवून घेतला.

पण..

लोकांना रडणाऱ्या स्त्रीच्याच कथा आवडतात.

कुणीतरी शहाणा माणूस होता, त्याने या टेलिव्हिजनच्या डब्याला इडियट बॉक्स असं नामकरण केलं. दागिन्यांनी मढलेल्या, तरी कचाकचा भांडणाऱ्या सासू सुनेला पाहात चांगला वेळ बरबाद करणाऱ्या प्रेक्षकांना पाहून काय म्हणत असतील फुले-कर्वे-राजा राममोहन रॉय ?

यात कोण इडियट ? आपले फुले कर्वे की तो टीव्हीला इडियट म्हणणारा तो शहाणा ?

# मरुत्सखा

पांढऱ्या ढगांचं अस्तित्वच वेगळं. कुणीही हेवा करण्यासारखं. हलकं फुलकं शरीर, अंतरंगातही काही काळंबेरं नाही. स्वभावात गडगडाट नाही, की कडकडाट नाही. पृथ्वीच्या अंतरंगात ढवळाढवळ नाही की अंतराळात सावळा गोंधळ नाही. त्यांचं शांतपणे विहरणं, आकाशात पुढे पुढे जाणं, हे जैन साध्वींच्या जथ्यासारखं..शुभ्र वस्त्रातल्या या जोगिणी येतात कुठून आणि जातात कुठे कुणालाही माहीत नाही..कोणत्याही मोहपाशात न अडकता या जोगिणी पायी प्रवास करत असतात. पांढऱ्या ढगांचंही तसंच. त्यांच्यासाठी कुणी चातक कधीही तहानलेला रहात नाही. त्याच्या दर्शनाने कोणा मोराच्या मनातली थरथर त्याच्या पिसाऱ्यात सळसळत नाही. कोणताही बळीराजा आकाशाकडे डोळे लावून त्याची वाट पाहात बसत नाही. त्याच्या स्पर्शाने भूमी हिरवळत नाही की विरहाने तडकतही नाही. त्यांच्या आडोशाला सूर्य कधीही काळवंडत नाही. दोन पांढऱ्या ढगांच्या टकरीने ठिणगी पडलेली पाहिली आहे कुणी ? दोन ढगाचं भांडण ऐकलंय कुणी ?

ते सारं वेठीला धरणं असतं ते कृष्ण मेघांचं..या घनश्याम वर्णी जलदांच्या येण्यानं वृक्षांचे कुर्निसात झडतात. त्याच्या दर्शनानं कविमनं फुलतात. प्रणयगीतांची लव्हाळी अंकुरतात. मेघदूतासारखी काव्यं जन्मतात. चिमणी पावलं ‘ नाच रे मोरा ‘ गाण्यावर ताल धरतात. वैशाखाच्या उन्हात सावलीसाठी जमिनीत लपलेली बीजं पाऊस बघायला डोकं वर काढून अंकुरतात. धरणीकंपासारखं गडगडणं, प्रलयासारखं कोसळणं आणि टकरीने लखलखाटाचं शक्तीप्रदर्शन करणं हा त्यांच्या आवडीचा खेळ.

कृष्ण मेघ एखाद्या राजासारखा, तर धवल मेघ ऋषींच्यासारखे..धरेच्या पालनपोषणांची जबाबदारी या काळ्या ढगांची तर छाया देण्याची जबाबदारी शुभ्र मेघांची. विलयाला जाणाऱ्या सूर्याला क्षितीजापर्यंत सोबत करून त्याच्या उदासीनतेचे करडे, केशरी कढ सुदूर आकाशात पसरून जीवमात्राला त्याच्या विरहाचे संदेश पोचवणं त्यांचंच काम..मोर निघून गेल्यावर त्याचा पिसारा मागे रेंगाळतो तसेच ते रंग..सूर्याचं अस्तित्व दाखवणारे रंग.. सूर्याच्या अस्ताची वाट

पाहात बसलेल्या चंद्राला लपाछपी खेळायला मदत करण्याचाही खेळही याच शुभ्र ढगांचा. कृष्णरंगी पृथ्वीवर आलेला हा चंद्र एकीकडे विरह चेतवतो, दुसरीकडे कृष्णकृत्यांना आसरा देतो, तर तिसरीकडे गूढ रहस्यमय वातावरणाला उजाळा देतो.

या ढगांचा प्रवास अनंत काळापासून चालू आहे. या जगातील मानवाची भौतिक आणि तांत्रिक प्रगती ते योग्य अंतर राखून नेहमीच पाहात आले आहेत. विवस्त्र फिरणाऱ्या आदि मानवापासून प्रगत होत जाणाऱ्या रेशमी सळसळती वस्त्रं परिधान करणाऱ्या मदालसा आणि युवकांना ते नेहमीच निरखत आले आहेत. अगणित वादळी वारे, चंद्रग्रहणं, सूर्यग्रहणं, उल्कापात अनुभवत राहिले आहेत.

एक दिवस मात्र अघटित घडलं. १८९५ सालची गोष्ट. भरतखंडात शिवरामबापू तळपदे नावाचा युवक जन्मला आहे हे त्यांच्या गावीही नव्हतं. या तरूण प्रतिभावान शिवरामाने वैदिक वाङ्मयाचा अभ्यास केला. करवीर मठाधिपती जगत्गुरु शंकराचार्यांनी ‘ वेदप्रकाशदीप ‘ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. स्कूल ऑफ आर्टमधे ते उत्तम शिक्षक म्हणून नावाजले. आपल्या वेदांमधे सर्व ज्ञानाची माहिती आहे म्हणून वेदांचं अध्ययन सुरू केलं. आणि एक दिवस त्याच्या या अभ्यासाने त्यांच्या आयुष्याला कलाटणीच मिळाली.

ऋग्वेदातील दहाव्या भागात त्यांना विमानाचं आणि ते बनवण्याचं वर्णन सापडलं. विमान बनवण्याचं तंत्र त्यात सविस्तर लिहिलेलं होतं. हे विमान सतत तीन दिवस तीन रात्री उडत राहील असं त्यात लिहिलं होतं. त्यातील तांत्रिक वर्णनावर भारद्वाजांनी लिहिलेली टीका त्यांनी मग अभ्यासली. त्या वर्णनानुसार विमान बनवण्याच्या कल्पनेने त्यांना झपाटलं. पत्नी आणि आपला मित्र पिटकर यांच्या मदतीने त्या वर्णनानुसार विमान बनवण्यात ते यशस्वी झाले. या विमानाला आठ इंजिनं होती. पारा दाबाखाली ठेवून त्यावर सूर्यकिरणांचा संयोग घडवून त्याद्वारे आठही इंजिनांच्या अन्योन्य हालचालींनी त्यांना वेग येण्याची त्यात संकल्पना होती. शिवरामबापू तळपद्यांनी चालकविरहित विमान बनवून मुंबईच्या चौपाटीवर ते उडवण्याचा प्रयोग करायचं ठरवलं आणि ते झपाटल्यासारखे कामाला लागले.

अथक कष्टांच्यानंतर विमान तयार झालं. तळपद्यांच्या परीक्षेचा दिवस उजाडला. मुंबईच्या गिरगाव चौपाटीवर जनसमुदाय जमला. महादेव गोविंद रानडे, श्रीमंत सयाजीराव गायकवाड, लालजी नारायण अशी ख्यातनाम मंडळी त्या प्रयोगाला हजर राहिली. लोकांची

उत्सुकता आणि जिज्ञासा पराकोटीला पोचलेली असतांनाच तळपद्यांनी विमान सुरू केलं. क्षणात ते विमान अवकाशात झेपावलं. १५०० फूट उंच गेलं आणि आपोआप खाली आलं. तळपद्यांना धन्य धन्य झालं. सर्व प्रतिष्ठितांकडून पाठीवर कौतुकाची थाप मिळाली. न्यायमूर्ती रानड्यांनी शिवरामबापूंना सल्ला देत म्हटलं की तुमचं हे संशोधन घेऊन युरोपात जा. तिथे विमान बनवण्यावर शोध घेणं अखंड चालू आहे. तिथे जाऊन त्यांच्या शिक्षणात प्रगती करा आणि भारताचा नावलौकिक वाढवा.

त्या विमानाचं नाव ठेवलं होतं मरुत्सखा.

भारतात पहिलं विमान बनवलं गेलं याची नोंद होणं आवश्यक होतं.

पण भारतातील या असामान्य घटनेची कुठेही नोंद नाही, कुणीही दखल घेतली नाही, त्या विमानाची लांबी-रुंदी-उंची कुणालाही माहीत नाही. वृत्तपत्रांतूनही त्याची कुठेच नोंद नाही. तळपदेही कधी युरोपात गेले नाहीत. देशाटनाची भीती, परदेश प्रवासाची अनिच्छा आणि कल्पनाचौर्याची शंका यामुळे तळपदे भारतातच राहिले. पुढे पत्नीच्या निधनानंतर संशोधनही थांबवलं. आश्चर्य हे की एवढी मोठी ऐतिहासिक घटना पण लोकमान्य टिळकांसारख्या मनाने वैज्ञानिक असलेल्या केसरी-मराठा यांनीही त्यावर काहीही भाष्य केलेलं नाही. तळपद्यांच्या वारसांनी त्यांचे संशोधनांचे कागद रॅले कंपनीला विकून टाकले.

आकाशस्थ शुभ्र ढगांच्या कानावर ही बातमी पोचली. त्यांचंही लक्ष या उडत्या वस्तूकडे लागलंच होतं. आजवर गरुडाशिवाय कुणीही या ढगांपर्यंत पोचू शकत नव्हतं. पण आजचं हे अनोखं यंत्र पाहून नवीन ढगांच्या मनात धडकीच भरली. भविष्यातील संकटांची त्यांना चाहूल लागली. येणाऱ्या संकटांवर विचार करण्यासाठी सारे ढग मुंबई चौपाटीपासून जरा दूर गेले. काळजीने चर्चा करू लागले. त्यांच्यातील करड्या, विरळ, वृध्द ढगांकडे सल्ला मागायला गेले. अनुभवी ढग म्हणाले,

‘ काळजी करू नका. हा भारत देश आहे. या देशात तांत्रिकी आणि यांत्रिकी ज्ञानाला आणि संशोधनाला किंमत नाही. आपल्याला खरा धोका पश्चिमी देशांकडून आहे. बघा ना! आपल्या वीजेचे हाल ते देश जसे करतात, तसे या देशात वीजेला कामाला जुंपत नाहीत. नाईलाज झाला

तरच हे लोक विज्ञानात प्रगती करतात नाहीतर देवपूजा, धर्म, जप, रूढी, या वांझ गोष्टींमधे वेळ घालवत बसतात. जे काही पाचपंचवीस वैज्ञानिक इथे जन्मतात ते परदेशात जाऊनच स्वतःची उन्नती करतात. ' श्रेष्ठींच्या या आश्वासक बोलण्यावर सारे ढग आनंदाने पांगले. वृध्द मेघांचं बोलणं खरं ठरलं. जग पाहिलं होतं ना त्यांनी!

काळ सरला. छोटे ढग मोठे झाले. मोठे ढग विरळ झाले आणि वृध्द ढग संपून गेले.

अमेरिकेत, विमान बनवण्याच्या ध्यासाने वेड्या झालेल्या दोन बंधूंनी एक दिवस उडणारं विमान बनवण्यात यश मिळवलं. त्यांचं नाव राईट बंधू. तंत्रज्ञानावर तन-मन-धन खर्च करून १९०३ साली या बंधूंनी नॉर्थ कॅरोलिनातील किटीहॉक या गावातून अंतराळात उडणारं पहिलं विमान बनवण्याचा हक्क प्रस्थापित केला. राईट बंधूंच्या या संशोधनाचं महत्व ओळखून अमेरिकेतील व्यावसायिक लगेच या उद्योगात शिरले. आधी बोईंग नावाचे उद्योजक यात उतरले. पहिली नागरी सेवा १ जानेवारी १९१४ मधे फ्लोरिडामधे टॅम्पा ते सेंट पिटर्सबर्ग अशी सुरू झाली. वीस मिनिटांच्या या प्रवासाचं तिकीट होतं ५ डॉलर्स. पाठोपाठ हेन्री फोर्ड, कर्टिस यांच्यासारखे उद्योजक काळाची पावलं ओळखून या व्यवसायात शिरले.

या व्यवसायाने मग गगनभरारीच घेतली. कोट्यावधी लोकांच्या रोजगाराची सोय केली. लोखंड, पोलाद, अल्युमिनियम, इंजिनं, आसनं, दिवे, पंखे विमानतळ, धावपट्टी, खाद्यसेवा, तिकीटबुकींग, विमान चालकांना प्रशिक्षण, हवाई सुंदऱ्यांच्या कार्यशाळा, अशा हजारो कंपन्या उघडल्या गेल्या. अमेरिकेच्या आर्थिक विकासाला विमानाची गती आली. वेळेची बचत या संकल्पनेने या व्यवसायाला आणखीनच उभारी दिली.

अमेरिकेच्या आधी दहा वर्ष ही सुबत्ता आपल्याकडे येऊ शकली असती..

विमानांच्या प्रगतीमुळे ढगांची अवस्था वाईट झाली. त्यांच्या घरघर आवाजांमुळे रात्रीची शांत झोप हरवली. सावधपणे विहरावं लागलं नाहीतर विमानाशी टक्कर व्हायला लागली. जगभर फिरतांना याच मेघांना एक दिवस आगीच्या प्रचंड लोळात काळ्या दाट धुरांची घनदाट वर्तुळं श्वास कोंडून गेली. दुसरे दिवशी अणु बॉम्बने नाश पावलेली नागासाकी-हिरोशिमा ही वेदनेने विव्हळणारी नगरं दिसली. हा पण मनुष्याने लावलेला शोधच होता म्हणे! हीसुध्दा प्रगती? कुठे गेला हा मानव? सारे ढग काळजीत पडले. कालांतराने त्यांनाही विमानांची सवय झाली. कधी विमानांशी सलगी

करुन पेंगणाऱ्या प्रवाशांना उठवू लागले. त्यांचे पट्टे बांधण्याची तारांबळ पाहून गडगडाट करत हसू लागले. खिडकीतून आपल्याकडे पाहणाऱ्या इवल्याशा चेहऱ्यांना डोळे मिचकावून घाबरवू लागले. कधीकधी महाकाय गजघनांना आणि बेभान वाऱ्यांना भांडतांना पाहून विमानं चुपचाप आपल्या जागेवर निमूटपणे उभी राहू लागली.

जग उठलं, तेव्हा भारतीयांना उठावंच लागलं. परकी विमानं देशात संचार करू लागली. या देशातील चारदोन चळवळ्या वैज्ञानिकांना आणि उद्योजकांना या विमानांची ओढ लागली. त्यांनी वीज आणली, विमानं आणली. आधी फक्त धनिकांसाठी असणारी विमानसेवा हळूहळू सर्व आर्थिक स्तरांमधे पसरू लागली. विमानतळ उभारणीला संथ गतीने वेग आला.

एक दिवस अरबी समुद्रावरून येणाऱ्या शुभ्र ढगांना विमानतळावर काहीतरी गडबड दिसली. लोकांचे तांडे जातयेत होते. विमानतळ झगमगत होता..मंद सुटलेला वारा त्या जागेवरची बित्तंबात माहिती मेघांना देऊ लागला. खाली विमानतळाचा नामकरण सोहळा चालू होता म्हणे. मुंबई विमानतळ म्हटल्याबरोबर काही प्रौढ ढगांना बालपणीची वडिलांनी सांगितलेली आठवण आठवली. त्यांना शिवरामबापू तळपदे नाव आठवलं. जे.आर. डी. टाटा नाव आठवलं. या दोन्हीतून कुणाचं तरी नाव येणार अशी अटकळ त्यांनी बांधली. पण दुसरंच नाव वाचायला मिळालं.

पांढऱ्या वृध्द ढगांना आपल्या पणजोबांच्या वाक्याची आठवण झाली. प्रत्येक देशातील राष्ट्रप्रमुखांचीच नावं जगभरच्या विमानतळांना दिलेली तुम्हाला दिसतील.. राईट बंधूंचं नाव कुठेही तुम्ही वाचणार नाही..इथेतर संशोधनालाही वाव नाही.

मंद मंद हसत पांढरे ढग काळ्या अंधारात नाहीसे झाले.

# साधीच गोष्ट.

त्या वेड्या मोठ्या कलाकाराने गंभीर गुन्हा केला होता. जागतिक कीर्तीच्या त्या कलंदर चित्रकाराने आपल्या साहेबांच्या क्लबमधे त्यांचा ड्रेसकोड वापरला नव्हता.मूर्ख! साध्या चपला घालून गेला होता, हा केवढा गुन्हा! धारिट्य तरी कसं झालं त्या यःकश्चित चित्रकाराचं? हाकलला त्याला त्या चालकांनी..बरं झालं. शिस्त मोडली, शिक्षा झाली.

खरं तर कितीतरी भारतीय शिस्तीचे, सभ्यतेचे संकेत या जागतिकीकरणात मोडत आहेत. त्याला हेच अमेरिकेतील परदेशी कारण आहेत. म्हटलं तर गोष्ट साधीच होती. अमेरिकेतून मैत्रिणीच्या मुलीची मेल आली. '' आम्ही पंधरा दिवसांनी मुंबईत पोचतो आहोत, तुझ्याकडे मी आणि अजय येऊन जाऊ. '' सरळ साधी गोष्ट होती पण कोडं पडलं ते वेगळंच. हा अजय कोण? नवरा, की मुलगा, की मित्र, की आणखी कुणी नातेवाईक, की ऑफीसमधला एखादा तिचा कलीग? परत, विचारायचं तरी कसं? आपली मुलं इतक्या लांब राहतात की त्यांची नावं माहीत असतात, पण त्यांच्या मुलांची नावं लक्षात राहतातच असं नाही. ती काय शिकतात तेही माहीत नसतं.

आता वाट पाहण्याशिवाय गत्यंतरच नव्हतं.

मनात विचार आला की हा जुना काळ असता तर असं झालं असतं का? नक्कीच नाही. मागच्या म्हणजे आमच्या पिढीपर्यंत सगळ्या रीतीरिवाजांना एक शिस्त होती, म्हणजे कोड ऑफ कंडक्ट म्हणा हवं तर. एक तर पत्राने मजकूर यायचा. चिरंजीव, तीर्थरूप, सौभाग्यवती, अशी त्यांना विशेषणं असायची. म्हणजे मग हा अजय का कोण तो, चि. आहे की श्री. आहे की तीर्थरूप आहे हे न विचारता, संभ्रमात न पडता कळायचं. साधी पत्र लिहायची गोष्ट पण त्यालासुद्धा किती नियम होते! पत्राच्या वरती '' श्री '' लिहायचं आणि कोपऱ्यात '' क्षेम '' लिहायचं, म्हणजे वाचायचा मजकूर शुभ वर्तमानाचा हे कळायचं. निधनाची वार्ता असेल, तर श्री नाही, कोपऱ्यात

क्षेम नाही, जे गेले त्यांच्या नावाच्या आधी कै. लिहायचं म्हणजे कुणाचा मृत्यू तेही न वाचता समजायचं. लग्नाचं आमंत्रण असेल तर त्या कार्डालाच कुंकवाचं बोट लागलेलं असे. त्यामुळे पत्र वाटणाऱ्या रोज येणाऱ्या पोस्टमनलाही घराघरातली नाती माहीत व्हायची..आता सोसायटीच्या खाली लागणाऱ्या डब्यांमधे पत्र येऊन पडतात.. त्याच्याशीही नातं मोडलं..

पत्रातली नातीही स्पष्ट कळायची. ती. सौ. वहिनी म्हणजे मोठी वहिनी, चि. सौ. वहिनी म्हणजे धाकटी भावजय, अण्णा-दादा-अक्का-ताई म्हणजे मोठे भाऊ, बहिण...वन्सं म्हणजे नणंद...भाऊजी म्हणजे दीर...सगळी नाती सोपी होऊन जायची. आता सगळं मोडलं. का मोडलं तर उत्तर नाही.. उगीचच मोडलं..आता नातीही कमी झाली. मावशी-मावस बहीण आहे तर मामा–मामेभाऊ-बहीण नाही, चुलत भाऊ असेल तर आत्या नाही, मग आत्तेभाऊ-बहीण आपोआपच नाही..मामाच्या गावाला जाऊया नाही.. काहीच नाही. ..कारण आता मामा आणि भाचे कुठल्या ना कुठल्या टूरबरोबर सगळे ट्रॅव्हल करतात. नाहीतर मामा अमेरिकेत असतो, आणि आत्या इंग्लंडमधे. काका दुबईमधे तर मावशी भारतात.

ही शिस्त फक्त पत्र लिहिण्यातलीच नाही. जेवणाच्या मेन्यूतही होती. रोज साधंच जेवायचं. भात-भाजी-पोळी-आमटी-कढी वगैरे... त्यातून रोजच्या रोज प्रोटिनस्, व्हिटॅमिनस्, कार्बोहायड्रेटस् जायचेच. दर महिन्यात एका सणाची योजना केलेली होती, ज्याने प्रत्येक महिन्यातला एक दिवस तरी गोडाचा होतच असे. जानेवारीत म्हणजे पौषात संक्रांत. तेव्हा गुळाची पोळी, तिळाचे लाडू, फाल्गुनात मार्चमधे होळी तेव्हा पुरणपोळी, १५ दिवसात चैत्र लागला की पाडव्याला श्रीखंड आणि चैत्र-वैशाख आंबरसाचा, वैशाखात लग्नसराई सुरू झाली की जिलबी, ती ज्येष्ठात संपायची. श्रावणात नागपंचमीला दिंड, नारळीपौर्णिमेला नारळीभात, भाद्रपदात मोदक, घावन-घाटलं, पेढे, पंचखाद्य. अश्विनात दसरा उजाडला की श्रीखंड. आणि मग दिवाळीच दिवाळी. उन्हाळयात पन्हं, कोकम सरबत, कोजागिरीला मसाले दूध. वर्षभर सगळी पक्वान्न खाऊ

कामाच्या ठिकाणी सायकल मारत गेलं की जिम चा वेगळा खर्च नव्हता. बाहेरचं जेवण तर नाहीच. परिस्थिती बदलत गेली आणि नोकरीनिमित्त बाहेर जेवायची वेळ यायला लागली. पोळीभाजी मिळायची गरज वाढली. प्रत्येक प्रसंगाला साजेसे पदार्थ केले जात. पानात वाढलेल्या पदार्थांवरून अवचित आलेल्या पाहुण्याला घरात काय समारंभ चाललाय ते न विचारता कळायचं.. सत्यनारायण करून पंगत बसली असेल तर केळं घातलेला साजूक तुपातला शिराच दिसणार,

श्रावण शुक्रवारची सव्वाष्ण जेवायला आली असेल तर पुरणपोळीच खावी लागणार, उगीचच खीर बनणारच नाही. घरात श्राद्धाचं जेवण लोक जेवत आहेत, हे त्या पानात वाढलेल्या पदार्थांकडे पाहून विचारावंच लागत नसे. जेवणाच्या पंक्तीत रमावं असे ते पदार्थ नसायचेच. लग्नाच्या पंक्तीतही सीमान्त पूजनाला ठरलेले पदार्थ आणि लग्न लागल्यावरही ठरलेले पदार्थ. ‘‘ जेवायला चला ’’ असं यजमानांनी म्हटल्याशिवाय लोक पानावर यायचे नाहीत..

शाळेतून संध्याकाळी घरी आल्यावर खेळायला जायचं, दिवेलागणीला घरी यायचं, ज्यांच्या घरात खेळ रंगात यायचा त्या घरातले वडील कामावरून घरी आले की खेळणारी मुलं कुणीही न सांगता आपापल्या घरी जायची.. घरी आल्यावर परवचा म्हणायचा..पाढे म्हणायचे..तोपर्यंत जेवणाची वेळ यायची...

आता संध्याकाळ पाढे म्हणण्यात जात नाही. एकदा फुलवालीकडून एक डझन गजरे घेत असतांना ती बाई चार रुपयाला तीन गजरे देत होती म्हणून तीन रुपयांना चार मागितले. तर शेजारी कॉलेजमधे जाणारी मुलगी म्हणाली, तीन रुपये काय-चार रुपये काय- घासाघीस कशाला करता?..लगेच लक्षात आलं की या मुलीने पाढे कधी म्हटलेलेच नाहीत . नाहीतर १६ रुपयाचे गजरे मी ९ रुपयांना मागितले होते..पण त्या अशिक्षित बाईला लगेच लक्षात आलं... एवढे कमी नाही म्हणाली...कारण एकच...आता मोबाईलवर सगळं मिळतं, फक्त बटण दाबायचं..आता फोन नंबर मोबाईलवर सेव्ह केलेला असतो, मागच्या पिढीने तो डोक्यातल्या मेंदूमधे सेव्ह केला.. तो मेंदू लहानपणच्या पाठांतराने सतत चार्ज केला. त्याची बॅटरी एकदाच आयुष्याच्या शेवटीच डिसचार्ज होणार..पण आताच्या मुलांना इंटरनेटमुळे विश्वाचं ज्ञान सहज क्षणात उपलब्ध होतं. संगीत असो, ओरेगामि असो वा खाद्यपदार्थ असोत, सगळं त्यावर शिकायला मिळतं, त्यासाठी आई-आजी-पणजी यांच्याकडून आलेलंच ज्ञान लागतं असं नाही. पंचाईत तेव्हाच होते जेव्हा तुरीची आणि चण्याची डाळ कशी ओळखायची याची वेळ येते तेव्हा. कारण त्यातला फरक बघायची वेळ आलेलीच नसते. पांढरी वाफ आली की भात झाला असं सांगणारी आई आता लागत नाही कारण भात कुकरातच शिजतो. या बारीक बारीक टिप्स पुस्तकातही नसतात. मग मुलं परदेशात शिकायला आणि एकटी राहायला निघाली की मग मात्र धांदल उडते. अमेरिकेत ओबामा यांनाही ब्रेड-ऑम्लेट करून खाता येतं कारण ते अठरा वर्षांनंतर एकटे राहिले. आपली इस्त्री आपण करणं, आपले कपडे आपण धुणं ही कमी दर्जाची कामं ही आपली मानसिकता.

गोष्ट साधीच म्हणजे आपलं काम आपण करणं हे खालच्या पातळीचं काम आहे ही मानसिकता बदलण्याची....

शिस्त आणि गुरु यांचे संस्कार आणि धाक असलेले विद्यार्थी हाच शिक्षणाचा पाया होता. भीमसेनजींच्या गुरूंनी त्यांच्या गाणं शिकण्याच्या ध्यासाची परीक्षा घेण्यासाठी सहा महिने त्यांना फक्त नदीवरून पाणी आणायचं काम दिलं. ते करूनही हा विद्यार्थी टिकलाय हे पाहून मगच त्यांच्या शिक्षणाला सुरूवात केली. मानसिक फाजील लाड करण्याचे ते दिवस नव्हते. गुरूची भीती ही चुकीचं काम करतांना धाक असावा म्हणूनं असे. आणि गुरु आपलं भलंच विचारात घेतात यावर श्रद्धा असल्याचा काळ. गुरुही तसेच पु. लं. च्या चितळे मास्तरांसारखे. त्यांनी कधी संप केलेला मात्र आठवत नाही. अगदी गरीबीत राहात असले तरी!

आपल्या भाषेची संपदा तरी किती मोठी. शब्दांचीसुद्धा किती विचारपूर्वक योजना केली जायची...नेमके शब्द बोलतांना वापरले जायचे.. तू, तुम्ही, आपण..अरे..अहो..माणसाच्या पात्रतेप्रमाणे शब्द..नुसतं फोनवरून आपण कधी याल असं म्हटलेलं ऐकलं तरी कुणीतरी मोठ्या हुद्याचा किंवा, मोठ्या वयाचा माणूस पलिकडे आहे हे सांगता समजायचं...आता मोठ्या मोठ्या यशस्वी, लोकांच्या मुलाखती घेतांना मुलाखतकार ‘‘ तुम्ही-आपण असा उल्लेख करत नाही..आपल्या शब्दांना संदर्भ तरी किती वेगवेगळे...डोकं एकच पण मस्तक जे टेकवतो, टाळकं जे फोडायला वापरतो, -शीर जे लढाईतच उडतं,—डोंबल-जे बौद्धिक पातळी दाखवतं, डोकं जे दुखतं,.. प्रत्येक ठिकाणी संदर्भ वेगळा.

कपडे वापरतांना घरात सुती, बाहेर नायलॉन, सणांना रेशमी..लग्नांना जरीकाठी असे वेगवेगळे धागे अंगावर असत. नाटकाला जाणं असो, प्रवास असो, समारंभ असो..आता फक्त जीनस्. त्यावर पानं फुलं-नक्षी ..जगभर सगळीकडे एकच धागा..‘‘आता हेच चालतं..ह्याचीच फॅशन आहे ’’ या वाक्याचा..

गोष्ट साधीच.....सुटत चाललेल्या शिस्तीच्या, नियमांच्या संस्कृतीच्या धाग्यांची..समाजाचा प्रवाह सतत बदलणारच..भाषा बदलणारच..आचार विचार बदलणारच..पण आजवर चालत आलेलं म्हणजे जुनं आणि जुनं म्हणजे फक्त टाकाऊ हा मानसिकतेचा धागा मात्र जळमटासारखा वाटतो..

# जिवलग.

पुस्तक प्रदर्शनाला जाणं हा एक मोठा आनंद असतो. वर्तमानपत्रात जाहिरात आली की प्रदर्शनाला जायचं. हॉलच्या बाहेर आपली पिशवी, सामान ठेवायचं. प्रवेशद्वारात उभं राहून आत नजर टाकली की टेबलांची लांबलचक रांग नजरेला पडते. अशा अनेक रांगा असतात. सर्व टेबलांवर पांढऱ्या चादरी घातलेल्या असतात. त्यावर पुस्तकांची रास रचलेली असते. दालनभर अनेक जाहिराती फडकत असतात. चादरींवरही खालच्या बाजूला जाहिरातींचे कागद अडकवलेले असतात. रंगीबेरंगी मुखपृष्ठांनी नटलेली पुस्तकं ढिगांनी टेबलावर विसावलेली असतात.

तीच नजर मग दालनात जमलेल्या वाचन प्रेमींवर फिरवायची. टेबलाजवळच्या जथ्याचा अंदाज घेतला की त्या ठिकाणी कोणत्या विषयावरची पुस्तकं असतील याचा अंदाज लगेच येतो. मुलांना घेऊन आलेल्या माता जिथे, तिथे बाल वाङ्मयावरची पुस्तकं नक्कीच. तरुण मुलामुलींचा घोळका म्हणजे संगणक-बिझिनेस, मॅनेजमेंट, सायन्स नाहीतर इंग्लीश लिटरेचर असणं खात्रीचं. जिथे मंडळी तुरळक तिथे ज्योतिष, धर्मशास्त्र, या विषयावरची पुस्तकं असणार हे निश्चित. पुरुष-महिला-तरुण-तरुणी जिथे दंग झालेले दिसतील त्या टेबलावर नक्कीच असणार सिनेमा क्षेत्रातील गुळगुळीत पुस्तकं आणि मासिकं... कामसूत्रावरच्या पुस्तकाला मात्र हातात घेऊन चाळत बसण्याचं धाडस कुणीच करत नाही.

इसापनीती ते कामसूत्रापर्यंतची पुस्तकं इथे दाटीवाटीने बसलेली असतात. या मेळाव्यात आपणही खालच्या मानेने पुढे पुढे सरकत असतो. आपल्या पुढेमागे कोण आहे हे पाहण्याचीही आपल्याला फुरसत नसते. नाकावरचा चष्मा एकसारखा वर ओढत लोक पुस्तकं हातात घेतात. त्याची किंमत पाहतात, पानं उलटून जरा चाळतात, लेखकाचं नाव पाहतात आणि मग पुस्तक घ्यायचं की नाही ते ठरवतात. नको असलेल्या पुस्तकाच्या अंगावरून लोक पटकन पुढे सरकतात. पुरुष कलाकुसरीच्या विषयावरच्या पुस्तकांकडे ढुंकूनही पाहात नाहीत. कधीकधी

एकादं पुस्तक असं दिसतं की ते कधीपासून आपल्याला घ्यायचं असतं आणि या ठिकाणी ते कमी किंमतीला मिळत असतं.

पुस्तकांनी भरलेलं ते दालन म्हणजे लेखकाने आयुष्यभर अभ्यासलेल्या विषयाचा तो ज्ञानसागरच असतो. त्यातही सरस्वतीची कृपा हवीच, त्याशिवाय लेखनाची भट्टी कशी जमणार? म्हणूनच शब्दकोश लिहिणारे मोठे लेखक असतातच असं नाही. त्यातून लक्ष्मीदर्शन होण्याचा योग दुर्मिळच.. पुस्तक हे लेखकाचं अपत्यच असतं. पण ते अपत्य उजवायला बाजारात उभं राहिलं की कळतं की हे काम किती कठीण आहे ते! कारण इथे कोणतंही ‘‘ रोहिणी मासिक ‘‘ नाही, ज्यात आपल्याला योग्य स्थळ आपोआप मिळेल. फार उपकार करून पुस्तकाला उजवणारं कुणी भेटलं की ते अपत्य त्यांच्या ताब्यात जातं आणि त्याचं प्रगतीपुस्तक कधीही लेखकाला कळत नाही. हे सगळं अनुभवलं तरी लेखकांचे हात परत सुरसुरायला लागतात. परत प्रसूतीच्या आनंदाच्या वेदना.. अपत्यांची संख्या जितकी मोठी तितकी लेखकांची प्रतिष्ठा मोठी. इथे संतती नियमनाचा नियम लागू होत नाही. ज्ञानपीठ पुरस्कार, नोबेल पुरस्कार किंवा जगातील सर्व भाषांमधे अनुवाद होणं हे त्यांचे यशाचे मापदंड..

अनुवाद करणं आणि होणं ही वेगळीच प्रतिभा..जगातील उत्तम साहित्याचा परिचय यांच्यामुळे रसिक वाचकांना होतो. या साऱ्या अपत्यांचा एकच धर्म.. तो म्हणजे लेखकाचे विचार, कवीच्या कल्पना, विद्वानांचे विचार, विचारवंतांचे अभ्यास, व्यथांच्या कथा जनमानसात रुजवणं..अनुवादांमुळेच सिंडरेला, जिम कॉर्बेट शेरलॉक होम्स जगाला माहीत झाले. साहित्यसंमेलनं ही अशा प्रतिभावंतांच्या अनुभूतीच्या प्रगटीकरणाचा सोहळा असतो. म्हणूनच पुस्तकासारखा दुसरा मित्र नाही. त्याला चहापाणी करावं लागत नाही. त्याला मधेच मिटलं तर मानापमानाचा रुसवा फुगवा होत नाही. वाचतांना डुलकी लागली आणि हातातून ते गळून पडलं तरी रडारड नाही. चिरफाड झाली तरी दुःख नाही. घराबाहेर काढलं तरी आपल्याच हातावर रद्दीचे चार पैसे मोठ्या मनानं आपल्या हातात ती पुस्तकं ठेवतात.

पुस्तक विश्वातही बौध्दिक स्तर आहेत. ग्रंथ, खंड, पुस्तक, पुस्तिका चोपडी ह्या वेगवेगळ्या पातळ्यांवर त्यांचा रुबाब ठरतो. कादंबरी, कथा, विनोदी कथा-रहस्यकथा,समीक्षा-गूढकथा-नाट्यछटा- चरित्रं-पत्रं-सिनेसंगीत-अश्लीलकथा-अनुवाद-डिक्शनरी-निबंध-इतिहास-कविता-पंचांग अशा अनेक भेदांवर ही पुस्तकं जीव धरतात.

या क्षेत्रातील बुलंद दरवाजे म्हणजे ॲगाथा ख्रिस्तीच्या रहस्यकथा, अरेबियन नाईटस्, इसापनीती- पंचतंत्र-शेरलॉक होम्स आणि जिम कॉर्बेटची नरभक्षक वाघांवरच्या कथा. शेक्सपियर, टॉलस्स्टॉय हे या क्षेत्रातील दीपस्तंभ. त्यांना मागे टाकणारं साहित्य अजून जन्मलेलं नाही. भेट द्यायला पुस्तकासारखं वाण नाही आणि ते घरात आलं की करमणूक आणि ज्ञानवर्धनाला वाण नाही. व्यास-कालिदास, हे भारतीय साहित्यातील सूर्यचंद्र. जिम कॉर्बेटला मारुती चितमपल्ली, वुडहाऊसला पु.ल., गंगाधर गाडगीळ, डॅफोडिल्सला श्रावणमासी ही भारतीय उत्तरं आहेतच. ज्ञानोबा-तुकोबा-यांच्यासारखं संतसाहित्य जगात कुठेही जन्मलं नाही. रामायण-महाभारतासारखं साहित्य जगात कुठेही नाही.

घरातील पुस्तकं घराचे संस्कार दाखवतात. ती मग मौल्यवान बनतात. घरातील लोक त्याला मुलांसारखं जपतात. उशीरा घरी परतणाऱ्या मुलाची जशी पालक लोक वाट पाहतात, तशीच वाट पाहणं असतं ते वाचायला नेलेलं पुस्तक परत घरी येईपर्यंत ..हीच पुस्तकं मग घरातील वृध्दांसारखी पिवळी पडतात, आणि रद्दीच्या दुकानात वृध्दाश्रमात जातात. मग कुणीतरी वाचक वेडा तिथे येतो आणि जुनं पुस्तक स्वस्तात मिळाल्याच्या आनंदात त्यांना घरी घेऊन जातो. प्रसिध्दी आणि लेखक यांचं नातं व्यस्त प्रमाणाचं असतं. गीतांजली सर्वांना नोबेल मिळाल्यामुळे माहीत पण कुणी वाचलंय? त्याउलट येरे येरे पावसा सर्वतोमुखी पण त्याचा कवी कोण हे आजपर्यंत कुणाला माहीत आहे? १०० टक्के जगप्रसिध्दी या जगात कुणाला मिळाली आहे? जोपर्यंत अंध आहेत तोवर अगदी सूर्यालाही नाही. वायूला मात्र आहे पण तोच दिसत नाही कुणाला..

लायब्ररी हा शब्द लिबर या लॅटीन शब्दापासून निघाला आहे. सर्वात जास्त पुस्तकं अलेक्झांड्रियाच्या पहिला पोलोमी या राजाच्या वाचनालयात होती. त्याच्या मुलाने त्यात आणखी भर घातली. त्याच्याकडे चाळीस हजार स्क्रोल होते असा उल्लेख आहे. जगातील पहिल्या लायब्ररीची नोंद आहे ती मेसोपोटेमियाच्या लायब्ररीची. त्यात ५००० पुस्तकं होती. त्या काळात कागदाचा शोध लागला नव्हता म्हणून ती मातीवर लिहिलेली होती. भारतात नालंदा विद्यापीठ आणि त्याचं ग्रंथालय हे विख्यात होतं.

आपण श्रुती-स्मृती-पुराणोक्त संस्कृतीतले. सगळ्याचं पठण करायचं आणि ते ज्ञान पुढच्या पिढीला द्यायचं म्हणूनच आपण बहुश्रुत आणि युरोपिय देशात वेल रेड असा शब्द निर्माण

झाला आहे. महाभारतात लिपी सर्वांना येत नसावी म्हणून पांडवांनी शमीच्या झाडावर आपली शस्त्रं ठेवली तेव्हा ओळखता यावीत म्हणून खुणा करून ठेवल्या. नकुलाने सुवर्णाचे सूर्य काढले. सहदेवाने सोन्याचे दागिने काढले. भीमाने आपल्या बाणांना अर्धचंद्राकृती आकार दिला, तर अर्जुनाने सर्पाकार शर केले.

व्यासांच्या काळात लिपी आली असणारच. गणपतीने व्यासांचं एवढं महाभारत लिहून काढलं पण त्या लिपीबद्दल काहीच उल्लेख ठेवला नाही. लिपीच्या शोधानंतर भूर्जपत्र, शिलालेख, ताम्रपट, या पायरीने नवीन शोध लागत गेले आणि शाई आणि कागदाचा शोध लागला. ग्रंथालयांचा उदय झाला. ग्रंथालयं म्हणजे ज्ञानाची सरोवरं. तांदळावर लिहिण्याचा उपक्रम कुणी केला पण त्यांची सार्वजनिक वाचनालये होणं शक्य नाही.

अशा ग्रंथालयांना सांभाळायला सरकारकडे पैसा नाही ही बातमी वाचली. नवकोट नारायणांच्या मुंबईत ग्रंथालयांच्या देखभालीसाठी कुणीही दाता मिळू नये याची खंत वाटली. जेव्हा लायब्ररीतील पुस्तकांची पानं कुणी फाडून नेलेली असतात तेव्हाही असंच वाईट वाटतं. इतर अनेक मुलांचं केवढं नुकसान होतं..पुस्तकं आणि ग्रंथालयांचा आता किती काळ शिल्लक आहे? भविष्यात ग्रंथालयांचं अस्तित्व राहणार नाही याचीही जाण आली. इ-बुक आलं. त्यामुळे प्रकाशन संस्थांचे सुगीचे दिवस संपतील. आता हस्ताक्षर नामशेष होणार. वह्या-पेन्सिली-पेन-शाई-खोडरबर सगळंच काळाच्या प्रवाहात वाहून जाईल. प्रेमाच्या माणसांची जुनी पत्रं काढून वाचत बसण्याचा आनंद संपणार. अक्षरास हसू नये हा पु.लं.चा विनोद कालबाह्य होणार. नाहीतरी समोरच्या खिडकीतील व्यक्तीशी बोलण्याची परंपरा संगणकाच्या विंडोने घेतली आहेच. संजय उवाच आणि मारूततुल्य वेगम् ही संकल्पनाही मोडीत निघेल कारण त्याचा प्रतिस्पर्धी संगणक क्षणात जग जवळ आणतो.

पुस्तकंच नाहीत तर ग्रंथालयं कुठे राहणार? मग एक दिवस सरकारचा वाचनालयांना पैसा पुरवण्याचा प्रश्न आपोआप नाहीसा होईल.

# वादळयोग.

ग्रह,नक्षत्र,तारे यांनी वेढलेल्या या धरेवर माणूस त्यांचा अभ्यास सतत करत असतो. वर्तमानपत्रातलं भविष्य कितीही खोटं आहे हे माहीत असलं तरी त्याच्यावरून नजर फिरतेच. कारण त्यांचा या पृथ्वीतलावर होणारा परिणाम रोज आपण पाहात असतो. सूर्यफूलाला संध्याकाळी पश्चिमेकडे कोण वळवतं? मृग नक्षत्रावर आकाश आणि धरेला जोडणाऱ्या पाऊस धारा कशा बरसायला लागतात? नुसता सूर्य मावळायला लागला तरी मनात हुरहूर कोण जागवतं? चांदण्यात, गुरगुरत बसलेल्या समुद्रासमोर एकटं बसलं की मनाची अवस्था काय होते ते काय सांगायला पाहिजे? हे आकाशमंडलातील अतिरथी महारथी नक्कीच प्राणीमात्रांवर परिणाम करत असणार, नाहीतर जंगलात मुक्तपणे फिरणाऱ्या एखाद्या वाघाला, सिंहाला सर्कशीत काम करण्याचे आणि मग पिंजऱ्यात जाऊन बसण्याचे दयनीय भोग का यावेत? हंटरच्या फटक्याच्या आवाजाने लगेच स्टूलावर चढून बसण्याची पगारी नोकरी का करावी लागते? मग सर्कशीच्या पगारावर काम करणारे वाघ-सिंह आणि सर्कस फेम दामू धोत्रे यांची पत्रिका सारखीच का? रेसच्या घोड्याची पत्रिका केली जाते म्हणतात, मग या प्राण्याच्या पत्रिका बघितल्या आहेत का कुणी?

सततच्या अभ्यासाने माणसाने मग एका कागदावर एकमेकांना छेदणाऱ्या रेघा काढल्या. त्यात र.चं.मं,बु,गु.शु,श.रा.के. अशी थोर थोर मंडळी बसवली. आपल्या मोठ्या मोठ्या कड्यांसह अवकाशात हिंडणारा तो महाकाय गुरु जेव्हा इवल्याशा चौकोनात अंग चोरून कुणाच्या पत्रिकेत बसतो तेव्हा त्याची दया येते. कुणाच्या पत्रिकेत लोकलच्या डब्यातल्या गर्दीसारखे सगळे ग्रह एकाच घरात दाटीवाटी बसलेले असतात तर कुणाच्या पत्रिकेत एकएका घरात एकएक ग्रह आरामात बसलेले असतात, आणि ते एकमेकांकडे किंवा आपल्या मालकाकडे वक्र नजरेने पाहात बसलेले असतात. ज्या जागी बसू नये तिथे जाऊन बसतात, आणि मग त्या माणसाच्या आयुष्याचा लोचा होतो. दरोडेखोर आणि पोलिस दोघेही साहसी, दोघेही हातकड्या-तुरुंगाच्या जाळ्यात अडकलेले, मग त्यांची पत्रिका वेगळी कुठे होते? नील आर्मस्ट्राँगच्या पत्रिकेतील चंद्र कुठे आणि कसा चमकला? राजयोगाचे आणि अधिकारपदाचे ग्रह कोणते कळायला राबडीदेवी आणि

लालूजींच्या पत्रिकांचा अभ्यास केला तरी पुरे! स्वर्गातील शापित अप्सरा पृथ्वीतलावर येऊन शिक्षा भोगून गेल्या हे पुराणकथांमधे खूपवेळा वाचलंय..प्रत्यक्षात पाहिलेली इंग्लंडची युवराज्ञी डायना हिची कथा तरी वेगळी होती का? परीसारखी सुंदर आणि तशीच शापित अप्सरेचं प्राक्तन घेऊन आलेली डायना पतीप्रेमापासून वंचित राहून अचानक निघून गेली. इंग्लंडच्या गादीला दोन वारस देऊन निघून गेलेली डायना आणि महाभारतातील शंतनूला वारस देऊन निघून गेलेली गंगा यांच्यात फरक कुठे होता.? दोघींच्या पत्रिका सारख्याच होत्या का? वाहन सौख्य सर्व देवतांना आहे. शंकराचा नंदी, गजाननाचा उंदीर, विष्णूला गरूड, सूर्याला घोडे, पण भटकंती करत तिन्ही लोकात हिंडणाऱ्या नारदमुनी मात्र पायपीट करत हिंडतांना दिसतात. बिचारे नारदमुनी.

जसे तारे ग्रहांचे स्वभाव, तेच माणसाचेही, कुणी धूमकेतूसारखा येतो. चहा तयार करून बाहेर न्यावा तर तो धूमकेतू निघून गेलेला असतो. कुणी चंद्रासारखं शीतल स्वभावाचं. कुणी शुक्रताऱ्यासारखं सुंदर-देखणं, बघत राहावंस वाटणारं, कुणी मंगळासारखं लाललाल इंगळ्यांच्या डोळ्यांसारख्या रागीट स्वभावाचं. या पत्रिकांमधे ताटकळणे योग, पक्वान्नयोग, प्रवासयोग, पंक्चरयोग असे अनेक योगही असतात..

त्यातलाच एक योग वादळयोग, आणि तो झंझावाती योग ठासून भरलेल्या पत्रिकेचं नाव विनायक दामोदर सावरकर. जन्मभर घोंघावत राहणारं हे वादळ भरतभूमीवर नाशिकजवळ भगूर नावाच्या गावात २८ मे इ. स. १८८३ मधे जन्मलं, घुमायला लागलं, इंग्लंडच्या किनाऱ्यावर जाऊन आदळलं, फ्रान्सच्या किनाऱ्यावर मोकळं झालं आणि मग काही काळ अंदमान बेटावरच्या तुरुंगात बराकीत काळ्या पाण्याची शिक्षा भोगत दडपलं गेलं. तिथून मोकळं झाल्यावर रत्नागिरीच्या समुद्राजवळ विसावलं. मग शिवाजीपार्कमधे स्थिरावलं आणि शमलं. सतत समुद्राच्या सानिध्यात वावरलं, इंग्लंडमधील ब्रायनच्या किनाऱ्यावर सागराची आर्जवं करणारी अजरामर कविता करून संपलं.

शिक्षणासाठी वि.दा. सावरकर नाशकातून पुण्याला आले. १८९६ साली रँडसाहेबाच्या अत्याचाराने गांजलेल्या पुणेकरांचा क्षोभ पराकोटीला गेला आणि त्यातूनच चाफेकर बंधूंनी रँडसाहेबांना मृत्यूदंडाची शिक्षा दिली. या घटनेतून प्रेरणा घेऊन सावरकरांनी १८९८ मधे १५ व्या वर्षी आपल्या कुलदेवतेसमोर शपथ घेतली. ‘‘ माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी सशस्त्र युध्दात शत्रूला मारत चाफेकरांसारखा मरीन किंवा शिवरायांप्रमाणे विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या

मस्तकी स्वराज्याचा अभिषेक करीन .‘‘ या शपथेपासून सावरकर आयुष्यभर तसूभरही ढळले नाहीत. तुजसाठी मरण ते जनन,तुजविण जनन ते मरण हे अग्निव्रत स्वीकारलं. जयोस्तुते महन्मंगले हे ओजस्वी अमर सर्वतोमुखी असलेलं काव्य त्यांनी वयाच्या विसाव्या वर्षी लिहिलं.

१ जानेवारी १९०० साली त्यांनी मित्रमेळाव्याला सुरुवात केली आणि क्रांतिबीजांची पेरणी तरुणांच्या मनात रुजवायला सुरुवात केली. इटलीतील क्रांतीकारक जोसेफ मॅझिनीला गुरु मानून, त्यांच्या यंग इटालीच्या धर्तीवर १९०४ साली पुण्यात अभिनव भारत या गुप्त संघटनेची स्थापना केली.

६ जून १९०६ साली सावरकर इंग्लंडला पोचले ते इंग्रजांची झोप खराब करूनच. लंडनमधल्या शामजी कृष्ण वर्मा यांच्या यंग इंडिया या वसतीस्थानाला लायन पार्कचं रुप आलं होतं. मादाम कामा, लाला हरदयाळ, वीरेंद्र चटोपाध्याय असे अनेक क्रांतीकारक त्यांच्या आश्रयाने तिथे राहात होते. याच भूमीवर सावरकरांनी ‘. १८५७च्या शिपायांचे बंड ‘ हा उल्लेख खोडून त्याचं ‘‘ १८५७ चे स्वातंत्र्यसमर ‘‘ असं नामकरण १० मे १९०७ या दिवशी केलं. हे पुस्तक त्यांनी छपाईसाठी भारतात पाठवलं, पण छपाईला कुणी तयार होईना. म्हणून ते सावरकरांकडे परत आलं तेव्हा सावरकरांनी ते इंग्रजीत भाषांतरित करून युरोपात छपाईसाठी पाठवलं. सावरकरांच्या सहकारी, मादाम कामांनी ते हॉलंडमधे छापून घेतलं. आणि इंग्रजी कांदबऱ्यांमधे लपवून भारतात क्रांतीकारकांसाठी पाठवलं. या पुस्तकाने क्रांती केली. शूर मुलांसाठी ती भगवत्‌गीता ठरली. लाला हरदयाळ, भगतसिंग, सुभाषचंद्र बोसांनी पुढे याच्या प्रती छापल्या. याच साली मॅझिनीचं चरित्र मराठीतून लिहून भारतात पाठवलं. गुप्तपणे वितरित झालेल्या या पुस्तकात क्रांतीची प्रेरणा देणारा मजकूर राज्यकर्त्या इंग्रजांना अर्थातच सलला आणि त्यानी त्या पुस्तकावर बंदी आणली.

१ जुलै १९०९ या दिवशी मदनलाल धिंग्राने गोळ्या झाडून वायलीचा खून केला. दुसरे दिवशी जी सभा भरली त्यात आगाखान यांनी मदनलालच्या कृत्याचा एकमताने निषेध करतो असं म्हटलं. त्या क्षणी सावरकरांचा आवाज हॉलमधे घुमला, ‘‘ जोपर्यंत कोर्टात गुन्हा शाबीत होत नाही, तोपर्यंत निषेधाचा ठराव करणं योग्य नाही. ‘‘ त्याबरोबर निजामाच्या नातवाने सावरकरांवर हल्ला चढवला. सावरकरांच्या चेहऱ्याला जखमा झाल्या. त्यांच्या सहकाऱ्यांनी सावरकरांना बाहेर

काढलं. सावरकरांवर पोलीसांची पाळत सुरू झाली. कुणी त्यांना ठेवून घेईना, जागा देईना. सावरकरांना जागा सोडून दुसरीकडे जावं लागलं.

त्याचवेळी भारतातून बातमी आली की त्यांच्या बंधूंना बाबारावांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली आहे. विषण्ण अवस्थेत सावरकर आपले मित्र निरंजन पाल यांच्याबरोबर ब्रायटनच्या समुद्र किनाऱ्यावर गेले. मनातली तळमळ, अगतिक अवस्था, आणि मायदेशाची ओढ यांच्या विलक्षण रसायनातून मनातले शब्द अग्निफुलांसारखे बाहेर पडू लागले, ‘‘ ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला. ‘‘

उत्तम मार्क मिळूनही सावरकरांची बॅरिस्टर पदवी इंग्रजांनी नाकारली. कारण राजनिष्ठेची शपथ घेणं त्यांनी नाकारलं. मित्रांच्या आग्रहावरून सावरकर पॅरिसला गेले. पण शिवाजी महाराजांनी आपल्या साथीदारांना कधीही एकटं पाडलं नाही आपण मात्र मित्रांना सोडून आलो ही बोच सहन न झाल्यामुळे परत इंग्लंडला आले आणि पोलिसांच्या जाळ्यात अडकले. इंग्लंडने त्यांची रवानगी मोरिया बोटीवरून भारतात नेण्यासाठी पाठवलं. ही बोट जेव्हा मार्सेलिस बंदरात नांगर टाकून थांबली होती, तेव्हा शौचालयात जाण्याची परवानगी मागून त्यांनी समुदररात उडी मारली ती पूर्णपणे विचार करून हेतु पुरःस्सर मारली. कारण फ्रेंच किनाऱ्यावर उडी मारली तर आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटला जाईल, तिथे इंग्रजांना काहीही करता येणार नाही असा त्यांचा अंदाज होता. मादाम कामा त्यांना घ्यायला तिथे पोचणार होत्या. पण दैवाने साथ दिली नाही. कामा उशीरा पोचल्या तोपर्यंत खेळ संपला होता. सावरकरांना अटक झाली होती. त्यांना दोन जन्मठेपांची शिक्षा झाली. सुटकेचं वर्ष बिल्ल्यावर लिहिलं होतं, सुटका १९६०.साल. केवढी देशभक्ती. केवढा त्याग. सावरकर ताठ मानेने उभे राहिले आणि म्हणाले, ‘‘ हालअपेष्टा आणि स्वार्थत्याग या मार्गानेच आमची जन्मभूमी त्वरेने नाही तरी अंतिम उद्दिष्टांपर्यंत नक्की पोचेल, म्हणून या श्रध्देनेच तुमच्या या निर्बंधांनुसार तुम्ही दिलेली ही कठोर शिक्षा मी शांतपणे सोसायला तयार आहे. ‘‘

सावरकर नावाचं अग्निकुंड अंदमानाच्या कोठडीत कोंडलं गेलं. हाताला घट्टे पडेपर्यंत कोलू फिरवू लागलं. दरोडेखोरांना चोरांना साक्षर करू लागलं. मुसलमान कैद्यांच्या हातचं जेवण्याने धर्म बाटतो या वेडगळ समजुतीच्या विरुद्ध प्रबोधन करण्यात ते व्यस्त झाले. कमला नाट्य तिथेच जन्मलं.

इ. स. १९२१ मधे त्यांची काळ्या पाण्याच्या शिक्षेतून सुटका झाली. पण रत्नागिरीच्या घरात त्यांना नजरकैदेत ठेवलं गेलं. तिथे त्यांनी अस्पृश्य निवारणाची चळवळ सुरू केली. गणेश उत्सवात महाराचं कीर्तन ठेवून सहभोजन घडवून आणलं. रत्नागिरीला गांधीजी त्यांना भेटायला आले तेव्हा त्यांनी सावरकरांच्या पत्नीची आवर्जून भेट घेतली आणि म्हणाले, ‘‘ पती काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असतांना ज्या साध्वीने अत्यंत धीरोदात्तपणे जीवन सोसले, त्यांना माझा प्रणाम.“

आपल्या साहसी जीवनाचा शेवटही त्यांनी वीराला शोभेल असाच केला. प्रायोपवेशनाने त्यांनी आपली इहलोकीची यात्रा संपवली.

एवढं हालअपेष्टा साहस यांनी भारलेलं देशभक्तीचं जीवन अनुभवल्यावर सरकारने त्यांची दोन वाक्यं अंदमानात कोरून ठेवली. मग एक महाभाग आले आणि त्यांनी ती वाक्यं पुसून टाकली. त्यासाठी केंद्रीय मंत्र्याची खरं तर गरज नव्हती. कुणीही मजूर ते वाक्यं पुसण्याचं काम करू शकला असता..त्यांनी स्वतःची वाक्यं खरं तर लिहायला हवी होती. पण जनतेने भारून जाण्यासारखी वाक्यं लिहायची तर देशभक्तीने भारलेलं जीवन हवं ना!

# तलाश - ए - लाश

आज सीरिया. उद्या फ्रान्स. परवा पाकिस्तान. कधी भारत. कधी अमेरिका. वर्तमानपत्राचं पान उघडावं तर कुठे ना कुठे बाँबस्फोट झालेले असतात. टी. व्ही. लावावा तर हादरलेली माणसं, हादरलेली वास्तू, हादरलेली सरकारी यंत्रणा, स्ट्रेचरवरून जाणारे जखमी, आक्रोशणारे नातेवाईक, आणि आपल्या माणसांच्या शवांचा शोध घेत हिंडणारी मृतांची आप्तमंडळी- कधी कुणी बाप, कधी आई, कधी मुलगा...

तलाश ए लाश. आपापल्या आप्तांच्या शवांचा शोध चालू असतो. ते पाहून डोळे पाझरतात.

स्वतंत्र भारताचं स्वप्न सत्यात उतरलेल्या क्षणालाही ५० वर्षे उलटून गेली. आता फक्त सुराज्य यायचं उरलं अशी भोळी आशा भारतीयांच्या मनात अजून तग धरून होती. पण मेनकेची सत्ता समोर आल्याबरोबर पक्ष, धोरणं, यांची सिंहाची कातडी गळून पडली आणि आत सगळेच कोल्हे आहेत हे जनतेला कळायला फारसा वेळ लागला नाही.

खरं तर ही भूमी संस्कारांची. व्यासांसारख्या तपस्व्याची, कृष्णासारख्या कर्मयोग्याची, अर्जुन भीमासारख्या शूरांची, एकलव्यासारख्या शिष्यांची, धन्वंतरी सुकृताची, ही भूमी सृष्टांची-दुष्टांची, ऋषी-राक्षसांची, संतांची-चोरांची, घटनाचक्र उलटं फिरवणाऱ्या कैकयीची, रामभक्त शबरीची, पाच पतींना सुखात ठेवणाऱ्या द्रौपदीची, पुत्राकडून यौवन घेणाऱ्या ययातीची, चाणक्याची, जोहार करणाऱ्या पतिव्रता पद्मिनीची..कस्त्वम्, कोऽहम् आणि कुत आयातः असा स्वतःचाच शोध घेणाऱ्या आदि शंकराचार्यांची. सोन्याच्या कणसांनी लगडलेल्या या देशावरच्या मातीत झगडे झाले ते दौलतीच्या, सत्तेच्या धुंदीतील सत्तालोभामुळे..म्हणून तिथे जन्मले आध्यात्मिक तुकोबांसारखे साधूसंत आणि कोकणात, जिथे नाही पीकपाणी, नाही संपत्ती, तिथे जन्मले टिळकांसारखे राष्ट्रीय संत.

संपन्नतेचा शाप भोगला तो गंगेने, यमुनेने, हिमालयाच्या चरणाशी पसरलेल्या विशाल भूमीने. सारी पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या परशुरामाकडून हत्या झालेल्यांच्या रक्ताने पाच डोह भरले..त्या समंतपंचकाच्या भूमीने. अनेक वेळा आक्रमकांचे तांडे या संपन्न भरतभूमीच्या छातीवर आपल्या रथांचे चरे ओढून गेले. लढाया झाल्या. संध्याकाळी आपापल्या मृतांचा शोध सुरू झाला. तलाश ए लाश.

भरतभूमीने असे मोठे घाव तीन वेळा झेलले. ते व्रण अजूनही भारतीयांच्या काळजाला घरं पाडतात. तीन वेळा तलाश ए लाश सुरू होता. १. द्वापारयुगातील कौरव-पांडव युध्द २. कलियुगातील पानिपत ३. क्रांतीयुगातील जालियनबाग संहार.

पहिला घाव बसला तो कौरव पांडवांच्या युध्दात! कुरूकुलातील भावांमधलं सौहार्द्र संपलं. कृष्णशिष्टाईचा उपयोग झाला नाही. ५ गावं मागणाऱ्या पांडवांना, सुईच्या अग्रावर मावेल एवढी जमीनही मिळणार नाही असं उत्तर आल्यावर पांडवांना लढण्याशिवाय पर्याय उरला नाही. सारं कुरुकुल दोन भागांमधे विभागलं गेलं. '' युध्दास सज्ज व्हा '' या घोषणांनी नभांगण गाठलं. कुरूक्षेत्रावरच्या हिरण्यमयी नदीच्या काठावर पांडवांनी तळ दिला. कौरवांनीही समोर येऊन तळ दिला. महर्षींचे आश्रम, अणि देवळ वगळून युध्दभूमी निवडली गेली. रथांचा खडखडाट, हत्ती घोड्यांचे चीत्कार, शंख दुंदुभींचे नाद यांनी अंतरिक्ष ग्रासलं. युध्दसाहित्याचा प्रचंड साठा गोळा झाला. रथांवरचे मोठे भाते म्हणजे तुणीर, सैनिकांच्या पाठीवरचे भाते म्हणजे निसंग, हत्तींना घालायच्या काटेरी झुली, रथांचे चामड्यांचे बुरखे म्हणजे वरुथ, जखमींसाठी औषधं, गजाश्वांचे दागिने, मोडतोडीनंतर लागणारी लाकडं म्हणजे अनुकर्ष, तंबू यांनी जागा व्यापली. दोन्ही पक्षांनी आपापल्या शूरांना खुणेचे दागिने, परवलीचे शब्द आणि निशाण्या दिल्या. हो! नाहीतर आपापसातच लढून योध्दे मरायचे.

कौरव-पांडवांच्या युध्दाला सुरुवात झाली. १८ दिवस युध्द झालं. युध्द संपल्यावर थकलेले सैनिक गाढ झोपले. पांडव आणि कृष्ण शांतपणे बोलत बसण्यासाठी नदीकाठी गेले. तेव्हा सूडाने पेटलेल्या अश्वथाम्यातला सैतान जागा झाला. तो पांडवांच्या तळावर आला. द्रुपदपुत्र यज्ञसेनाला त्याने पूर्ण जागं होण्याआधीच लोळवलं. मग वीरगती मिळाली ती द्रौपदीच्या पाच पुत्रांना..प्रतिविन्ध्य, शतानिक, श्रुतकीर्ती, श्रुतसोम, सुतसोम या पांडव द्रौपदी पुत्रांचा प्राण

घेतल्यावर अनेकांना मारत, नरसंहार करत दुर्योधनाला ही बातमी सांगायला अश्वत्थामा निघून गेला. तळावर उरला फक्त आक्रोश.. स्त्रियांचा, बालकांचा, पुरुषांचा.

आणि मग अंधाऱ्या रात्री तलाश सुरू झाला आपापल्या माणसांचा..तलाश-ए-लाश. आधीचे अठरा दिवसही प्रेतांचा खच पडत होता. हत्तींच्या तुटलेल्या शुंड, घोड्यांच्या माना, वीरांचे मातीत भिजलेले दागिने, रक्त मांसाचे ढीग.. पण तो होता वीरांचा वीरांशी झालेला सामना. आताच्या या संहारात उरला होता फक्त विलाप..द्रौपदीचा, विलाप कुंतीचा, विलाप अश्राप जीवांचा..

व्रण घेऊन हिंडणाऱ्या अश्वत्थाम्याने उठवला होता एक व्रण ..जो अजूनही भळभळतो आहे.

प्रसंग वाचल्यावर डोळे घळाघळा पाझरतात.

कलियुग अवतरलं आणि कुरुक्षेत्रावर परत एकदा छावण्या पडल्या. दिल्लीच्या मोगल बादशहाने अहमद शहा अब्दालीविरुध्द मराठ्यांची मदत मागितली. यावेळी पुण्याहून सदाशिवभाऊ दिल्लीत पोचले. यमुनेच्या एका काठावर त्यांच्या हाताखालच्या फौजा होत्या आणि समोर उभा ठाकला होता परकीय शत्रू. यमुनेच्या साक्षीने मोठंच शिरकाण झालं. दिल्लीपासून पानिपतापर्यंत नरसंहाराला ऊत आला. दत्ताजी शिंदे यांची आहुती पडलीच होती. पानिपतावर अनेक कुलांची वाताहत झाली. गिधाडांची चैन झाली.

१४ जानेवारी १७६१. मराठ्यांच्या प्राक्तनाची कर उजाडली. संक्रांतीचा दिवस. सेनापती सदाशिवभाऊंनी परत फिरायचा निर्णय घेतला. पैसा संपत आला होता. फौजेबरोबर माणसांचं प्रचंड ओझं होतं. बाहेर पडता पडता सदाशिवभाऊंनी निर्वाणीचा सामना अहंमदशहा अब्दालीशी करायचं ठरवलं. शत्रूची व्यूहरचना चंद्रकोरीची तर मराठ्यांनी आपल्या फौजेची गोलाकार रचना केली. तोफांच्या बाहेरून केलेल्या वर्तुळाच्या संरक्षणातून तळ सोडायचा निर्णय झाला आणि मराठे आग्नेयाकडे तोंड करून चालू लागले. अब्दालीकडे ही बातमी पोचली. लगेच त्याचीही फौज सामना करायला बाहेर पडली. दुपारपर्यंत झालेल्या लढाईत मराठ्यांचा जयच होत चालला होता.

पण.. दुपारी अब्दालीची नव्या दमाची फौज मैदानात घुसली. आणि त्याचवेळी पेशव्यांचा देखणा राजबिंडा पुत्र विश्वासराव गोळी लागून ठार झाला. मराठ्यांचे फासे उलटले. लढाई मोडली.

फौजेतील बाया माणसं, बाजारबुणगे घाबरून वाट फुटेल तिथे पळू लागले. शत्रूला चेव आला. प्रचंड शिरकाण झालं. शत्रूंच्या सुरे, भाले, तलवारीत, बंदुकांमधे जणू यम लपला. कित्येक घोडे आपल्या धन्यासह जमिनीवर कोसळले. पौषातली ती रात्र लवकर अंधारली. जे जिवंत पकडले गेले ते गुलाम आणि ज्या स्त्रिया हाती लागल्या त्या दासी किंवा जनानखान्यात म्हणून अब्दालीच्या छावणीत नेण्यात आल्या. भेसूर रात्र कोल्हेकुईत संपली.

सकाळी सुरू झाला तलाश-ए-लाश.

मराठ्यांचा कैवारी अयोध्येचा नबाब शुजा पखाल्यांना घेऊन शवांची ओळख पटवून घेत निघाला. पखाल्याने माती-चिखलात-रक्तात भिजलेल्या प्रेतांवर पाणी मारावं आणि ज्याने त्याने आपापले मृत घेऊन जावेत असा क्रम सुरू झाला. शुजा चालत चालत खूप दूर पोचला. तिथे एक देह शिरावेगळा पडला होता. हा कोणाचा देह ? धड उलटवलं तर किनखापी कापड आणि सात पाणीदार मोती दिसले. कुणीतरी मोठा सरदार असणार.. शुजाने हत्तीवर घालून देह आपल्या तळावर आणला. चौकशी सुरु झाली. मराठ्यांच्या तळावरच्या बलराम आणि वाघोजी नायकाने देह ओळखला. हे तर आमचे धनी..सदाशिवभाऊ! दोघांनी आक्रोशत सांगितलं. गतसाली वार झालेली कमरेवरची खूण दुजोरा देऊन गेली. मग यांचं शीर कुणी नेलं ? तलाश सुरू झाला. अब्दालीच्या तळावरून ते सापडलेलं शीर आणवलं गेलं आणि सदाशिवभाऊंच्या त्या देहावर शास्त्रशुध्द पध्दतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. एका दुराण्याने भाऊंच्या वीरमरणाची हकीकत सांगितली. भाऊंच्या मागे तीन दुराणी लागले. त्यांच्या किनखापी कपड्यांवरून हा कुणी मोठा सरदार आहे हे ओळखलं. जोरात ओरडत ‘‘ तुम भाऊ हो क्या ? ‘‘ असं म्हणत त्यांच्या जवळ पोचले. चौघांच्या पराक्रमाची शर्थ होते. सपासप वार भाऊंनी दुराणींवर केला. पराक्रमाची शर्थ करत दोघांना लोळवलं आणि घायाळ होत वीरमरण पत्करलं.

दुसरा वीर जनकोजी शिंदे. जखमी झालेले जनकोजी शिंदे पकडले जाऊन अब्दालीच्या छावणीत बरखुरदार नावाच्या सरदाराच्या तंबूत आणले गेले. जनकोजींच्याकडून जबरदस्त दंड घेऊन सोडून द्यायचं त्याचा बेत होता. पण नजिबखानाने शहाजवळ चुगली केली. अब्दालीने आपली माणसं त्याची शहानिशा करण्यासाठी पाठवली. शहाची माणसं येताहेत हे कळल्याबरोबर बरखुरदाराने जनकोजीला ठार केलं आणि शिंदे घराण्याचा कुलदीपक क्षणात मातीत गाडला गेला आणि विझला.

शुजाच्या दिवाण काशीराजने ही सारी हकीकत पर्शियन भाषेत लिहून ठेवली..''तलाश ए लाश'' सदाशिवभाऊंच्या मदतीला पुण्याहून फौज घेऊन निघालेले नानासाहेब पेशवे भेलशापर्यंत येऊन पोचले होते. त्यांना सावकाराकडून आलेला सांकेतिक भाषेत निरोप मिळाला '' दो मोती गलत, दसबिस अश्राफत, रुपयोंकी गिनती नही..'' विश्वासराव सदाशीवभाऊ दोन मोती, काही सरदार, सैनिक अगणित..अब्दालीच्या छावणीवर ३२ टेकड्या मराठ्यांच्या शवांच्या तयार झाल्या होत्या.

महाभारतातील कर्ण आणि सदाशिवभाऊ दोघेही आत्मतेजाने झळकणारे, दोघेही मातृसुखाला वंचित असलेले, नशिबाच्या दानामुळे दुय्यम पातळीवर राहिलेले, आणि युगप्रवर्तक अशा भारतीय युध्दांमधे सर्वस्व पणाला लावून वीरमरण पत्करलेले. पण रणधुरंधराला नको असलेल्या पराभवाचे धनी झालेले. जीवनाच्या अखेरीला सेनापती म्हणून लढले आणि पराभूत म्हणून उरले.

त्यादिवशी मराठ्यांच्या तळावर विलाप होता.. पुत्र विश्वासरावासाठी गोपिकाबाईंचा, बंधुवियोगासाठी नानासाहेब पेशव्यांचा, अनेक मातांचा-बहिणींचा-पत्नींचा..प्रत्येकाचे डोळे घळाघळा पाझरत होते.

पानिपतानंतर अवघ्या काही दशकांमधे आंग्लांच्या सत्तेचं जोखड भरतभूमीच्या सुपुत्रांवर पडलं. भारताचं वैभव लुटायला त्यांनी सुरुवात केली. भारतमातेच्या बेड्या तोडायला आता सुपुत्रांची स्फुल्लिंगं स्फुरायला लागली. जगन्नाथाचा रथ जसा प्रत्येकजण आपापल्या शक्तीनुसार ओढत राहतो, तसं कुणी कलम, कुणी कोलू, कुणी कृपाण हाती धरलं. रौलट ॲक्टने तर जनतेचा जळफळाटच झाला. कारण या कायद्याने कधीही कुणालाही, कुठेही अटक करण्याची मुभा मिळाली. त्यामुळे वातावरण तापू लागलं. गावागावात या कायद्याच्या विरोधात सभा होऊ लागल्या. इंग्रजांना हा आवाज दाबणं कठीण होऊ लागलं.

अशीच एक सभा होती, अमृतसरमधे.. बैसाखीचा दिवस होता. १३ एप्रिल १९१९. सकाळी सण साजरा करून घराघरातील लोक सभेसाठी जालियनवाला बागेत जमायला लागली. सहा सात एकरावर पसरलेला हा बाग हजारोंच्या गर्दीने फुलला. त्यावेळच्या पंजाबच्या गव्हर्नर मायकल ओडवायरने रौलट ॲक्ट विरुध्द होणाऱ्या असंतोषाला दडपण्यासाठी मार्शल लॉ लावायचं

ठरवलं. डायरने ही सभा होऊ नये म्हणून त्यादिवशी कर्फ्यू जाहीर केला. तरीसुध्दा अनेक लोक जालियनबागेत जमले. त्या ठिकाणी जायला ५ दारं आणि एकच चिंचोळा बोळ होता. आत गेल्यावर मैदान आणि मैदानाच्या कुंपणाबाहेर सभोवताली इमारती. सभा सुरू झाली. लोक तल्लीन होऊन भाषणं ऐकायला लागले आणि इतक्यात बेछूट गोळीबार सुरू झाला. जनरल डायरने आपल्या गुरखा पलटणीला इशारा केला होता. १० मिनिटात १६५० फैरी झाडल्या. निरपराध पटापटा जमिनीवर कोसळू लागले. जीवघेणी चेंगराचेंगरी सुरू झाली. दाट गर्दीत अनेकांना गोळ्या लागल्या. निरपराध लोकांचे बळी पडले. लोक वाट फुटेल तिथे धावत सुटले. गावावर शवकळा पसरली. रात्र झाली. कर्फ्यू चालूच होता. सकाळी आपापल्या नातेवाईकांचा शोध सुरू झाला होता. भेदरलेले लोक शोधत होते आपापले नातेवाईक.

तलाश-ए-लाश... भारताच्या छातीवर उमटलेला आणखी एक व्रण.

रत्नादेवींचा नवरा त्या सभेला गेला होता. रात्र पडली तरी तो आला नाही. रत्ना चिंतेत पडली. ती एकटीच बागेजवळ गेली. भेसूर रात्री गावातले तरुण आणि प्रौढ पुरुष दबक्या पावलांनी बागेभोवती घुटमळत होते. कर्फ्यू लागलेला होता. त्यांच्यातील एका तरुणाने रत्नाला पाहिलं. तिच्या रडण्यावरून तो काय ते समजला. आवाज न करता तिला आत घेऊन गेला. त्या भयाण रात्री प्रेतांचा खच पडलेला असतांना ती दोघं तिचा नवरा शोधू लागली. एका प्रेताचा चेहरा पाहिल्याबरोबर तिने घट्ट दाबलेला एक हुंकार आपोआप बाहेर पडला. पोलिसांच्या कानांनी तो आवाज अचूक टिपला आणि सटकन् तिच्या दिशेने एक गोळी आली. सैतान अशी शिवी हासडत रत्नाला मदत करणाऱ्या मुलाने ले. जनरल मायकल ओडवायरला संपवण्याची तिथेच शपथ घेतली. ओडवायरची डायरच्या कृत्याला संमती होती.

त्यानंतर तो तरुण शिक्षणाच्या निमित्ताने इंग्लंडला पोचला. गुप्तपणे कारवाया करणाऱ्या क्रांतीकारकांबरोबर राहून त्याने पिस्तूल मिळवलं आणि कॅक्स्टन हॉलवर होणाऱ्या एका सभेला ओडवायर येणार आहे हे कळल्यावर तिथे पोचला. त्या सभेत ओडवायरला गोळ्या घातल्यावरच त्याचा राग शांत झाला. ती तारीख होती, १३ मार्च १९४०. त्या तरुणाचं नाव होतं उधमसिंग. जालियनवाला बागेत मृत झालेले सगळे अश्राप आत्मे त्या दिवशी मुक्त झाले. रत्नादेवींना न्याय मिळाला. उधमसिंग शहीद झाला.

भारत स्वतंत्र झाला. दहशतवादाने आपले हातपाय हळूहळू पसरायला सुरूवात केली. त्यातच अक्षरधाम घडलं. कित्येक बॉंबस्फोट घडतच आहेत. बातम्यांमधे घरोघरचे लोक त्या

ठिकाणाची दृष्य बघतात आणि कामाला लागतात. पण आता कुणी उधमसिंग, कुणी भगतसिंग, कुणी चंद्रशेखर आझाद जन्मत नाही. असं का? वांझ झाली आपली का आपली भारतमाता? की आता ती जबाबदारी आपल्याच सरकारने घेतली आहे म्हणून थंड झाले आहेत? की नियतीनेच भगवा रंग, क्रांतीकारकांची वीण बंद केली आहे?

# सीता स्वयंवर.

गंगा-यमुना, मेरु-मंदार, राम-कृष्ण, रामायण-महाभारत, व्यास-वाल्मिकी असा अनेक जोड्या भारतीय मनामधे रुतून बसलेल्या आहेत. रामायण, महाभारताच्या कथांना कथेकरीबुवा, कीर्तनकार, हरदासबुवा, अशा अनेकांनी पिढ्यान् पिढ्या प्रवाही ठेवून आपल्यापर्यंत आणून ठेवलं आहे. आताच्या वैज्ञानिक युगात रामानंद सागर आणि बी. आर. चोप्रा या दोन कथेकरीबुवांनी हेच महाखंड घराघरात पोचवले. म्हणजे परत आपल्याला महाभारत काळात नेलं. म्हणजे संजयाने त्यांच्या चॅनेलवरून धृतराष्ट्राला जे युध्द दाखवलं तसंच आपल्याला या दोन महाभागांनी संपूर्ण रामायण-महाभारत चलत् चित्रांमधून सादर केलं. सीताहरण आणि द्रौपदी वस्त्रहरण हे आजही गर्दी खेचणारे सीन ज्या दिवशी घराघरात पोचणार होते, त्यादिवशी म्हणे रस्त्यावर शुकशुकाट होता. घराघरातील मातांनी तो एपिसोड झाला की नाश्त्याला उपमा करून ठेवला होता. आणि वस्त्रहरणाचा सीन संपला की आंघोळीला जायचं म्हणून पुरुषांनी आंघोळीचे कपडे तयार ठेवले होते. पण द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळी दाराला पाठमोऱ्या आणि टी.व्ही. ला तोंडमोऱ्या लोकांच्या घरात घुसून चोरांनी उपमा खाल्ला आणि आंघोळीचे काढून ठेवलेले कपडे चोरून नेले, या त्यांच्या धैर्याला उपमा नाही. रामायण महाभारताच्या काळीही दोन चॅनेल्स होत्या. रामायणाच्या काळात नारदाची आणि महाभारताच्या काळात संजय चॅनेल अस्तित्वात होती.

सीतास्वयंवराचं जे प्रक्षेपण झालं त्याचं वर्णन करणाऱ्या काही पोथ्या नुकत्याच उत्खननात सापडल्या आहेत. त्यावरून कळलेली ही माहिती..

वाहिनीचं नाव :- नारद दशदिशा त्रिलोक वार्तापत्र. ( N. D. T. V. )- हस्तिनापूर.

पुरस्कर्ता :- जनक राजा.

जनकराजाने सीतेचं स्वयंवर मांडलंय हे नारदांना कळल्याबरोबर प्रक्षेपणाचे हक्क मिळवायला ताबडतोब त्यांनी मिथिला गाठली. जनक राजाने ते मान्य केलं, पण एकच अट घातली. ती म्हणजे मंडपात स्पर्धेच्या वेळी त्यांना चित्रीकरणाला परवानगी नाकारली. नारदांनी ते

मान्य केलं, पण आमंत्रितांमधे स्वतःचं नाव घालून घेतलं. जनकाने नाराजी लपवत ते मान्य केलं, कारण नारदांना दुखवून चालणार नव्हतं. स्वयंवराला देशोदेशीचे मोठे मोठे राजकारणी येणार, मग ते कुणाशी बोलले, कुणी कुणाला मिठी मारली, कोण कुणाजवळ बसलं, कुणी कुणाकडे पाहिलंही नाही, हे सगळं त्रिलोकात पसरणार होतं. हा बोभाटा जनकाला नको होता. जनकाने घरातल्या सर्व समारंभाचं शूटींग करायला आपल्या बहिणीच्या मुलाला जुंपलं. त्यावरून त्याची आणि राणीची धुसफुस झाली. मग राणीच्या बहिणीच्या मुलाला त्याने सर्व आमंत्रितांच्या भोजनाची कामगिरी सोपवली. सीता स्वयंवराची बातमी फुटताच ओपिनियन पोलने कळस गाठला. कुणाकुणाला आमंत्रण आहे हे कळायच्या आधीच अंदाजपंचे राजाची नावं जाहीर झाली, आणि त्यावर ओपिनियन पोलची सर्व वाहिन्यांवर गर्दी झाली. दुसरीकडे बेटींगलाही उधाण आलं, पण जनकाने सर्व गुंडांना तडीपार करून टाकलं.

नारदांनी जनकाला भेटल्यावर ताबडतोब हस्तिनापूर गाठलं आणि राजमतवर स्वयंवराच्या चित्रीकरणाची जबाबदारी सोपवली. राजमत लगेच तयारीला लागला. मिथिलेला जाऊन मोक्याच्या जागा शोधून आला. स्वयंवराची तिथी चार दिवसांवर आली, तेव्हा राजमत सर्व तयारीनिशी मिथिलेत उतरला. पहिले दोन दिवस त्याने सारी मिथिला नगरी भारतीयांना दाखवली. जनकाचा राजवाडा, स्वयंवराची जागा, शिवधनुष्याची जागा, सीता ज्या ठिकाणी सापडली ती जागा, आमंत्रितांच्या रथांच्या पार्किंगची सोय केलेले रथतळ, जनकाने आमंत्रितांच्या खाण्यापिण्याची चंगळ व्हावी म्हणून ठायीठायी लावलेले मिठाईचे, पानपट्टीचे ठेले, गरम गरम जिलेबी आणि दुधांचे रांजण, त्याच्या शेजारी धारोष्ण दूध मिळायची सोय व्हावी म्हणून उभ्या केलेल्या दुभत्या गायी, त्यात घोटाळा होऊ नये म्हणून रचून ठेवलेला चारा,.या सर्वांवरून कॅमेरा फिरत होता, आणि नारद वाहिनीवरून प्रसारित केला जात होता. नंतरचे दोन दिवस त्याने गावातील लोकांना पकडून त्यांच्या मुलाखती घेतल्या. गावातील लोकांचं स्वयंवराबद्दल काय मत आहे हे विचारलं. काहींनी फार गर्दीमुळे रस्त्यावरून चालणं अशक्य झालं आहे, आणि महागाई अचानक वाढली आहे अशी तक्रार केली, त्यादिवशी रात्रीच्या बातम्यांमधे मिथिलेतील जनता हैराण ही बातमी झळकली. ते लोक बोलत असतांना काही लोक कॅमेरात डोकावून हात हलवून जात होते, हेही लोकांनी पाहिलं.

मग राजमतने राजवाड्याजवळ मुक्काम हलवला. राजवाडयातून कुणीही बाहेर पडलं की त्याला गाठायला सुरूवात केली. दासी, नोकर, सख्या, कुणीही.. त्यांच्याकडून आतील बातम्या काढायला सुरुवात केली. सीतेला खायला काय आवडतं, लहानपणी ती शिवधनुष्याशी कशी घोडा

घोडा खेळायची ते तिच्या दासीने ‍रंगवून सांगितलं. तिच्या सख्यांनी त्या लहानपणी लपालपी खेळायच्या त्या आठवणी सांगितल्या. सीता लपली की धरणी माता तिची आई असल्यामुळे लगेच सीतेसाठी एक छोटा खड्डा करून त्यात सीतेला लपवायची आणि सख्यांना ती सापडायचीच नाही हे आठवून आठवून सांगितलं. इतक्यात राजमतला नदीवर कपडे धुवायला घेऊन जाणारी एक परटीण दिसली. लगेच राजमतने तिला गाठलं. सीता लहानपणी कपडे कसे मळवायची, तिच्या कपड्यांना लागलेली माती काढायला कसा त्रास व्हायचा याची तिला अजून आठवण होती. बिचारीला काय माहीत, की भविष्यात एक दिवस तिच्याच बिरादरीतला एकजण सीतेच्या दु:खाला कारण होणार आहे..मग राजमतने सीतेच्या सख्यांना गाठलं. हस्तिनापूराहून कुणी रितू नावाची शिंपीण तिचे स्वयंवराचे कपडे शिवणार असल्याची माहिती त्याला मिळाली. नितीन नावाचा दक्षिणेतला मुलगा स्वयंवराच्या जागचा शामियाना, आणि त्याची सजावट करणार आहे ही बातमी राजमतने लगेच कळवली.

स्वयंवराला दोन दिवस शिल्लक असतांना मिथिलेत देशोदेशीचे वाहिन्यांचे आपापल्या आयुधांसह जमू लागले. राजमतने त्यांचीही माहिती हस्तिनापूरला कळवली. राजमतला काही आडदांड, मिशाळ, खूप हातवारे करत मोठ्या मोठ्या आवाजात गडगडल्यासारखं बोलणारे काही लोक मिथिलेत दिसले, ते सी. ( सिलोन ) एन. बी. सी. चे लोक होते. ( सिलोन नव्या बातम्या चऱ्हाट ) रावणाने त्यांना पुढे पाठवलं होतं. दक्षिणेतून बया वाहिनीचे आलेले काही लोक होते. राजमतने त्यांच्या प्रसारणाचा अंदाज घेतला. दशानन वाहिनीवरून सतत दशाननाचा मोठा राजवाडा, दहा उशांची सोय असलेला राजाचा पलंग, दहा आरसे असलेली बाथरूम, त्याचे १० सोन्याचे नळ, १० सोन्याचे बेसिन, १० कंगवे, ब्रश ठेवण्याच्या जागा सर्वांना पाहायला मिळाल्या. राजवाडासुध्दा सोन्याच्या विटांचा होता. मग लगेच सोन्याच्या विटा बनवायचा कारखाना दाखवला गेला. तिथले कामगार जवळचा समुद्र ओलांडून कामाला येतात, संध्याकाळी परत जातात, जातांना सोन्याच्या विटांचा भुसा घेऊन जातात आणि आपल्या देवळांच्या कळसावर त्याचा पत्रा लावतात, असं निवेदक सांगत होता. त्याचं नाव अमिन होतं. तो खूप बोलत होता. त्याने महाप्रतापी दशाननाचा डायनिंग हॉल दाखवला. तिथे १० सोन्याच्या प्लेटस् मांडल्या होत्या. राजवाड्याच्या बाहेर राजमतने एक हरिण चरतांना पाहिलं. अमिनने, ते हरिण नसून दशाननमहाराजांचा मारिच मामा असल्याचं सांगितलं. मामाला इडलीसांबार खाण्याचा कंटाळा आला की तो हरिण बनून कोवळं गवत खातो हे राजमतला नव्याने कळलं. नवीन वर्षाला गार्डन

पार्टीत घालायचा सोन्याचा त्याचा पोशाखही अमिनने दाखवला. राजमत मग जरा बया चॅनेलवर डोकावला. पण तिथे सारखे साड्या आणि चपलांचे जोडच दाखवत होते. राजमत कंटाळला आणि परतला.

स्वयंवराचा दिवस उजाडला. सकाळी ७ वाजल्यापासून राजमतने मोक्याच्या रथतळाच्या शेजारी ठाण मांडलं. इथे येणारा प्रत्येक उमेदवार त्याला पाहता येणार होता. १२ वाजता स्पर्धेला सुरुवात होणार होती. १० वाजल्यापासून एकएक रथ तळाच्या दिशेने यायला सुरुवात झाली. पहिला जो उतरला त्याला राजमतने धावत जाऊन गाठलं. तो आमंत्रित होता. त्याचा अरिकाल ५७ ( A.K.57 )नावाचं शस्त्र बनवण्याचा कारखाना होता. ते विकायला बिझिनेससाठी तो मिथिलेत आला होता. दुसरा आला तो म्हणाला की जनकाने स्पर्धेची रजिस्ट्रेशन फी खूपच ठेवली आहे. शिवाय घरात त्याच्या तीन राण्या आहेत. त्यांच्या कचकचीला कंटाळून तो पळून आला आहे. त्याला सीतेला जिंकण्याची जराही इच्छा नाही. रथतळावरची गर्दी वाढायला लागली. काही रथ रिकामे आले. त्यांचे मालक प्रीती भोजनासाठी एका राजकारण्याच्या घरी जमले आहेत ही बातमी राजमतला आनंद देऊन गेली. त्या बातमीचा छडा लावायला हवा होता.

एवढ्यात परिस्थितीचा आढावा घ्यायला स्वयं नारदमूर्ती तिथे आले. ‘‘ सर, एवढे राजकारणी येणार पण मला उत्तरप्रदेशातील राजकारणाची, इथल्या यादवीची काहीच कल्पना नाही. मुलाखती तरी कशा घेऊ? आणि रावण म्हणू की दशानन? ‘‘ असं विचारल्यावर नारद म्हणाले की फार अभ्यासपूर्ण लिहायला तू काही तळमळकर नाहीस. लोकांना फार शहाणं करूही नये. फार फाजील होतात ते मग! एक लक्षात ठेवायचं की आपलं चुकलं तरी ते लोकांना कळू द्यायचं नाही. तेव्हा जोरात काहीतरी बोलायचं! दशानन म्हण, नाहीतर तुझी तंगडी रात्री त्याच्या तंदूरमधे दिसेल. ‘‘ नारदमुनी मांडवाकडे वळणार एवढ्यात एक विमान घरघरत आलं आणि त्यातून दशानन महाराज उतरलेले पाहून राजमत बिचकला आणि नारदमुनींच्या मागे लपत त्याच्याजवळ गेला. नारदमुनींनी दशाननाचं स्वागत करून आपणाला विजयाची खात्री आहे का विचारलं तेव्हा दशाननाने नुसता आपला हात कोपरात जोरात वाकवला त्याबरोबर त्याचे बाजूबंद कच्कन तुटले. नारद आणि राजमत दोघेही मागे सरले. दशानन शामियान्याकडे गेला. आता मांडव पूर्ण भरला होता. कुणीच यायचं शिल्लक नाही याचा अंदाज आल्यावर राजमत शामियानाजवळ पोचणार इतक्यात विश्वामित्र दोन कोवळ्या मळलेल्या तरुणांना घेऊन लगबगीने मांडवाजवळ जातांना त्याने पाहिले! विश्वामित्र आणि सीतेला जिंकणार? बातमी मोठीच होती. तो

धावला, पण विश्वामित्रांनी सांगितलं की त्यांच्याबरोबर असलेल्या राजकुमाराला ते स्पर्धेत उतरवणार आहेत..ते दोघे रॉयल ब्लडचे आहेत..

आता स्वयंवराला सुरूवात झाली होती हे बाहेर येणाऱ्या आवाजावरून राजमतला कळलं. त्याने शामियानाला असलेल्या एका भोकात डोळा घातला आणि तो आतली दृष्यं पाहायला लागला. वल्कल सिल्क साडी नेसलेली शाल्मली नावाची मॉडेल सूत्र संचालन करत होती. पवनरथ, गंगा बॉटलिंगच्या जाहिरातीत त्याने तिला पाहिली होती. एकएक उमेदवार शिवधनुष्याजवळ जातांना त्याला दिसायला लागला. कधी धप्प आवाज यायचा आणि स्ट्रेचरवरून उमेदवार बाहेर यायचा. कधी उमेदवार जवळ जाऊन नुसताच परत फिरायचा. एवढ्यात दशानन महाराज धनुष्याजवळ गेलेले त्याने पाहिले. शाल्मलीने नम्रपणे त्यांचा नंबर यायला अजून वेळ आहे असं सांगितल्यावर गडगडाटासारखा हसण्याचा आवाज राजमतने ऐकला, आणि धप्प असा मोट्ठा आवाजही त्याने ऐकला. दशानन खाली पडला होता नव्हे खरं तर हरला होता. निवडणुकीत उमेदवार पडतो म्हणजे हरतो, पण राजमतने आपल्या चॅनेलवरून दशाननाला खाली पडलेलं आणि त्याच्या उरावर धनुष्य पडलंय असं दाखवलं आणि समस्त लोकांना ते क्षणात दिसलं. जनतेला ते चित्र फार भावलं. दशानन ताडताड पावले टाकत मांडवाबाहेर पडला. त्याच्या विमानाभोवती खेळणारी काही शेंबडी मुले त्याला पाहिल्याबरोबर धूम पळून गेली. वाहिनीवरून लगेच रावण कदाचित युध्द छेडेल अशी शक्यता प्रसारित झाली. रावणाला ती दुसरे दिवशी वर्तमानपत्रात वाचायला मिळाली. .

थोडा वेळ गोंधळ माजला. परत सगळं शांत झालं. सगळे उमेदवार संपले असं वाटत असतांनाच तो मगासचा मळका, कळका तरुण पुढे झाला आणि विश्वामित्रांना वंदन करून त्याने धनुष्याला हात घातला आणि.. लीलया ते उचललं, प्रत्यंचा ओढली आणि काडकाड आवाज करीत ते धनुष्य मोडून पडलं. रामाने, त्या तरुणाने, सर्वांकडे विजयाने पाहिलं. टाळ्यांचा कडकडाट झाला. शाल्मलीने तो मळका तरुण, प्रिन्स ऑफ अयोध्या असल्याचं सांगितलं तेव्हा जनकाला फार आनंद झालेला दिसला. धनुष्य खाली ठेवून रामलल्ला विनयाने उभा रहिला आणि सीतेची तिष्ठत वाट पाहू लागला. पण सीता बराच वेळ आलीच नाही. तिची ब्युटिशीयन तिला अजून नटवतच होती. त्यामुळे तिला उशीर झाला. शेवटी ती आली आणि रामाकडे लज्जित होऊन पाहात वरमाला घेऊन रामाच्या जवळ गेली. तेवढ्यात रामाने हार घालून घ्यायला नकार दिला. मंडपात परत शांतता..सस्पेन्स.. आणि मग आपल्या आईवडिलांच्या समोर लग्न करायची इच्छा त्याने बोलून दाखवली.. लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. एवढा मातृपितृभक्त पुत्र त्यांनी पाहिला नव्हता.

जनकही खूष झाला आणि त्या आनंदाच्या भरात त्याने आपल्या इतर तीन कन्या उर्मिला,मांडवी आणि श्रुतकीर्ती दशरथाच्या तीन मुलांना द्यायची घोषणा केली. बाय वन अँड गेट थ्री फ्री. त्याच्या तीनही मुली खपल्या आणि सुस्थळी पडल्या. लक्ष्मण तिथे हजर होताच. भरत आणि शत्रुघ्न हे आणखी दोन मुलगे दशरथाला आहेत हे लोकांना कळलं. त्यातला शत्रुघ्न अगदी हिरोसारखा दिसतो, असं कुणीतरी तिथे सांगत होतं.

स्पर्धा संपल्यावर राजमतला आत प्रवेश देणयात आला. त्याने सीतेला पाहिलं आणि तिची प्रतिक्रिया विचारली. '' जेथे राघव तेथे सीता '' एवढंच ती म्हणाली. समस्त भारतीय मुलींना लाजावं कसं ते त्या दिवशी पाहायला मिळालं. '' आईवडिलांचा आर्शीवाद '' एवढीच प्रतिक्रिया रामाने मंद हसत दिली. तेंव्हापासून रथावर , ' आई तुझा आर्शिवाद ' असे लिहायची पद्धत पडली.

सगळे बाहेर पडले. राजमतने एका पराभूत उमेदवाराला त्याचं मत विचारलं तेव्हा तो म्हणाला की मॅच फिक्सिंगचा त्याला संशय येतो आहे, कारण रामाचा नंबर शेवटी ठेवला, त्यामुळे शिवधनुष्य खिळखिळं करण्याचा डाव होता. रामाला जिंकणं सोपं झालं. राजमतने नारदमुनींना गाठलं आणि रात्री या विषयावरच्या चर्चेत रामाला हिंदू ह्रदय सम्राट असं संबोधू का असं हळूच विचारलं. नारदमुनींनी थोडा विचार करत म्हटलं '' आद्य हिंदू ह्रदय सम्राट असा उल्लेख कर. रात्रीच्या चर्चेत जनकाचे दोन विरोधक, एक त्याच्या पक्षाचा आणि एक सामाजिक कार्यकर्ता यांना बोलाव आणि चर्चेत जुंपून टाक.

राजमतने मान हलवली आणि हस्तिनापूर गाठायला तो व्हॅनमधे बसला.. .. .. ..

उत्खननात मिळालेल्या कागदांवरून हा रोमहर्षक इतिहास कळला. लग्न समारंभाचे कागद मिळाले तर तेही भविष्यात लोकांसमोर ठेवू.

आणखी काही फाटके, मळके कागद आणि एक सी. डी. पुढे थोड्याच अंतरावर सापडले. त्याला लागलेल्या कुंकूमावरून विवाहाचं वर्णन असावंसं वाटलं. तेही वाचायला घेतले. त्यात लिहिलं होतं,

रामाच्या पराक्रमाची वार्ता अयोध्येत पोचली. दशरथ आणि कौसल्या सुमित्रा, कैकयींचे महाल आनंदाने भरले. तिन्ही महालांमधे लग्न खरेदीचे बेत सुरु झाले..दशरथाने सारा खजिना

लग्नासाठी मोकळा करून दिला. रामाने त्याच्यासाठी नंदन नावाचा कुणी नामांकित शिंपी बालवून घेतला. त्याचे कपडे रामाला इतके आवडले की त्याने आपलं नावही त्याच्या नावाला जोडून रघुनंदन असं करून घेतलं. त्याने केशरी रंगाचे कपडे शिवून घेतले. शत्रूने पांढऱ्या रंगाचे, रामाने केशरी म्हणून लक्ष्मणानेही केशरीच कपडे शिवले. भरताला स्वतःची अशी आवड काहीच नाही. त्याने मिळतील ते कपडे घातले. ते रामाचे असावेत, कारण त्याला ते कपडे ढगळ होत असल्यासारखं दिसत होते. भरताचं असंच वागणं.. .. स्वतःची म्हणून काही आवड नाही, की काही मत नाही. ( म्हणूनच रामाने त्याला राज्य चालवण्यासाठी गादी सांभाळ म्हटल्यावर त्याने रामाच्या पादुका ठेवून राज्य केलं असावं )

पण कैकयीच्या महालात मंथरा मात्र सावध झाली. आपल्या मालकिणीचा आनंद पापडासारखा मोडत तिला म्हणाली, ‘‘ राणी सरकार, आता थोरल्या बाईसाहेबांचा तोरा आणखी वाढणार बघा! ‘‘ कशावरून ग! कैकयीने विचारलं.‘‘ अहो, त्यांच्या मुलाच्या पराक्रमामुळे तुम्हाला सून नाही का मिळाली? त्यातून त्यांना जनकाची मुलगी राजकन्या आणि तुम्हाला मात्र त्यांच्या भावाची मुलगी! समजतंय का मी काय म्हणते ते! आता कौसल्या राणीसाहेब सारखं तुम्हाला बोलून दाखवणार की त्यांच्या मुलामुळे तुम्हाला सून मिळाली. बघा बरं! कैकयीच्या मनाचा कोपरा काजळला.

लग्नाचा विधी ठरवला गेला. पत्रिका छापण्यासाठी दशरथाच्या अमात्यांनी कुणा जगविख्यात चित्रकाराला बोलावून घेतलं. केसांचं झगर झालेला, चुरगळलेला पायजमा शर्ट घातलेला आणि पायात चपला नसलेला तो चित्रकार पाहून राजा संतापला. त्याने आधी त्या चित्रकाराला घासणीने घासून स्वच्छ करण्याचा हुकूम सोडला. त्या स्वच्छ झालेल्या चित्रकाराने प्रथम त्याला ओळखलंच नाही. मग मात्र प्रत्येक राजासाठी वेगळं चित्र काढण्याचा हुकूम सोडला. चारी राजकुमाराच्या लग्नाचं रिसेप्शन अयोध्येत परतल्यावर होणार होतं, त्या स्टेजचं डेकोरेशन करण्यासाठी परत दक्षिणेतील त्या जनकाकडील नितिनकुमारालाच आमंत्रण देण्यात आलं. त्याने कमळ आकाराचं स्टेज करण्याचं सुचवलं. पण कौसल्येला पवित्र वाटणारं, मंदिराचं स्टेज असावं असं वाटत होतं...पण मग नितीनकुमार म्हणाला की मंदिराच्या उभारणीच्या कामात हस्तिनापूरचा लालकृष्ण नावाचा कुणी निष्णात आहे, त्याचं ते काम आहे. तो रथ घेऊन येईल. पण शेवटी कमळ उभारणं निश्चित झालं. तेव्हाच मंदिर उभारलं असतं तर आजचा ज्वलंत प्रश्न निकाली निघाला असता.. पण बायकांचं ऐकतंय कोण?

सगळे बाराती मिथिलेला जायच्या दिवशी, राजमत अयोध्येत दाखल झाला. सगळ्यांवर त्याचा कॅमेरा फिरू लागला. बारातींच्यामधे काही काही खूप नटलेले लोक नाटकी इंग्लीशमधे बोलत होते. ते सगळे शत्रूच्या नाटक व्यवसायातील लोक असावेत हे राजमतला लगेच कळलं. सर्व वऱ्हाड मिथिलेला पोचलं. जागोजाग चारी राजकन्यांचे फलक लागलेले होते. मिथिलेत धामधुमीत लग्न पार पडलं.

अयोध्येत आल्यावर व्हिडियो शूटींगचं काम दिलेले रामानंद नावाचे कुणी नंतर ४ वर्षे ४०० एपिसोडचे, ‘‘ चार दिवस तीन सासूंचे, चार दिवस चार सुनांचे ‘‘ ही चा. दि. सा. चा. दि. चा सु. चे लग्नाची फिल्म सतत दाखवत होते..पण नंतर काही रुसवे फुगवे दशरथाच्या लाईफमधे खरेच उद्भवल्यामुळे राम-लक्ष्मण वनवासात निघून गेले आणि मालिका बंद पडली. राजमतला आता नवीन बातम्यांचे वेध लागले...

एवढाच मजकूर मिळाला.

# पेटलेली पहाट

खूप वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. माझी मुलगी लहान होती, म्हणजे पहिलीत होती. एक दिवस माझी आई तिचं कॅट-बॅट- रॅटचं पुस्तक पाहात बसली होती. तेव्हा आपल्या आजीला इंग्लीश पुस्तक वाचतांना पाहून तिने हळूच विचारलं, ‘‘ आजी, तुला इंग्लिश वाचता येतं की नुसती चित्र बघतेस? माझी आई नुसतीच हसली. काही वर्ष गेली. माझी नात तेंव्हा दहा वर्षांची झाली होती.आम्ही मुलीकडे राहात असतांना एक दिवस माझ्या नातीने मला विचारलं, आजी, तुला कॉम्प्युटर वापरता येतो? त्यादिवशी मीही माझ्या आईसारखीच नुसती हसले...हा बदलत्या पिढीचा आणि पुढे गेलेल्या विज्ञानाचा फरक होता.. आणि विज्ञानाची करामत होती.

विज्ञानाचा आपल्याला फायदा होतो की तोटा? कधी कधी संभ्रम पडतो. एवढं मात्र खरं की किती अधीन होतो आपण त्या विज्ञानाचे! वीज गेली की जग सगळं ठप्प होतं.. एक दिवस असंच झालं..घरातला प्रिंटर बंद पडला, त्यामुळे कॉपी काढायचं काम बंद पडलं. त्यामुळे दुकानात जाणं भाग पडलं. म्हणजे बाहेर पडायला हवंच होतं... झेरॉक्सच्या टपरीवजा छोट्या दुकानात शिरल्यावर कागद दिला तर तो म्हणाला की अर्ध्या तासाने या. तो अगदी कामात होता. कॉपी काढणाऱ्यांची गर्दी खूप होती. तेही अपेक्षितच होतं. त्या तयारीनेच गेले होते. मग अर्धा तास घालवायला शेजारच्या सुपर मार्केटमधे शिरावं लागलं. सामान घ्यायला दुकानात शिरून बाहेर पडायला बराच वेळ लागला. एक लिटर तेल, एक लिटर दूध, भाज्या, उगीचच समोर दिसले म्हणून खरं तर कारण नसताना, नको असतांना सामोसे, असं सगळं घेऊन परत झेरॉक्सचं दुकान गाठलं. दुकानापर्यंत चालत जातांना विचार घोळत होते.

काय बरं करायचो आपण झेरॉक्सचा शोध लागण्यापूर्वी? मग आठवलं.. कार्बन पेपर घालायला लागायचा. पण त्याही आधी काय व्हायचं? तर हातांनी मजकूर लिहावा लागायचा. नकलून काढावं लागायचं. पुस्तक नकल करण्याचा एकेकाळी म्हणजे तीन-चारशे वर्षांपूर्वी व्यवसायच होता. झेरॉक्स मशीनचा शोध लागला आणि सगळं किती सोपं झालं. कार्बन पेपरचा

शोध लागला तेव्हाही असंच वाटलं होतं. आता आणखीनच सोपं झालं. पिशवीतलं सामानही विज्ञानाचाच एक चमत्कार होता. दूध आणि तेल असं एकाच वेळी एक एक छोट्या पिशवीतून आणणं एके काळी स्वप्न वाटलं असतं. परीकथाच होती.

५०/६० वर्षांपूर्वी तेल आणायचं म्हणजे तेलाच्या दुकानात जायचं. त्यासाठी कडीचा डबा न्यायचा. तेलाच्याच दुकानात करडई, तीळ, गोडं, खोबरेल तेल मिळायचं. शनिवारी तेलाचं दुकान बंद..खरं तर मारुतीचा आणि तेलाचा काय संबंध ? पण मारुतीला तेल घालण्याच्या दिवशी तेलाचं दुकान मात्र बंद !

दूध आणायला दुग्धालयातच जावं लागे. घरातून बरणी न्यावी लागे. दुकानातल्या दुधाच्या मोठ्या मोठ्या बरण्यांना झाकणाच्या बाजूने गवत लिंपलेलं असायचं, त्यामुळे घरी आल्यावर दूध गाळून घ्यावं लागे.

एका प्लास्टीकचा शोध लागला आणि केवढी क्रांती झाली.

त्याकाळी घरात गॅस आलेला नव्हता. तो काळ तर दिव्यच..गॅसच्या आधी स्टोव्ह होता, त्याआधी शेगड्या, त्याआधी चुली..दरवेळी क्रांती झाल्याचं सुख मिळत होतं. स्टोव्ह आला तर पाठोपाठ घराघरात रॉकेलचे डबे आले, पंप आले, त्या पंपाच्या मदतीने उंच बाटलीत रॉकेल भरून घ्यायचं आणि नरसाळ्यातून ते स्टोव्हमधे घालून ठेवायचं. प्रत्येक माऊलीची सकाळ ‘‘ पेटती सकाळ ’’ असायची. दिवस सुरू व्हायचा तोच ज्वालाग्राही. घरातल्या माऊलीनं सगळ्यांच्या आधी उठायचं, न्हाणीघरातल्या बंबाचं सर्वप्रथम दर्शन घ्यायचं. बंबात तळातल्या जाळीवर कोळसे टाकायचे, मग घरात साठवून ठेवलेल्या चिंधीवर रॉकेल टाकून तो बोळा पेटवून कोळशावर टाकायचा, बंबात भर घालून पाणी तापत टाकलं की मग मधे मधे बंबात लाकडी किंवा बदामी कोळसे, अंगणातला काटक्या वगैरे कचरा, घरातल्या करवंट्या..असंही सामान स्वाहा व्हायचं. सगळ्यांच्या आंघोळी झाल्या की त्याच्या जाळीवरची राख काढून त्यावर घरातली भांडी स्वच्छ निघायची. एका बंबामुळे वीज... आणि फुरसुंगी कचरा डेपो, या हल्लीच्या प्रश्नांचा निकाल निघायचा. आणि व्हिमबारसारख्या वड्यांचा खर्च वाचायचा. गिझर आला आणि सुखच सुख झालं, नुसतं विजेचं बटण दाबायचं आणि गरम पाणी सुरू. पण त्यात इलेक्ट्रिक बिलाचा आकडा फुगला. आणि फुरसुंगीचे प्रश्न निर्माण झाले..

बंब पेटवला की स्वयंपाकघरात येऊन प्रायमस स्टोव्ह पुढ्यात घ्यायचा. काकडा स्पिरिटमधे बुडवून पेटवायचा. आणि बर्नरवर ठेवायचा. मग काडेपेटीने तो पेटवायचा. पावसाळ्यात काडेपेटी मऊ पडायची. त्यासाठी एका पत्र्याच्या कव्हरचा शोध लागला. बर्नर तापला की पंप मारायचा. त्या स्टोव्हची कृपा असली तो मुकाट्याने कामाला लागायचा. नाहीतर त्याचं भडकणं, मग किल्ली सैल करून परत त्याला शांत करणं, परत पंप मारणं, ही दोघांची मारामारीची जुगलबंदी चालू होई. त्याचं डोकं फिरलेलं असलं तर मग अनेक वितुष्ट यायची. पंपाचा वायसर.. वॉशर सत्याग्रहावर गेलेला असायचा. वायसर गेलेला असला तर कितीही पंप मारा, माऊली मेटाकुटीला यायची पण स्टोव्हचा असहकार चालूच असायचा. किंवा बर्नरमधे पिन घालून त्याला ठिकाणावर आणायला लागायचं. कधी तो एकदम भडकायचा कधी जीव चालल्यागत मरगळलेला चालायचा. कधीकधी पिनेची तार बर्नरमधे अडकून सगळा सत्यानाश व्हायचा. मग मात्र स्टोव्ह दुरुस्तीला न्यावा लागायचा. त्या दुकानातला काजळीत हात घालून काळाकुट्ट झालेला, दुरुस्त करणारा माणूस मग त्याला ताब्यात घेऊन बर्नर बदलणं, पिना मारणं, बर्नर तापवणं असा नाना युक्त्यांनी त्याची दुरुस्ती करायचा. त्या माणसाला कोणीही कधीही स्वच्छ कपड्यात पाहिलेलं नसायचं. एक तो आणि एक पिठाच्या गिरणीतला माणूस... ह्या दोघांना कुणीही कधीही स्वच्छ कपड्यात पाहिलं नाही, आणि पाहिलं तरी ओळखलं नाही.

मग क्रांती झाली आणि वातीचा स्टोव्ह आला..वातीचा स्टोव्ह आला आणि वाटलं.. काय क्रांती आली. बर्नर, पिना, स्पिरिट, वायसर...कसलीही कटकट नाही. तो भर्र्र्र आवाज नाही. स्टोव्ह बंद झाला की त्याचा घाण वास मात्र सहन करायला लागायचा. त्याची वात संपली की मात्र ती बदलायचं काम असे. त्याचीही उस्तवारी करायला लागायची, पण ते काम कितीतरी सोपं.

या स्टोव्हवर पितळी जड बुडाची पातेली, लोखंडाची कढई, चढायची. त्या पितळी पातेल्यांना कल्हई करून घ्यावी लागे. तो कल्हईवाला सकाळी कल्हऽऽई असं ओरडत यायचा. त्याच्या समोर घराघरातली पातेली पडायची. कल्हईचा भाव शेकड्यातच असायचा. चांदीसारखी चमकणारी कल्हई लावून तो निघून जायचा. त्याची भट्टीही बंद व्हायची. त्याचं ते नवसागर, झिलई देण्याचं सामान, सगळं घेऊन तो दुसऱ्या गल्लीत जायचा. मग हाळी यायची ती पाट्यावरवंट्याला

टाकी लावणाऱ्या वडारी बायकांची. पाट्यावर वाटून वाटून गुळगुळीत झालेल्या पाट्याला या बायका छान टाके पाडून द्यायच्या. पाटा वरवंटा, जातं, रगडा सगळी मंडळी खवलेदार व्हायची. मिक्सर आले आणि हा धंदा मोडीत निघाला. या कसबी लोकांची रोजीरोटीच बंद झाली.

एकदा हे स्टोव्हचे दोन ज्वलंत प्रश्न मिटले की पोटाच्या ज्वलंत प्रश्नाकडे वळायला माऊलीला फुरसत व्हायची. वातीचा आणि आवाजाचा, दोन्हीवर मिळून मग चहादूधाची पातेली चढायची. कामाला वेग यायचा. त्यानंतर काही वर्षांनी गॅस आला आणि सुखच सुख झालं. चुलीपेक्षा शेगडी चांगली, शेगडीपेक्षा स्टोव्ह बरा, त्यापेक्षा वातीचा स्टोव्ह चांगला, त्याहीपेक्षा गॅस म्हणजे सुखच सुख. आता शहरांमधल्या काही घरांमधून मायक्रोवेव्ह आला, त्यावर तर नुसतं बटण दाबायचं काम. पण वीज गेली की काम ठप्प.

निर्लेपने तर आणखीनच सगळं सोपं झालं पण शेगडीवर भाजलेल्या त्या वांग्याच्या धुरकट, खमंग वासाची मजा संपली. लोखंडी कढईत शिजलेल्या मेथीच्या भाजीची सय गेली. शेगडीवर भाजलेल्या कोवळ्या मक्याच्या कणसाचा स्वाद राहिला नाही. शेगडीच्या आत भाजल्या जाणाऱ्या कांद्याची गोडी विस्मृतीत गेली.

आता पहाट सरळ सोपी उजाडते, सैपाक सोपा झाला आणि बेचवही... गेले ते घमघमाटाचे चविष्ट दिवस.

कधीकधी वाटतं, आपण त्या बॅग पायपर आणि उंदरांच्या गोष्टीतल्या उंदरासारखे आहोत. संशोधक नवीन नवीन शोध लावत असतात, आणि आपण त्यांच्यामागून जातच असतो..काही कमावतो, काही गमावतो.

# नको दूर देशी जाऊ सजणा

परप्रांतीय..परप्रांतीय..पर.. बरोबर..लोंढेच शब्द येणार आहे पुढे..! सध्याचा चालू प्रश्न..लोंढे म्हणजेच बाहेरून आलेले.. सह्याद्री म्हणजेच सह्यपर्वत.. सह्याद्री लिहिल्यावर पर्वत शब्द लावावा लागत नाही. तसंच आहे हे! जुन्या काळापासून लोंढे हा शब्द बंगाली बाबूंसाठी वापरला जात असे . तोही केवळ या बंगाली लोकांचे तांडे त्यांचं नवरात्र संपलं की देशाटनाला बाहेर पडत म्हणून..जथ्याने देशभर हिंडत. लोंढे हे मराठीतील एक आडनाव सोडलं तर मराठी माणूस आणि परप्रांतीय ही जोडी जमत नाही. एक लोंढे आडनावाचे गायक फक्त एकटेच आणि गाण्यासाठी गावोगाव फिरणारे होते.

मुंबईत परप्रांतीय फार झाले आहेत हे वाक्य मुळातच चुकीचं आहे. आपण वसवली आहे का ही नगरी? कारण मुळात मुंबई वसवली आहे तीच मुळी इंग्रजांनी. ते परप्रांतीयच नव्हे तर परदेशीही होते. पोर्तुगीज राजाने आपल्या मुलीच्या लग्नात हे बेट म्हणे इंग्लंडच्या आपल्या भावी जावयाला आंदण म्हणून दिलं. कुठे पोर्तुगाल, कुठे इंग्लंड, कुठे मुंबई..मुलीच्या लग्नात जावयाला हुंडा द्यावा लागणं ही चिंतेची बाब पोर्तुगालच्या राजाला सतावीत होती हे आश्चर्यच..पण पोर्तुगालचा राजा हुशार! आपण जसं आहेर द्यायचा असेल तर आपल्याकडे आलेल्या वस्तू झब्बू करुन दुसऱ्याला आहेरात देऊन टाकतो, तसंच त्याही राजाने केलं असेल. हे दलदलीने भरलेलं बेट त्याने इंग्लंडच्या जावयाला देऊन टाकलं. बस आता डास मारत! असं तो मनाशी म्हणालाही असेल. म्हणजे आपण भारतीय हलवायासारखे, पोर्तुगालचा राजा तुळशीपत्र ठेवणार. आणि आपल्याला ते माहीतही नसणार? पण जावई मोठा हुशार! त्याने या बेटाचं सोनं करून टाकलं.

खरा प्रश्न आहे तो मुंबई कुणाची? पैठणचा भीमदेव राजा १२९५ साली मुंबईत येऊन गेला. तेव्हा त्याला साथ मिळाली ती भंडारी जमातीची. ते भोंगाळे वाजवत असत. मुंबईत वस्ती करून राहिल्या होत्या ५ जमाती. त्या होत्या, कोळी, भंडारी, पांचकळशी, सुतार वाडवळ आणि प्रभू . १७ व्या शतकाच्या सुरुवातीला इंग्रज आले. मग आता मुंबई कोणाची? इंग्रजांची की इथे

मूळच्या राहणाऱ्या कोळ्यांची की पाठारे प्रभूंची? मुंबईतील मूळ वसाहत या तिघांचीच..समुद्र म्हणजे कोळी असणारच. इंग्रज दर्यावर्दी म्हणून आले आणि पाठारे प्रभू? मुंबई खरं तर भाऊ दाजी लाडांची, जगन्नाथ शंकरशेट यांची, रामकृष्न गोपाळ भांडारकर यांची, विश्वनाथ नारायण मंडलीक यांची, मोहनदास रणछोडदास यांची, काशीनाथ त्र्यंबक तेलंग यांची, न्या. महादेव गोविंद रानडे यांची..,या नावांचा दबदबा अजूनही मुंबईत राखला गेला आहे.

पण पाठारे प्रभू हे खरे मुंबईचे प्रभू. ९ लाख रुपये खर्च करून भाऊचा धक्का बांधणारे भाऊ लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य, पुंडलिक सिनेमा बनवणारे रामकृष्ण बाळकृष्ण कीर्तीकर हे दोघेही पाठारे प्रभूच होते. मुंबई विद्यापीठ स्थापन होण्यापूर्वी एलफिन्स्टोनियन ( जे नॉर्मल स्कॉलर्स म्हणून ओळखले गेले ) म्हणून जे पदवीधारक बाहेर पडले त्या पहिल्या बॅचमधे नारायण दीनानाथ वेलकर होते. त्यांचे समकालिन होते दादाभाई नवरोजी, नवरोजी फर्दुनजी, रावबहादूर नानाजी मोरो त्रिलोकेकर, दादोजी पांडुरंग तर्खडकर,. वेलकरांचं कर्तृत्व फार मोठं होतं. इ.स. १८४० मधे ते मुंबई सुप्रिम कोर्टाचे चीफ ट्रान्सलेटर झाले. मुंबई महानगरपालिका जन्मण्यापूर्वी बोर्ड ऑफ कॉन्झरव्हन्सी मुंबईचा कारभार पाहात असे. मुंबई सरकारने मुंबईचे तीन भाग पाडून तीन म्युनिसिपल कमिशनर नेमले. दोन गोरे आणि एक नेटिव्ह. ते नेटिव्ह होते वेलकर. टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राचं सुरूवातीला नाव होतं, ' बॉम्बे टाईम्स. ' त्याचे चार मालक भागीदार होते तीन गोरे आणि एक वेलकर. आजच्या टाऊन हॉल आणि एशियाटिक लायब्ररीचे संस्थापकही वेलकरच होते. या वेलकरांनी चेणा आणि वरसोवे ही दोन गावं इ.स. १८४८ मधे सुप्रिम कोर्टाच्या सेल द्वारा विकत घेतली. त्यानंतर ठाणे आणि बोरिवली ही दोन गावे जोडण्यासाठी रस्ता हवा म्हणून १९११ मधे पी.डब्ल्यू. डी ला विनामूल्य विकली.

एकदा खेळती हवा हवी म्हणून सारी नारळीची झाडं तोडून टाकायचं ठरलं तर त्या ठिकाणी इमारती उभ्या राहतील असं भाकित वर्तवलं. रंगढंगात रमलेल्या आपल्या बांधवांना भानावर आणण्यासाठी अनेक उद्बोधक ग्रंथ लिहिले. पण मुळात पाठारे प्रभूंचा मूळ इतिहास काय होता?

इ. स. १९०४ च्या १ जुलै च्या मुंबई समाचारच्या गुजराथी अंकात पाठारे प्रभूंवर गंमतीशीर माहिती आली होती. ' पाटणना प्रभू बन्या पाठारे प्रभू या लेखात लिहिलं होतं की,

‘ पाठारे हा शब्द प्रतिहार शब्दापासून तयार झाला अशी आख्यायिका सांगते. हे मूळचे पाटणचे. गुजराथी आणि यांच्या रितीरिवाजांमधे खूप साम्य आहे, कारण गुजराथ मधे दोन पाटण गावं आहेत.त्यापैकी एका पाटणमधले काही लोक तेराव्या शतकात राजा बिंबबरोबर मुंबईत राहायला आले. हा राजा प्रतापबिंब तरी कोण, तर त्याने इ. स. ११३८ मधे उत्तर कोकणवर स्वारी केली. त्याने पैठण नेवासे मार्गाने जुन्नरवरून दमणवर हल्ला केला आणि दमण ते चिखलीपर्यंचा प्रदेश मिळवला. मग तो तारापूरवरून महिकावतीला पोचला. त्याने महिकावतीला म्हणजे आजच्या माहीमला आपली राजधानी केली. मग कळव्याच्या कोकाटेंचा आणि ठाण्याच्या शिलाहारांचा पराभव करून मढ-वेसावेवरून वाळकेश्वरला पोचला. १०० वर्षे राज्य केलं याच्या घराण्याने. शत्रूंनी यांचा पराभव केल्यावर वांदऱ्याजवळ नवीन माहीम राजधानीची स्थापना करून ते तिथे स्थिरावले. त्यांनी मातंगालयाला म्हणजे आजच्या माटुंग्याला गजशाळा उभारली. न्यायग्रामला न्याय दिला जाऊ लागला. त्यातील काही आजच्या सिध्दीविनायकाच्या देवळाजवळच्या भागात राहू लागले. त्यांना पाठारे प्रभू नाव पडलं. एका शाम नायक नावाच्या माणसाच्या स्वप्नात देवी आली आणि विहीरीतून मला काढ म्हणू लागली. शाम नायकाला खरोखरच विहीरीत देवी सापडली. तीच आजची प्रभादेवी. काळा राम, गोरा राम, महेश्वरीदेवी, काळबादेवी ही सारी मंदिरं पाठारे प्रभूंनी बांधली. गिरगावातील नवी वाडी इथे जे महेश्वरी देवीचं मंदिर आहे त्याची आख्यायिका अशी की, तिथे पांडुरंग वेलकर नावाचे गृहस्थ राहायचे. त्यांनी मोठं घर बांधण्यासाठी अंगणातलं चाफ्याचं झाड तोडायचं ठरवलं. त्या झाडावर कुऱ्हाड चालवू लागल्यावर मी इथे आहे, मी इथे आहे असे शब्द ऐकल्याचा त्यांना भास झाला. म्हणून त्यांनी जमीन खणली तेव्हा त्या जागी देवीची मूर्ती सापडली. तिची विधीवत् प्राणप्रतिष्ठा करून देऊळ बांधलं गेलं. त्यानंतर आले पारसी. सुरतेचं महत्व संपल्यावर पुरुष, बायका, मुलं असे १. १०, ५४४ लोक मुंबईत आले.

मुंबईचा हा जुना इतिहास. इंग्रजांच्या वास्तव्यामुळे मुंबईत सतत राजकीय प्रतिष्ठितांची सतत वर्दळ असे. मुंबईच्या जन्मापासूनच ती कॉस्मॉपॉलिटन. आजच्या अमेरिकेसारखी. रेड इंडियन सोडले तर मूळचं तिथे कुणीच नाही. मुंबई ही उद्योग नगरी. ‘ चला जरा मराठी माणसाबरोबर राहून आनंद लुटून येऊ असं म्हणत कुणीही इथे येत नाही. येतात ते घाम गाळायला, मेहनत करायला, पैसा करायला! रात्रभर जागी असणारी ही नगरी. लोकलच्या खडखडाटाने सतत धावणारी. सारखे रूळ बदलणारी..मंगलोरचा शेट्टी इडली डोसा विकतो, पंजाबी छोले भटुरे यांनी लोकांना तृप्त करतो. चीन आणि अमेरिकेत न मिळणारी अमेरिकन चॉप्सी

ही चायनीज डिश फक्त इथेच शोधली गेली. आपला गाव सोडून आलेला मारवाडी वाणी इथे लोकांच्या पोटापाण्याला लागणारं धान्य विकत राहतो. उत्तरेतून आलेला भैय्या कोणतंही काम करायला नाही म्हणत नाही. कमी भांडवलाचं पण खूप मागणी असणारं पानपट्टीचं, चुरमुरे-भेळेचं, फळांचं, छोटं दुकान त्यांचंच. पंजाबी दिसतील टॅक्सीच्या चाकावर. इथला मराठीही धावत असतो. एक ते चार झोप हा मंत्र इथे कुणालाही माहीत नाही. इथल्या कुणालाही मुंबईची हवा चांगली नाही.असं जाणवत नाही कारण ते पैका मिळवतात आणि ए.सी लावून झोपतात. गादीवर अंग टाकलं की ते झोपतात इतके दमलेले असतात.

खरं तर परप्रांतीय होण्याचा पाया श्रीरामचंद्राने आणि कृष्णाने घातला. अयोध्या सोडून श्रीलंकेपर्यंत प्रवासाला जाऊन येणारा तो पहिला यु. पी.चा राजकुमार. त्यानंतर मथुरा सोडून द्वारकेत जाऊन वसती करणारा कृष्ण हा दुसरा, खरं तर द्वारकेतला परप्रांतीयच. पण त्याकाळात वर्तमानपत्र नसल्यामुळे तो आरडाओरडा जास्त झाला नसावा. इंग्रजांप्रमाणेच कृष्णानेही एक बेटच आपल्या वास्तव्यासाठी निवडलं. तिथे राहून त्याने द्रौपदीला वस्त्र पुरवठा केला. ते पाहून मूळच्या तिथल्या गुजराथ्यांनी त्यालाच आपला देव मानून तोच व्यवसाय स्वीकारला आणि सुरत, अहमदाबाद इथे वस्त्रोद्यागाला सुरुवात केली. आता त्याला टेक्सटाईल इंडस्ट्री म्हणतात. अगदी नागदा ( डा) सूटींग नावानेही गुजराथ्यांनी कापडं विकली.

खरं तर परप्रांतीय हा शब्दच चुकीचा आहे कारण घटनेने आपल्याला भारतभर कुठेही राहण्याचा हक्क दिला आहे. प्रश्न एवढाच आहे की आपण ‘ नको दूर देशी जाऊ सजणा हे गाणं म्हणत रडायचं की ‘ का धरिला परदेस हे गाणं पाठ करायचं ? केरळात आणि पंजाबात जाऊन आपले बटाटेवडे, नागपुरी वडाभात, मोदक पैठणी, हलव्याचे दागिने, तिळाचे लाडू, विकायचे की मराठी थाळी आणि थालिपीठ लोकप्रिय करायचं ?

पण परप्रांतात जायचं तर घरापासून दूर राहायला शिकावं लागणार..नवीन भाषा आत्मसात करावी लागणार घरकाम शिकावं लागणार..व्यवसायातील खाचाखोचा शिकाव्या लागणार. अजिबात गायला न येणाऱ्या काही जातींमधे गाता येत नसलं तरी विव्हळल्यासारखी गाणी अंत्ययात्रेला आणि भर लग्नाच्या वरातीत गायली जातात, तसं धाडस आपल्यात असलं आणि बिनधास्तपणा असला की कोणताही व्यावसाय सोपा होईल.

आता मात्र थोडा थोडा बदल नवीन तरुणांमधे होताना दिसतो आहे. जगाच्या पाठीवर कोणत्याही देशाच्या शहरांमधे एकादा भारतीय रस्त्यावरून चालतांना दिसायला लागला आहे. युरोप अमेरिका बघायला भारतीय लोक हिंडायला लागले आहेत. फ्रान्सच्या लिडो शो ने पॅरिस मधे याची दखल घेत गणपती नमन सुरू केलं आहे. जगात जगभर दोनच जमाती फिरल्या. एक इंग्रज आणि दुसरे गुजराथी. भारताला सुरतेपासून बंगालपर्यंत समुद्र किनारा मिळाला. त्यात गुजराथी आफ्रिकेत गेले, बंगाली सिंगापूरपर्यंत पोचले, अरब आणि दुबईला जाणाऱ्या केरळी लोकांनी पैका मिळवून घरं बांधली, तामिळी श्रीलंका-मलेशियात स्थिरावले. महाराष्ट्रालाही किनारा मिळाला. पण काहीजण कोकणातून मुंबईत पुण्यात आले आणि गिरण्या बंद पडल्यावर परत कोकणात गेले..कोकणात गिरणी निघालीच नाही.माणसं असूनही...

मराठी माणसांचे लोंढे आणि मराठी माणसाला परप्रांतीय ही बिरुदावली कधी लागणार एवढाच गहन प्रश्न आहे..

# कहानीमे ट्विस्ट.

खरं तर या आपल्या ऊपरवाल्या रायटरसारखा ड्रामा रायटर जगात कुणी नाही. किती अगणित पात्रं, त्यांच्या आयुष्यात किती कहाण्या, किती नाट्यमय घडामोडी, किती वळणं, किती अचानक ट्विस्ट, किती प्रवेश आणि किती अचानक एक्झिट. , केवढा अचानक शेवट..किती रोमहर्षक व्यक्तिरेखा.. या सर्व पात्रांचा संवाद रायटर तो एकटाच. रंगभूषाकार तो एकटाच –हिंस्त्र व्याघ्रमुख, बालकाचं हास्य, तेज:पुंज विद्वानाचं रूप, तारुण्याचा बहर, वार्धक्याचा ओसर! दिग्दर्शक तो एकटाच. मानवाच्या चेहऱ्यावरचे नाक-डोळे-ओठ-दात-कान-मान ..पण प्रत्येक नग वेगळा. तेच सहा रिपू नावाचे स्वभाव विशेष.. काम-क्रोध-लोभ-मोह-मद-मत्सर-पण प्रत्येकजण वेगळा. या जगातली एन्ट्री आणि एक्झिट तोच ठरवणार आणि एकदा ठरलं की नाहीच बदलणार. महाभारतात वर्णन केल्याप्रमाणे लाल रंगाचा अंगठ्याएवढ्या आकाराचा प्राण जो आजवर कुणालाही कोणत्याही सोनोग्राफी मशिनमधे सापडलेला नाही, त्या प्राणाचं रहस्य त्याच्याच हाती. प्राण गेला की ते कळतं. माणूस नाटक लिहितो, पण त्यातील पात्रांमधे प्राण फुंकू शकत नाही. कालिदास जन्मतो पण मेघदूतातील नायकात कालिदास प्राण वायु भरू शकत नाही. मानव हुबेहुब गुलाब बनवतो पण त्याला जीवंतपण देऊ शकत नाही. ते प्राण फुंकण्याचं सिक्रेट त्याने अजून मानवाला कळू दिलेलं नाही.

इवलासा, मोहरीएवढ्या आकाराचा, विशाल सागर-सूर्य आणि आकाश एकाच क्षणात कवेत घेणारा नेत्रगोल, मूठभर आकाराचं ह्रदय, मूठभर आकाराचं गर्भाशय, मूठभर आकाराचा मेंदू देऊन या पृथ्वीतलावर मानवाला पाठवणारा हा नियंता आहे तरी कोण? डायनासोर आणि मुंगीचं गर्भाशय घडवणारा, तोच ईश्वर..एका लहान बीजात थोराड देवदाराचं रूप लपवणारा, चार थेंबांमधे मानवाचं अवघं देहरूप त्याच्या जगण्याच्या वेळापत्रकासकट, त्याच्या गुणदोषांसकट, त्याच्या शेवटासकट सामावणारा.. कधीही कुणालाही न दिसलेला पण अस्तित्व दाखवून देणारा.. ‘‘ तुज सगुण म्हणू की निर्गुण रे! ‘‘ असं म्हणत संतांनी कोडं उलगण्याचा खूप प्रयत्न केला. पण

त्यांनाही त्या विठू माऊलीने दर्शन दिलं नाही. कुणा न दिसती त्रिखंडात या हात विणकऱ्याचे '' म्हणणाऱ्या ग. दि. मांचाही तोच अनुभव..ईश म्हणजे असणे. ईश्वर म्हणजे सर्वत्र असलेला..वायु आणि सुगंधासारखा असूनही चिमटीत न सापडणारा. या चराचराचा उद्गाता. लाव्हा रसासारखा उग्र, वाळवंटासारखा तप्त, त्सुनामीसारखा रौद्र. चेत अचेताचा निर्माता. पंख न फाडता फुलपाखरांना रंगवणारा कनवाळू, बाळासाठी दूधाची निर्मिती करणारा दयाळू! तो दिसला नाही म्हणजे तो नाहीच तर मग '' आपण रचावं आणि त्याने मोडावं '' ही इंग्लीश म्हण आली तरी कशी ? तोच सगळं घडवत असेल तर मग नियती म्हणजे कोण ?

स्वदर्शनासाठी निर्मिलेलं प्रभावी माध्यम, ईश्वराचं साधन म्हणजे मानव आणि त्याची बुध्दी.

ईश्वराने जीवन दिलं. त्या आयुष्यातील प्रत्येक क्षण शाश्वत आणि प्रत्येक क्षण अशाश्वतही. शाश्वत आणि अशाश्वत क्षण दोन डोळ्यांसारखे..सदैव एकत्र चालणारे, क्षणभंगुरतेचा डोळा सदैव वटारलेला..आयुष्य म्हणजे सुख-दुःख, पाप-पुण्य, सुदैव-दुर्दैव यांच्या बरसातीत भिजत पडलेलं घोंगडं. काम-क्रोध हे षड्रिपू त्याच्या दशा. संयत असतील तर मनाला उभारी देणाऱ्या, अतिरेकाने आयुष्याची दशा करून टाकणाऱ्या. ईश्वरावर विश्वास ठेवला तर अंधश्रध्दा निर्मूलनवाले उखडणार, नियतीवर भरोसा केला तर भाविक उखडणार..

मग अंधश्रध्दा म्हणजे तरी काय ? अंध तर फार डोळस असतात. ते कधीही अपघातात मृत्यू पावत नाहीत, खड्ड्यात पडून जखमी होत नाहीत, बनावट पैसे देऊन फसत नाहीत आणि कुणाला फसवतही नाहीत..ते सगळं चौर्यकर्म डोळसांचं. '' जब दीप जले आना '' म्हणणारं हृदय अंधच तर होतं, पण प्रेमिकांची कातरवेळेची हुरहुर त्यालाही डोळसाएवढीच जाणवत होती..म्हणजे अंध शब्द बाद झाला. मग राहिला श्रध्दा शब्द! तो तर खरा अंधच! कारण तो काही कसोटीवर घासून पारखलेला आणि स्वीकारलेला शब्द नव्हे. पण त्याची ओळख तर जन्माच्या क्षणापासूनच सुरुवात होते. जन्मल्या जन्मल्या आपल्याला कुठे आपल्या आईचा चेहरा आठवत असतो.. कुणीतरी शिकवतं आणि आपण त्या साडीतल्या देहाला आई म्हणायला लागतो. पण मग कळतं ते अनुभूतीनं..तिच्या डोळ्यातली अपार माया हीच अनुभूती जी तिच्या त्या पदावर विश्वास ठेवायला लावते..आई आणि दाई यांच्यातील फरक बालकाला असाच कळतो..हृदयाला जाणवलेली आणि मनाला खात्रीने पटलेली एक शक्ती..म्हणजे श्रध्दा. आई तीच ईश्वराच्या अस्तित्वातही दिसते, जेव्हा तांडवनृत्य करणारा गोपीकृष्ण तांडवनृत्य करणाऱ्या शक्तीचं, शंकराची अनुभूती देतो, जेव्हा

तुकोबा-ज्ञानोबा-चोखोबा सारेचजण विठूमाऊलीचं ' कर कटावरी ठेवियले ' हे वेगवेगळ्या शतकात एकच वर्णन करतात तेव्हा..कितीही अंतराळयानं अवकाशात गेली तरी न दिसणाऱ्या या जगड्व्याळ सृष्टीच्या नियंत्यावर विश्वास ठेवावा लागतो. मग ती श्रध्दा की अंधश्रध्दा? मृत्यूनंतर मानव परलोकात जातो म्हणतात, तो परलोक तरी कुठे दिसतो? हे कोडं जोपर्यंत उलगडत नाही तोपर्यंत श्रध्दा ही अंधश्रध्दाच?

मग त्यादिवशी काय झालं? अचानक ट्विस्ट कशाने आला? भल्या पहाटे अधुऱ्या उजेडात एक जीव एका गोळीने कायमचा नाहीसा झाला. तो आपल्याबरोबर फक्त देह घेऊन गेला, आपले अंधश्रध्देच्या निर्मूलनाचे विचार इथेच टाकून गेला..त्याचे अनुयायी आले आणि त्यांनी ती अदृष्य विचारांची मशाल आपल्या हाती घेतली..ज्ञानाची ही मशाल अशीच तर एकेक कोपरा उजळत जाते. एक मशाल विझली. पाठोपाठ आणखी दोन विझल्या. अजून कितीतरी जन्मतील..आणि विझतील. नवविचार देणाऱ्यांना मृत्यूदंड ही तर ग्रीक कालापासून चालत आलेली परंपरा.. मानव सागर एवढा आहे, तो सगळा प्रज्वलित करायला लाखो मशाली लागणार. पण ती मशाल कुणी व्हायचं तेही तोच ऊपरवाला ठरवणार..कुणी कसं जगायचं ते तोच ठरवणार..

सुधीर फडके, वसंत बापट, हेमा मालिनी याच नावांनी जगायचं कुणी आणि का ठरवलं? " जायाचंच की कधीतरी पटदिशी " म्हणणारे वसंत बापट गेले. ठीक आहे. वयही कमी नव्हतं. दुसरे दिवशी प्रिया तेंडुलकर गेली. आणि अचानक आणखी एक कहानीमे नया मोड आला आणि तिसरे दिवशी शिवाजी सावंत गेले. सरस्वतीने आपले तीन पुत्र तीन दिवसांमधे अपहरण करून नेले. असं अचानक वळण रामाच्या आयुष्यातही आलं. वनातून अचानक सीता गायब? काय सांगायचं जनकाला? कोणत्या तोंडाने जायचं त्याच्यासमोर? रामाच्या आयुष्यात केवढा मोठा ट्विस्ट! महाभारत तर सतत नागमोडी वळणाने जाणारं..

पेशव्यांच्या शनिवारवाड्यात नारायणरावांचा खून झाला. अंत्यसंस्कारासाठी पेशव्यांचा पार्थिव उचलतांना त्यांच्या पत्नीने सती जाण्याचा हट्ट धरला. आणि आनंदीबाईंच्या तोंडून जे शब्द निघाले त्यांनी अचानक राजकारणाला कलाटणीच मिळाली. गंगाबाईंना दिवस गेले होते, म्हणून सती जाणं गंगाबाईंना शक्य नव्हतं हे वाक्य आनंदीबाईंनी उच्चारलं आणि राघोबादादांच्या हातून सत्ता निसटली. तिथे उपस्थित राजकारण्यांच्या मनात बारभाईचं बीज रूजतं. किती क्षुल्लक घटना! पण कहानीमधे केवढा मोठा ट्विस्ट.

आधुनिक काळात असंच एक रामायण घडलं. निक्सन या अमेरिकेच्या अध्यक्षाला वॉटरगेट प्रकरणी राजीनामा द्यावा लागला होता. त्याची सुरुवात किती साधी झाली होती! एका साध्या दिवशी एक साधा नौदलातला शिकाऊ तरुण बॉब वुडवर्ड व्हाईटहाऊसच्या स्वागत कक्षात बसला होता. तिथे त्याला मार्क फेल्ट नावाचा माणूस भेटला आणि सत्तांतर होण्याइतकी कलाटणी त्या क्षणाला मिळाली. बस्स्! अमेरिकेच्या इतिहासात डीप थ्रोट नावाने तो प्रसिध्दी पावला.

हिरोशिमा आणि नागासाकीची कहाणीही अशीच अचानक वळण घेणारी आणि मोठा संहार घडवून आणणारी ठरली. एक दिवस जर्मन वृत्तपत्रांमधे एक साधी बातमी झळकली की जर्मनी अणुचं विभाजन करण्यात यशस्वी झालं. त्याकडे कोणी लक्षही पुरवलं नाही. पण एक दिवस दोन शास्त्रज्ञ आईनस्टाईनला भेटायला आले आणि जर्मनी जगाला जिंकेल म्हणून अमेरिकेनेही अणुसंशोधन करावं असं पत्र अध्यक्षांना लिहावं अशी कळकळीची विनंती केली. पण आईनस्टाईनने ती नाकारली. पण शास्त्रज्ञांच्या प्रयत्नानंतर त्यांनी पत्र लिहिलं. अध्यक्षांनीही अणु विभाजन करायचं नाही असंच ठरवलं. मिटींग संपल्यावर सगळे घरी गेले. दुसरे दिवशी सकाळी. सचिवांना पाहिल्यावर अध्यक्षांनी सचिवाला सहज विचारलं, ‘‘ टेल मी, हाऊ वॉज् द नाईट ‘‘ सचिव म्हणाला, मला झोप लागली नाही. ‘ का ? ‘ अध्यक्षांनी विचारलं.

‘‘ मला रात्रभर नेपोलियनची कथा आठवत राहिली. शास्त्रज्ञांचं त्याने ऐकलं नाही. ऊंच लाटांवर विजय मिळवण्यासाठी यांत्रिक बोटी, मोटार लाँच तयार करू आणि मग इंग्लंडवर स्वारी करू हे त्यांचं म्हणणं नेपोलियनने मानलं नाही. आणि वाटर्लुला त्याचा पराभव झाला. ‘‘अमेरिकन अध्यक्षांनी लगेच सभा भरवली आणि अणुसंशोधनाला गुप्तपणे सुरुवात झाली. देशभरातले शास्त्रज्ञ उचलले गेले. गुप्तपणे ठेवले गेले, अणूचा स्फोट घडवला गेला. हिरोशिमा नागासाकीच्या विध्वंसानंतर आईनस्टाईनला अपरिमित दुःख झालं. ‘‘ त्या पत्रावर सही करणारी माझी बोटं जाळून घ्यावीत असं मला आज वाटतंय ‘‘ असं म्हणाला.

कोणत्याही यशस्वी व्यक्तीच्या चरित्रात अनेकवेळा एकच वाक्य हमखास दिसतं. ‘‘ मला खरं तर हे करायचंच नव्हतं पण अमूक तमूक झालं आणि मी या क्षेत्रात उतरलो. ‘‘ मग कोणीतरी म्हणतं, जग हे बंदीशाला.. आपल्या हातात काहीच नाही हे लक्षात आल्यावर त्य शक्तीला मानव वंदन करतो. आणि अपयशाने जे मनाने खचतात किंवा अतिलोभाने हावभरी होतात, त्यांच्या दुबळ्या परिस्थितीचा फायदा घ्यायला तांत्रिक-मांत्रिक जादूटोणा करणारे पुढे येतात. लोभ जितका

जास्त तितका मंत्र कडक. मग त्यातून जन्मतात गुन्हेगार. प्राणहत्या. त्यांच्यावर नियंत्रण तर हवंच.

तसं बघायला गेलं तर जादूगार नाही का आपल्यासमोर टोपीतून कबूतरं काढत. आपण पैसे देऊन त्यांचे खेळ पाहायला जातो. पण ते फसवत नाहीत. ही आमची हातचलाखी नजरबंदी आहे असं सरळ सांगतात. आणि आपण ती कला म्हणून पाहतो. अंधविश्वास आहे म्हणूनच तर रामराज्याची स्वप्नं दाखवणाऱ्या राजकारण्यांना आपण निवडून देतो. ते त्यांची तुंबडी भरत राहतात. आपण एक दिवस आपले सुखाचे दिवस येतील या स्वप्नांमधे गेली ६० वर्षे उखडलेल्या रस्त्यांवरून चालत राहतो. जनतेच्या रक्षणासाठी पोलीसदल सज्ज आहे म्हणतात, तरी मंगळसूत्रं जातच असतात, तरूणींचे चेहरे अॅसिडने भाजतच असतात, दरोडे पडतच असतात, ४ वर्षांच्या बालिकावर बलात्कार होतच असतात..पोलिस गुन्ह्यांचा शोध लावणार ही श्रध्दा निर्मूलनाचा संदेश देणारे बाळगतच असतात. हीसुध्दा त्यांची अंधश्रध्दाच नाही का?

असल्या भ्रष्टाचाराच्या, अत्याचारांच्या, वाढलेल्या महागाईच्या उबग आणणाऱ्या बातम्या वाचून झाल्या की आपण पेपर खाली ठेवायला लागतो त्याच वेळी बातमी दिसते, कुणी तरी मरणोत्तर अवयवदानाने अज्ञाताचा जीव वाचवलेला असतो, आणि त्याच वेळी विविध भारतीवर लता-आशा-रफीचं जुनं सुंदर गाणं लागलेलं असतं. अचानक आपल्या मनात त्या सुंदर सुरावटीची आनंदाची कारंजी उडायला लागतात. अचानक कहानीमधे ट्विस्ट येतो. या अचानक आलेल्या या ट्वीस्टने आपण बातम्या विसरतो आणि कामाला लागतो.

- - - - - - - -

# जया अंगी मोठेपण

समर्थ रामदास स्वामी एका ओळीत एक मोठं सत्य सांगून गेले. समर्थांचा एकएक शब्द म्हणजे मुशीतून झळाळून उठलेल्या सोन्याचा एकएक लखलखीत सुवर्णकण. दासबोध तर तरुणांसाठीची गीताच. प्रत्येकाला आयुष्याचं मार्गदर्शन करणारं काव्य.

ह्या कवी लोकांचं हे बरं असतं. नेमक्या आणि मोजक्या शब्दांमधे ते खूप काही सांगून जातात. लेखक मंडळी पानंच्या पानं त्यासाठी रिचवतात. पण विस्ताराने सांगतात. पण कवी आणि लेखक एवढे हे शब्दप्रभू असून कवींना लेख लिहिता येत नाहीत आणि लेखकांना कविता करता येत नाहीत. हे असं का? म्हणजे प्रतिभेचा प्रसाद देणाऱ्या खरंच कुणी देवता असतात का? या देवता आपल्या भक्तांना भरभरून प्रासादिक शब्द पुरवतात आणि मग त्यांना लोक ज्ञानोबा – नामदेव – तुकोबा - यांच्यापासून ग. दि. माडगूळकर या नावाने लोक पिढ्यान् पिढ्या ओळखत राहतात. विठू माऊलीने तर अशी कवी रत्नांची खाणच निर्माण केली. आणि लेखनाची उर्जा देणारी कोणती देवता असेल? गणपती? कालिदासापासून शेक्सपियरपर्यंत साहित्य निर्माण करणारे हे असे अनेक लेखक मानवी मनाच्या सुखदु:खांचा वेध घेत राहतात. ह्या देवतांची संकल्पना मात्र फक्त आपल्याच वेद पुराणांमधून दिसते.

आयुष्य क्रिकेटच्या मैदानावर घालवलेल्या आणि त्यात बॅटिंगमधे ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या क्रिकेटर्सना बोलिंग करता येत नाही? असं का? शास्त्रीय गायन करणाऱ्या गायकाला कव्वाली म्हणता येत नाही, भावगीत गायकाला दादरा ठुमरी गाणं कठीण जातं. त्यासाठी भीमसेन जोशी, शोभा गुर्टु, सुधीर फडकेच जन्मावे लागतात. ही शक्ती कोण देतं ?माहीत नाही.

जया अंगी मोठेपण तया यातना कठीण म्हणणाऱ्या समर्थांनी सावधान हाही मंत्र जगाला दिला. या मोठेपण बाळगणाऱ्या सर्व विभूतींनी हा मंत्र रक्तात भिनवला... चाणक्य - शिवाजी महाराज- झांशीची राणी- सावरकर..अलेक्झांडर – नेपोलियन कितीएक असे थोरपण बाळगणारे

आणि यातना सोसणारे मेरूमणि. मानसिक ताण या नावाखाली यांची मनं कमकुवत झाली नाहीत. त्यांना कोणत्याही मानसोपचार तज्ञाकडे जावं लागलं नाही. किती बलवान असेल यांची मन:शक्ती..

मग पहिले आठवतात ते महाराज..मानसिक यातना सोसणारे मेरुमणी. मोंगलांसारखा बलाढ्य शत्रू छातीवर झेलत सदा सावधानपणे हिंदूंसाठी आधारवड झालेले महाराष्ट्राचं दैवत असलेले शिवराय. वीररसाने ओथंबलेल्या त्यांच्या महाप्रतापी कथा वाचल्या तर कोणताही दुर्बळ मानसिकतेचा जीव उपचार केल्यासारखा जरा उभारी धरेल. शाहिस्तेखानाला मारण्यासाठी लाल महालात जाणं एकवेळ सोपं, पण सारा वाडा आक्रोशाने, आणि आरोळ्यांनी जागा झाल्यावर त्या वाड्यातून बाहेर कसे पडले असतील? लाल महालावर जाणं, शाहिस्त्याला मारणं आणि परत येणं यात महाराजांनी किती क्षणाक्षणाचं नियोजन केलं असेल? कात्रजचा घाट तर दूरदृष्टीचं दूरगामी विचारांचं आणखी एक ज्वलंत सावधान मनाचं उदाहरण! आजच्या काळासारखं फोटो काढणं, त्याची जगभर प्रसिध्दी करणं त्याकाळात कुणालाच माहीत नव्हतं, म्हणूनच लालमहालाच्या बाहेरच्या कुणीही मोगलाने त्यांना ओळखलं नसेल.. दाढीमिशा उरतवून गेले असतील का महाराज या मोहिमेवर? की सगळे मोगल दाढीमिशा राखणारे, त्यामुळे त्यामुळे त्यांच्यातून सहज निसटले असतील? निदान पोशाख तरी मोगलांसारखा केला असेल का? कुणीच का नाही लिहून ठेवलं महाराजांच्या या पराक्रमाबद्दल आणि त्यांच्या बारीकसारीक तपशीलाबद्दल!!

आणि ती त्यांची आग्र्याहून सुटका!..अटकेत पडलोय हे कळल्यावरही त्यांचं मन शांत राहू शकलं म्हणजे ते किती निग्रही असतील? किती कठोर मनाचे असतील? आपण अटकेत पडलोय, आणि कुटील धूर्त आरंगजेबाच्या तावडीत सापडलोय हे कळल्यावरही क्षणाक्षणाचं नियोजन कसं केलं असेल त्यांनी? गुप्तहेरखात्याचा त्यांचा उजवा हात बहिर्जी नाईक कसा कामाला लागला असेल? हजारभर सुपरमॅन आणि हजारभर रॉबिनहूड ओवाळून टाकावेत असा चित्तथरारक प्रसंग संभाजी-राजाराम-शाहू-येसूबाई-ताराबाई या कुणीच का सांगितला नाही..त्यांची ही सुटकेची साहसकथा आपल्यासाठी का नाही लिहून ठेवली? निदान त्या मिठाईवाल्याच्या वंशजांनी तरी आपण केलेली ही सेवा लिहून ठेवायची!..कोण असेल तो एवढी गोड कामगिरी करणारा मिठाईवाला?

असं तर झालं नसेल ? ...

शिवाजीमहाराजांनी आपल्या फौजेला घरी परत पाठवण्याचा निर्णय बादशहाला कळवला.. बादशहाने आनंदाच्या उकळ्या फुटत असलेलं चेहऱ्यावर न दाखवता आनंदाने परवानगी दिली ? कारण महाराज एकटेच आग्र्यात राहिले तर त्याला आणखीनच सोयीचं झालं असतं. महाराजांचे विश्वासू सैनिक बाहेर पडले. घराकडे जाताना लागणारी दस्तकं म्हणजे परवाने त्यांच्या हाती आले. मग ती बाहेर पडलेली फौज कुठेतरी गडप झाली असेल..बहिर्जीच्या हाताखाली दिल्ली – आग्र्याच्या जवळपासच्या घरांमधे विरघळून गेली असेल.. कितीतरी असंतुष्ट हिंदू लोकांनी मराठ्यांना मदतीचा हात गुप्तपणे दिला असेल..आपल्या घरात या शिपायांना आचारी पाणके, नोकर म्हणून कामाला ठेवलं असेल.. बहिर्जीने दस्तकांची नक्कल करून ठेवली असेल.. मग कधीतरी कोणालातरी मिठाईच्या पेटाऱ्यांची कल्पना सुचली असेल. दिल्ली-आग्र्याजवळ घुटमळत संधीची वाट पाहत बसलेल्या शिवरायांच्या धाडसी मावळ्यांनीच गावातल्या औरंगजेब बादशहाच्या विरोधकाच्या मदतीने मिठाईचं दुकान उघडलं असेल. . . त्याच दुकानातून मिठाई बंदिवान महाराजांच्या महालात यायला लागली असेल ?

त्याकाळात नाणी, मोहरा, असा खजिना भरायला लागणारे पेटारे मोठे मोठेच असणार..ते उचलायची कामगिरी मल्ल लोकच करत अशणार.. मग महाराज निसटले त्यादिवशी तेच महाराजांचे फौजी शिपाई मिठाईच्या दुकानामधून मिठाईचे हारे आणणारे नोकर बनले असतील आणि शिवरायांना घेऊन पसार झाले असतील.. महाराजांच्यासाठी प्राणाचे मोल देणारे ते शिवरायांचे लाडके मावळे किती शूर असतील.. महाराजांसाठी एक पेटारा - युवराज संभाजींसाठी एक पेटारा आणि उरलेल्या पेटाऱ्यांमधे मिठाया ? की त्याही काही पेटाऱ्यांच्या तळाशी तलवारी आणि ढाली असतील ?.. नक्कीच असतील.. महाराज बाहेर पडतांना कुणी त्यांना हटकलं, बिंग फुटलं, महाराज किंवा बालराजांच्या जीवाला धोका निर्माण झाला तर ..युध्दप्रसंग ओढवला तर शस्त्रं हवीतच. महाराजांनी त्याची तयारी ठेवलीच असेल ना ?...महाराज बाहेर पडले..

त्यांचे घोडे तयार होते, संभाजीराजांना सोडून जातांना महाराजांना किती यातना झाल्या असतील ? बाळराजे सुखरुप घराकडे परततील की नाही याचा किती घोर लागला असेल ?..बाळराजांना एकदा शेवटचं उराशी घट्ट धरलं असेल आणि मग बापाचं प्रेमळ मन बाजूला करून त्यांनी कठोरपणा धारण केला असेल आणि बाळराजांना विश्वासाने सोपवलं असेल.. शेवटी

तुळजाभवानीलाच साकडं घातलं असेल आणि तिच्यावरच बाळराजांना सुखरुप पुण्याला पाठवण्याची जबाबदारी टाकली असेल..ठिकठिकाणच्या दस्तकांच्या वापरानंतर महाराज मुक्त झाले असतील आणि सिसोदिया घराण्याच्या मदतीने गुजरातमधे शिरून सुरतेवरून समुद्र मार्गाने कोकणातून पुण्याला गेले असतील? काय झालं असेल काय माहीत..

किती मानसिक यातना झाल्या असतील या काळात महाराजांना..! औरंगजेबाचं नाक कापलं गेलं.. किती संतापला होता तो महाराजांवर ते नंतर कळलं जेव्हा त्याने संभाजीराजांचा एकेक अवयव तोडत छळ करून मृत्यूदंड दिला.. महाराजांचा राग तर त्याने संभाजीराजांवर नाही काढला? शक्य आहे..

तशीच झांशीची राणी लक्ष्मीबाई....इंग्रजांचा गराडा किल्ल्याभोवती पडलेला असतांना कापरासारखी उडून गेली नाहीशी झाली..इंग्रजी सेनापती सर ह्यू रोज आश्चर्यचकीत झाला.. ही राणी गेली तरी कुठे? निसटली तरी कशी? १२ वर्षांच्या बाळराजाला पाठीशी बांधून, त्याच्यासाठी फक्त दूध पिण्यासाठी पेला घेऊन, रात्रभर घोडदौड करत राणी नानासाहेब पेशव्यांच्या तळावर पोचली.. राणी आणि तिचा घोडा..दोघंही दमलेली होती. दोघांनी समाधानाने जमिनीवर आपलं शरीर टाकलं.. दुसरे दिवशी राणीने निरोप पाठवला ... " मासिक पाळी चालू आहे.. मी तशीच बाहेर पडले आहे...वस्त्रांची गरज आहे..राणी इंग्रजांच्या पंजातून मोकळी झाली होती..किती यातनांमधून गेली असेल ती...किती यातना.. किती देशभक्ती..

शत्रूच्या तडाख्यातून सुटका करून घेतलेला तिसरा भारतीय म्हणजे विनायक दामोदर सावरकर. सावरकर म्हणजे एक अंगारच..देशप्रेमासाठी अंदमानात अडकून पडले.. कोलू फिरवत राहिले.. पारतंत्र्यात अडकलेल्या मातृभूमीच्या शृखंला गळून पडाव्यात म्हणून स्वतःच्या पायात शृंखला अडकवून बसले..इंग्रजांना घालवून स्वराज्याचं स्वप्न पाहणारे लोकमान्य-लाला लजपतराय कितीएक..भारतमातेचे मातृभक्त.. देशाचे सुपुत्र..प्रवाहाविरूध्द जाऊन लोकांचे दगड खात मुलींना शिक्षण देण्याचा ध्यास धरणाऱ्या सावित्रीबाई..विठ्ठल रामजी शिंदे..कितीतरी कोवळे क्रांतीकारक काळ्या पाण्याची शिक्षा भोगत राहिले.. यातना भोगत राहिले.. त्यांच्या मोठेपणाचा पाया त्याग होता, देशासाठी तळमळ हा श्वास होता.. ऐहिक सुखांची त्यांनी होळी केली होती.

मोठेपणा त्यांना भारतीयांनी दिला.. त्यांना मात्र मानसिक आणि शारीरिक यातनाच मिळाल्या..

आज सारं आठवलं ते जयललितांचा मृत्यू झाला तेव्हा त्यांचं एक वाक्य वाचनात आलं..

त्या म्हणाल्या होत्या..

‘ या पदाला पोचेपर्यंत मी अनेक नरक पार केले आहेत..“ बिचारी एक स्त्री..त्यांच्या या वाक्यातून वेदनाच बाहेर पडल्या. मुख्यमंत्री पदाला पोचल्यावर मात्र सूड घेत पुरुषांना लोटांगण घालायला लावत राहिल्या..हजारो साड्या, किलो किलो सोनं जमवत राहिल्या.

आताच्या घसरत गेलेल्या राजकारण्यांच्या प्रतिनिधी..कुठे ते जुने क्रांतीकारक कुठे हे आताचे राजकारणी..पारतंत्र्य झुगारणारे योगी राजकारणी आणि आताचे भोगी राजकारणी.. शिवरायांनी कोणत्याही गड आणि किल्ल्याला आपल्या कुटुंबातील कोणाचंही नाव दिलं नाही..आणि आता अम्मा-अप्पा-भाऊ नावाने चाललेला ‘ अहंम् ‘ चा बाजार.

नशीब! जयललितांना मराठी येत नव्हतं. नाहीतर त्या म्हणाल्या असत्या,

‘‘ समर्थांनी वापरलेला जया शब्द म्हणजे मीच आणि माझ्याच यातना.. माझ्याच अंगचं मोठेपण..

# सगळाच गुंता.

घरातल्या बाल्कनीच्या कठड्याला धरून ती छोटी मुलगी उभी होती. तिचे इवलेसे डोळे कठड्याच्या जरासेच वर येत होते, त्यामुळे तिला रस्त्यावरचं सारं काही दिसत होतं. आईची वाट पाहत उभी होती ती! ऑफिसमधून आईच्या येण्याची वेळ झाली होती. भूकही लागली होती तिला.. डोळे आईला शोधात असतानाच तिला एक दाढी वाढलेला मळके कपडे घातलेला, काळा काळा भिकारी माणूस इमारतीजवळ येताना दिसला. ती घाबरली. आता तो वरती आला तर? त्याच्याकडे बघायचही तिच्यात धाडस नव्हतं. कधी एकदा आई येते असं झालं होतं तिला. इतक्यात तो भिकारी समोरच्या इमारतीत शिरला आणि काहीतरी शोधत हिंडायला लागला. भित्र्या नजरेने, ती त्याच्यावर पाळत ठेवल्यासारखी, तो जाईल तिथे बघायला लागली. शोधक नजरेने चालता चालता तो कचऱ्याच्या ढीगापाशी थांबला. तळमजल्यावरच्या एका घरात पूजेनन्तरची जेवणं चाललेली होती. तिथली उष्टी केळीची पानेही त्या ढिगात पडली होती. तो भिकारी तिथेच घाणीत बसला. आणि ती उष्टी पानं पुढे ओढून त्यातलं उरलेलं खरकट अन्न खायला लागला. जे हाताला येईल ते तो बकाबका खायला लागला. ती त्याच्याकडे अनिमिष नेत्रांनी बघत राहिली. किती घाण, किती कचरा, कण न कण तो निपटत होता. इतक्यात त्या घरातली बाई पुढच्या पंगतीतील खरकटी पानं टाकायला बाहेर आली. तिने त्या भिकार्याला त्या घाणीत बसून जेवताना पाहिलं. ती समजली. आत जाऊन तिने एक जेवणाने भरलेलं केळीचं पान आणून त्याला दिलं. त्याने ज्या कृतज्ञतेच्या नजरेने त्या बाईकडे पाहिलं ती नजर तिने पहिल्यांदाच अनुभवली होती. पोटभर जेऊन तो भिकारी निघून गेला. इतक्यात तिला तिची आई येताना दिसली. ती आधीचं सर्व विसरली आणि आईकडे जायला धावली.

आठ-दहा दिवस गेले. संध्याकाळी आईबरोबर बाजारातून येतांना तिने लोकांची गर्दी पाहिली. आईबरोबर तीही गर्दीत शिरली. एक माणूस मरून पडला होता. तिने त्या माणसाचा चेहरा पहिला आणि ती दचकली. भुकेने व्याकूळ झालेला त्या दिवशीचा तोच भिकारी होता हा! आजूबाजूचे लोक बोलत असताना तिने ऐकलं.. ते म्हणत होते की तो भुकेने मेला.. भूक लागलेला आणि मेलेला माणूस तिने पहिल्यांदाच पाहिला होता. त्या दिवसानंतर तिने कधीही अन्न टाकलं नाही. आपल्या ताटात तिला तो माणूस दिसायचा आणि अन्न मिळालं नाही तर काय होतं आणि तेव्हा ते किती मोलाचं असतं ते ती कधीच विसरली नाही.

- - -

स्टुडियोत शूटिंग चालू होतं. कॅमेरामन, मेकपमन, लाईट्स, नायिका, नायक, सगळेच कामात व्यस्त होते. आपल्या मासिकांसाठी काही बाईट मिळतो का पाहायला पत्रकार तिथेच घुटमळत होते. “ कट “ चा आवाज मध्येमध्ये घुमत होता. आज नायिकेचं काही खरं नव्हतं. सहा वेळा रिटेक होऊनही दिग्दर्शकाच्या मनासारखा अभिनय तिच्या हातून उतरत नव्हता. तोही संयमाने नायिकेला सांभाळून घेत होता. आता शेवटचा प्रयत्न करायचा, नाहीतर सामान गुंडाळायचं हे त्याने मनोमन ठरवून टाकलं होतं. परत तोच सीन सुरु झाला. नायिका बोलत बोलत नायकाजवळ आली, आणि इतक्यात काय होतंय हे कळायच्या आत नायिका खाली कोसळली. दिग्दर्शक त्या संकटाने कोसळायचा राहिला एवढंच. सगळीकडे धामधूम झाली. पत्रकारांची तर पर्वणीच झाली. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे अशीच अत्यानंदाची उकळी त्यांना फुटली. नायिका आजारी आहे हे विसरून ती कशाने आजारी आहे, काय झालं याच्यामागेच ते लागले. घाईघाईने नायिकेला एका खोलीत नेलं. तिच्या मागे तिची आई, नोकर वगैरेही धावले. थोड्याच वेळात डॉक्टर आले. पत्रकारांचे कान भिंतीला लागलेच होते, चक्कर येऊन कोसळण्याला त्यांच्या दृष्टीने खूपच चमचमीत अर्थ होते.

डॉक्टर बाहेर आले, डाएटच्या अतिरेकाने तिला अशक्तपणा आलाय आणि पोटात काहीही नसल्यामुळे तिला अतिश्रमाने भोवळ आली आहे एवढं सांगून ते

निघून गेले. लगेच दिग्दर्शकाच्या चेहऱ्यावर आनंद पसरला, पत्रकार निराश झाले. एका नायकाबरोबर तिचं गुफ्तगू चालू असल्याच्या बातम्या सर्वत्र झळकत होत्या. म्हणून काहीतरी मसालेदार मिळेल याची त्यांना अशा होती पण ती फोल ठरली. आपला सिनेमा थांबणार नाही या आनंदात दिग्दर्शकाने त्यादिवशीच शूटिंग बंद करून टाकलं. इतक्यात तिथे तिची डायेटीशियन आली. तिच्या सल्ल्यानेच आपली नायिका दिवसभर प्रत्येक घास खात असते. आपला एवढा महत्वाचा क्लाएनट म्हटल्यावर तिलाच बेशुध्द व्हायची वेळ आली होती. आल्याबरोबर लगेच तिने नायिकेला काहीतरी खायला दिलं आणि दोघी घरी गेल्या. वजन कमी करण्याच्या नादात जरा अतीच झालं होतं.

तिचा व्यवसाय तिला पोटभर खाऊ देत नव्हता. तिच्या घरातीलं नातेवाईक, गडीमाणसं, ड्रायव्हर, हेअर ड्रेसर तिच्या कोट्यावधी रुपयांच्या मिळकतीवर ताव मारत होते. आणि ती मात्र रोज अर्धी वाटी दही, पाव वाटी भाजी, एक कप ज्यूस पीत राहत होती. साखर बघितली की तिचा चेहरा पांढराफटक पडत होता.

“ आताचा जमाना असाच आहे. त्या सिनेमात काम करणारी एक जुनी नटी म्हणाली..आताच्या दिवसांमध्ये एक पौंड वजन वाढणं म्हणजे एक लाख रुपये कमी होणं. आमच्या काळी नव्हतं एवढं अतिरेकी बारीक होणं. शरीर आतून कितीही पोकळ आणि खोकला असू दे, बाहेरून बारीक दिसलंच पाहिजे. आता रसरशीतपणा, शरीराला योग्य ती गोलाई नसली तरी चालेल. नकली पापण्या, नकली केस, नकली नखं, सगळं शरीर नकली अवयवांनी सुंदर करता येतं पण सुदृढता विकत मिळत नाही. आताचे दिवस असे आहेत की आपलं बीज काय ते जाणून न घेता, आंब्याच्या झाडालाही नारळाच्या झाडासारखं बारीक आणि उंच दिसायचंय “..ती जुनी नटी ८६ वर्षांची आहे.. अजून भूमिका मिळाली तर शूटिंगला येऊन काम करते आहे..या नट्या ४० वर्ष टिकल्या तरी खूप झालं..ती पुटपुटली..

- - - - -

..सहा फूट १० इंच उंच, चार फूट रुंद आणि १५० किलो वजनाचा एक सुप्रसिध्द मल्ल मुलाखत देत होता.. त्याचा रोजचा आहार किती असतो ते सांगत होता. तीन किलो चिकन, २५ रोट्या, कित्येक लिटर दूध, असं किमान आहार तो रोज करतो. मग मेहनत.. कमी खाऊन चालतच नाही त्याला. कुस्ती हरला तर कित्येक हजारांचं नुकसान आणि नावाला बट्टा लागतो ते वेगळंच.

तो तरी काय करणार.. त्याचा व्यवसायच त्याला कमी खाऊ देत नाही.

- - - - - - - - - -

कुठलं तरी एक भकास खेडं. उजाड परिसर, कोरड्या मातीचे रस्ते, धुळीने माखलेली घरं, आबादी कुठेही दिसत नव्हती. शेतं भकास होती. पाण्याचा सुकाळ नसलेल्या खुणा जागोजाग दिसत होत्या.

त्या गावातील शेतकऱ्याने कर्जाला कंटाळून आत्महत्या केली होती. गावातले पोलीस पाटील शेतकऱ्याचे नातेवाईक, सारे त्याच्या घराला भेट देऊन गेले होते. मुलीच्या लग्नासाठी कर्ज काढलं होतं, ते फेडता येणार नव्हतं म्हणून गळफास लावून शेतकऱ्याने आपलं आयुष्यच संपवलं. सगळी गर्दी हटल्यावर शेतकर्याचा भाऊ विधवा भावजयीला भेटायला आला.

“ तिसरी मुलगी होणार त्यापेक्षा गर्भ पडून टाक असं सांगितलं होतं मी त्याला..तिसरी मुलगी झाली हे कळल्यावरही त्याला सांगितलं होतं कि लगेच मारून टाक नाहीतर एक दिवस पस्तावशील..पण ऐकलं नाही आणि आता जीव गमवून बसला..” आपला शहाणपणाचा सल्ला भावाने ऐकलं नाही याचा त्याला राग आला होता.

शेतकऱ्याच्या विधवेने दिराकडे जळजळीत नजरेनं पाहिलं. तिच्या त्या नजरेत खूप काही संताप भरला होता. त्या नजरेचा अर्थ कळल्यामुळे दीर निघून

गेला. " मुलीचा जन्म होणं म्हणजे पुरुषाचा पोटात अंश जास्त असणं आणि मुलगा होणं म्हणजे बाईचा अंश जास्त असणं हे कुणी सांगायचं या मूर्खाला, विधवा मनात म्हणाली. गावात येणाऱ्या डॉक्टरने बायकांना हे समजावून सांगितलं होतं त्या दिवशी सगळ्या बायका अचंबित झाल्या होत्या. मग आम्हाला मुलगी झाली की आपल्याला का हो दोष देतात हे पुरुष आणि सासरचे लोक? एका बाईने भर सभेत डॉक्टरना विचारलं होतं. मुलींना शिकवूया म्हटलं तर ऐकलं नाही. " बाई आता मनातल्या मनात उदास झाली.

संध्याकाळी पारावर सगळे गावकरी गप्पा मारायला जमले. एक सुशिक्षित त्यांना वर्तमान पत्र वाचून दाखवत होता. मुलींची संख्या देशात कमी झाली आहे, ही बातमी त्याने जोरात वाचली. पाठोपाठ स्टेमसेलवरचीही बातमी त्याने वाचली. कोल्हापूरचे डॉ. पत्की आणि पुण्याचे भोंडे यांनी नवीन संशोधनातून महत्वाची माहिती शोधून काढली होती.स्त्रीच्या गर्भाशयातून मिळणाऱ्या पेशींमुळे अनेक दुखण्यांवर मात करता येणार होती.

या बातमीवरून परत चर्चा सुरू झाली.

" म्हंजी गर्बाशयाची जरूर लई वाडणार म्हना की! मंजी लेकी होणं हे आपल्याला फायद्याच ठरनार की लेका..

व्हय! आता लेकीन्ना मारून टाकण्यात काही अर्थ नाही हे लक्षात ठिवा म्हंजी जालं. गप्पांचा अड्डा उठला. परलोकी गेलेल्या अगणित अश्राप गर्भानी डॉ पत्की यांना दुवा दिला. आता कर्ज काढून आत्महत्या करायची गरज नव्हती.

- - - - - - - -

समुद्र किनार्यावरच्या एका सुंदर भव्य हॉटेलच्या दारात सगळी मंडळी उभी होती. एवढ्या मोठ्या हॉटेल मध्ये सर्व लोक प्रथमच येत होते. कुतूहल तर मोठं

होतं. एक महिन्याचा पगार एका जेवणात संपेल एवढं बिल येणाऱ्या ठिकाणी एरवी कोण जेवायला येणार? पण आज बिलाचे दुसर्याच्या खिशातून पैसे जाणार होते. त्यामुळे जेवायच्या निमित्ताने पंचतारांकित हॉटेल असतं तरी कसं हे बघायला सगळेच उत्सुक होते. सगळे आत शिरले. थाटामाटात जेवण झालं. स्वर्गीय वातावरणात रमलेले मग भानावर आले. जेवण झालं होतं. सर्वजण गाडीपाशी आले. सर्वांनी मिळून एकच मोठी गाडी ठरवली होती. गाडीत बसताना सामानाशी कुणीतरी खेळलेलं लगेच लक्षात आलं. सगळेच दचकले. सर्वांनी आपापलं समान तपासलं. सर्वांचं सामान व्यवस्थित होतं. सगळयांनी सुटकेचा निश्वास टाकला. पण एकीला मात्र लगेच कळलं की तिच्या सीटवर ठेवलेला ब्रेड मात्र चोरीला गेलाय. तिच्या तोंडाची चवच गेली. इतका वेळ जो आनंद ती उपभोगत होती त्याची माती झाली होती.

कुणीतरी भुकेला असावा... त्याला फक्त ब्रेडच हवा होता... ती मनाशी म्हणाली.

- \- - - - - -

-

- सगळाच गुंता होता..

- एकाकडे श्रीमंती आहे, पण जेवता येत नाही,

- दुसरीकडे खूपच जेवावं लागतं. थोडसं जेवता येत नाही..

- तिसर्या ठिकाणी घरात पोत्यांमध्ये दाणे असूनही रुढीमुळे कुणी प्राण गमावतोय.

- चौथा भिकारी सगळीकडूनच कंगाल आहे.

-

# गेले ते दिवस.

विज्ञानाने आपण खूप पुढे जातो,खूप प्रगती करतो, असं ते शास्त्रज्ञ आपल्या भाषणात सांगत होते. आपलं अंतराळयान यशस्वीपणे उडलं म्हणून ते खूप आनंदात होते. विश्वाचा शोध लावण्यात आपणही भाग घेतोय याचा त्यांना सार्थ अभिमान वाटत होता. सौर उर्जा वापरून घराघरात वीज, कचऱ्यापासून वीज...

तेव्हा आठवला एक अमेरिका.. अमेरिका नावाचा सिनेमा. त्या इंग्लिश सिनेमाची सुरुवात अशी होती....हे एक छोटे गाव आहे. इथले लोक सुखासमाधानाने राहात होते. एकमेकांकडे जात होते. गावात एकोपा होता. सगळे सगळयांना ओळखत होते. पण फोनचा शोध लागला आणि लोक एकमेकांशी फोनवरून बोलायला लागले. एकमेकांकडे त्याचं जाणं येणं कमी कमी होऊ लागलं. मग गाड्यांचा शोध लागला आणि त्या गावात गाड्या आल्या. गावातून बग्गीतून फिरतांना दिसणारे लोक फक्त क्षणभरच जातायेतांनाच दिसायला लागले. गावातला एकमेकांशी असलेला संबंध या नवीन शोधांनी संपर्क संपला. मग लोकांना वाटायला लागलं.. गेले ते दिवस.....आपणही आता ते अनुभवतोय. जिन्याने वर खाली जाताना इमारतीतले लोक भेटायचे. आता लिफ्टमधून जाणारे एका इमारतीत राहूनही भेटत नाहीत. गेले ते दिवस असं आता आपल्याला सुध्दा वाटतं.

पण निसर्ग मात्र अजून तसाच राहिला आहे. तीच थंडी, थंडीत मिळणारी त्या दिवसातली फळं, तीच पानगळ. थंडी संपते आणि मग मार्च एप्रिल येतो. सुरुवातीच्या दिवसांमधे परीक्षा आल्या, की घराघरातून मुलांचे अभ्यास घेतांना माऊलींचे कधी चढलेले कधी रागावलेले आवाज येतात. परीक्षा संपली की दुपारी मुलांचे खेळण्याचे आवाज येतात. दुपारी मुलांना खाली खेळायला पाठवून माऊल्यांचा जरा डोळा लागला की तळमजल्यावर राहणाऱ्या आणि मुलांच्या दंग्यामुळे झोपमोड झालेल्या संतापलेल्या आजोबांचा रागावलेला आवाज ऐकू येतो..

सगळं वातावरण गरमच असतं या दिवसांमधे..भडक उन्हाळा येतो. तो पांगारा, गुलमोहोर, अबोली, बोगनवेलींच्या भडक रंगांचा, केशरी आंबा, लालभडक कलिंगडांचा. गर्द जांभळ्या जांभळांचा. चाफ्यांच्या, मोगऱ्याच्या घमघमाटी सुवासाचा. आइसक्रीमच्या थंडगार चवीचा

आणि उन्हाळी झळांचा, आणि गर्दीने भरलेल्या रसवंती गृहांचा! पहाटे ठो चार वाजता कोकलायला लागणाऱ्या कोकिळेच्या आवाजाने झोपमोड होण्याचा..उन्हाळा तोच..ते सगळं तसंच राहिलं आहे.

निसर्गाने काहीही सुधारणा केल्या नाहीत. त्याचं सगळं तसंच असलं तरी पण बदललं आहे ते घरातल्या उद्योगांचं स्वरूप. उन्हाळा आला की किती कामं असायची ५०/६० वर्षांपूर्वी. उन्हाळा म्हणजे सौरउर्जेचा जास्तीत जास्त वापर करण्याचे धावपळीचे दिवस..वर्षाची साठवणं, वाळवणं हा मोठा उद्योग त्या दोन महिन्यांमधे असायचा..

नवीन आलेले तांदूळ निवडून, चाळून, बोरिक पावडर लावून डब्यात भरून ठेवल्यावर, वेगळ्या काढून ठेवलेल्या कण्यांच्या चकल्या एक दिवस सकाळी उजाडता उजाडता सुरू व्हायच्या. एक दिवस पाच-दहा किलो बटाटे घरात येऊन पडायचे. सकाळी घरातली मोठी पातेली बाहेर निघायची. त्यात बटाटे उकडत पडायचे. ते उकडून झाले की सोलून अंगणात किंवा गच्चीवर न्यायचे. त्यासाठी घरातली जुनी पातळं आधीच काढून ठेवलेली असायची. ती गच्चीवर नेऊन अंथरायची. त्यावर भराभरा बटाटे किसायचे, कीस पसरायचा. लुगड्याच्या बाजूने चार टोकांना दगड ठेवायचे. संध्याकाळी ती कोरडी झालेली लुगडी घरात आणायची आणि वाळलेला कीस सोडवत बसायचं. गच्चीवर जाऊन येऊन पाय दुखायला लागायचे.

मग त्यालाही पर्याय आला. मोठं प्लास्टिक घराघरात शिरलं आणि कीस सोडवायचं काम सोपं होऊन गेलं. वर्षभराचे तांदूळ, चण्याची डाळ, तुरीची डाळ भरलेले डबे झाले की पुढचे पत्र्याचे डबे असायचे ते तांदूळ आणि साबुदाण्याच्या पापड, पापड्या, सांडगे, कुरडया, चिकवड्या, यांचे. चमच्या चमच्यांनी साबुदाणा घालायचा, पातळ पापुद्यांच्या पापड्या, सांडगे वाळत पडायचे, दुपार झाली की शेजारणी, सख्या, मैत्रीणी आपापलं पोळपाट-लाटणं घेऊन पापड लाटायला मदतीला यायच्या आणि चहा पिऊन जायच्या. पुढे येणाऱ्या उपवासांची, सणांची ही तयारी असायची. त्या बटाटा कीसाला शुभ्रपणा कसा येईल याची सिक्रेटस् एकमेकींना सांगितली जायची. त्याकाळी दुपारी चॅनेल आणि मालिका नव्हत्या पण घरात जमलेल्या त्या दहा बायका म्हणजे दहा चॅनेल्स असत. गावभरच्या बातम्यांची, सासवा-सुनांची बित्तंमबात माहिती सगळ्यांना कळायची.

पुढचा दिवस उजाडायचा तो छुंदा करून ठेवण्याच्या कामाचा. आंबा, साखर, पातेलं, त्यावर बांधलेला दादरा सगळं परत गच्चीवरच्या उन्हात तापत बसायचं. छुंदा तयार झाला की चिनी मातीच्या मोठ्या बरणीत तो भरला जायचा. आणि उंच फळीवर छुंदा असं लिहून ठेवला जायचा. ओळीने चिनी मातीच्या बरण्यांची रांग लागायची. एकात छुंदा, एकात मोरंबा, एकात लोणचे. कैऱ्या आणायच्या, चिरायच्या, मसाले लावून तेलाच्या फोडणीत बुडवून वर्षभराच्या पुरवठ्यासाठी बरणीत भरायच्या आणि बरण्यांच्या रांगेत जाऊन बसायचं.

आणखी एक बरणी असायची ती तयार करून ठेवलेल्या पन्ह्याच्या घट्ट गराची....पण ती फक्त उन्हाळ्यापुरती तात्पुरती तजवीज असायची. त्याकाळात फ्रीज, मिक्सर नव्हते. गृहिणींच्या मदतीला एकमेव सखा धावून यायचा तो म्हणजे पुरणाचं यंत्र. त्यातच सगळं व्हायचं. एका मोठ्या नऊवारी लुगड्याचे कितीतरी उपयोग होत..जुन्या मोठ्या पातळाचे अनेक तुकडे पडायचे. काहींचे दादरे व्हायचे, काहीचे गाळायला उपयोग व्हायचे, काही वाळवणांच्या कामाला वापरले जायचे.

मग अचानक एक संध्याकाळ तारांबळ व्हायची..त्यातही मजा व्हायची. अचानक ढग भरून यायचे. वारा सुटायचा आणि सगळ्या गृहिणी गच्चीवर धावायच्या. येणाऱ्या पावसाच्या सरीपासून गच्चीत, अंगणात वाळत पडलेली ती लुगडी वाचवायची असत.

मग मोर्चा वळायचा तो शिकेकाईकडे. शिकेकाई दळायच्या गिरण्यांना, हळद-तिखट दळून देणाऱ्या गिरणीवाल्याला क्षणाची उसंत नसायची. त्या शिकेकाईच्या शेंगांमधे गव्हलाकचरा, नागरमोथा असं काय काय पडायचं, गिरण्या आल्या आणि मोठं काम छोटं झालं. सकाळ अशी उन्हं चढायच्या आधीच्या ह्या वाळवणांच्या कामांनी संपली की सुटीसाठी आलेल्या पाहुण्यांच्या, माहेरवाशिणींच्या अगत्याला सुरुवात व्हायची. बंबात पाणी तापायचं. त्यात घरातला सगळा कचरा संपायचा. आंघोळींना पाणी उपसलं जायचं, त्यात भर पडायची, खाली विस्तव पेटलेला आहे की नाही यावर बारीक नजर ठेवली जायची. न्हाणीघर धुराने कोंडल्यामुळे आंघोळीही पटापट उरकल्या जायच्या.

संध्याकाळ असायची ती चैत्राच्या हळदीकुंकवांची. आदल्या दिवशी हरभरे भिजत पडायचे. पन्ह्याचा गर काढून तयार केला जायचा. घरातला शालू दोरीवर सोडला जायचा. पुढे

घरातल्याच वस्तूंनी उतरंड केली जायची. त्यावर गौर पाळण्यात बसायची. प्रत्येक पायरीवर सजावट केली जायची ती घरातल्याच वस्तूंनी. मोराच्या, बदकांच्या जोड्या बाहेर निघायच्या. सकाळी मोगऱ्याची फुलं आणून दुपारभर त्यांचे गजरे केले जायचे. आयत्यावेळी आणायचा तो दुकानातून बर्फ. तो त्या पन्ह्यात पडायचा. हळद-कुंकू, अत्तर, गजरा, थंडगार पन्हं, डाळ आणि ओटीत हरभरे, की झालं चैत्रातलं हळद-कुंकू.

मे महिना म्हणजे मंगलकार्यांचा महिना. लग्नाचा मेनू ठरलेला. जिलबी, मसालेभात, भजी आणि आळूची पातळ भाजी. दोन दोन पक्वान्नं, पुलाव, वगैरे काही नाही. गावात कार्य असलं की अचानक येणारे पाहुणेही असायचेच. ते कधी कुठल्या हॉटेलमधे उतरायचे नाहीत. कुणाच्या तरी नातेवाईकाच्याच घरी उतरायचे. या सगळ्या गडबडीमधे कामवाल्या बायका रजा घ्यायच्या कारण त्यांना कार्यालयात कामं मिळायची. मग तोही रोल घरातल्या बायकांना करावा लागायचा.

बघता बघता मे महिना संपत यायचा. त्याचाही परवलीचा सांकेतिक निरोप निसर्गाकडून धाडला जायचा. अचानक वावटळ उठायची. अंधारून यायचं..टपोऱ्या गारांचा थाडथाड सपाटा सुरू व्हायचा... घरामधे फरशीवर धूळ पसरायची. रस्त्यातल्या लोकांची तारांबळ उडायची. अंगणात पडणाऱ्या गारा वेचायला मुलं घरातून बाहेर यायची, त्या गारा वेचायची आणि तशीच खायची. दोन तीन महिन्यांपासून पावसासाठी आसुसलेली धरतीची काया पाण्याने भरून जायची. मातीने भरलेले ओहोळ वाहायला लागायचे. कुठेतरी एक वीजेचा खांब पडायचा आणि क्षणात वीज जाऊन घराघरात अंधार पसरायचा. मग कंदील निघायचे. सगळेच लोक घराबाहेर आलेले असायचे, आणि मागल्या वर्षापेक्षा यंदा पाऊस उशीरा आला की लवकर या चर्चेमधे बुडून गेलेले असायचे. पाऊस आला की सुटी संपत आल्याची जाणीव व्हायची..मामाचा गाव सोडून घरचे वेध लागायला सुरुवात व्हायची...

अजून सुट्या लागतात, पाऊस येतो पण ते दिवस मात्र गेले आता...शांपूमुळे शिकेकाई संपली. दुकानांमधे मिळणाऱ्या तयार पाकीटांनी वाळवणं संपली. लोणच्यांच्या तयार बाटल्या मिळायला लागल्या. त्यात चिनी मातीच्या बरण्या गडप झाल्या. दादरा म्हणजे काय ते आता

कुणालाही माहीतही नाही. बाहेरगावांहून येणारे पाहुणे सकाळच्या गाडीने येतात, संध्याकाळच्या गाडीने परत जातात, राहिले तरी हॉटेलमधे उतरतात. पंक्ती संपल्या.. एक वाढीच्या बुफे जेवणांनी उभ्याउभ्या घास घशाखाली लोटायचे. आणि परत जायचं..

ती वाळवणं, हळदीकुंकवं, सगळं काळाआड गेलं..सुधारत गेलो. हळदीकुंकवाच्या जागी किटी पार्टी सुरू झाल्या. गाड्या आल्या पार्किंगचा प्रश्न वाढला. माणसाच्या मूळ भावना तशाच राहिल्या आपल्याला प्रगती करतोय वाटतं, पण ती ट्रेडमिलवरची पळापळ असते.

# हे मला माहीत नाही

बातम्यांची वेळ झाली म्हणून टी.व्ही. लावला. नेमकी वेळ झाली आणि जोरजोरात, रसभरीत बातम्या वेगवेगळ्या वाहिन्यांवरून सांगितल्या जाऊ लागल्या. तेव्हा जुन्या हिंदी मराठी सिनेमांची आठवण झाली. त्या सिनेमांमधे एक मुलगा वर्तमानपत्रातली सनसनाटी ठळक बातमी जोरजोरात ओरडत सांगत रस्त्याने धावत जाई. त्याला पेपर खपवायचा असे. आता अशी काही परिस्थिती नसते. माईक असतो, हळू आवाजात बोललं तरी आवाज मोठा करण्याची लोकांना सोय असते. रेडियोवरून बातम्या सांगणारे श्रीकांत मोघे, विश्वास मेहेंदळे, देवकीनंदन पांडे हे सगळे कुठे असे जोरजोरात ओरडून बातम्या द्यायचे? तेव्हाच्या बातम्याही आताच्या बातम्यांसारख्या झणझणीत नसायच्याच म्हणा. कुठे घोटाळे नाही, कुणी भ्रष्टाचारी नाही, मंगळसूत्र ओढणं नाही, चिमुरड्यांवर बलात्कार नाही. बरेच लोक बरेच सभ्य होते. आता पैसा खूप, चंगळ खूप त्यामुळे हाव खूप हे संपतच नाही.

आता बातमीदारांच्या मते रोजच कुठला तरी प्रश्न ऐरणीवर आलेला असतो. कधी देशाच्या सीमांचा, कधी सडक्या सडकांचा. रोज इतके प्रश्न ऐरणीवर असतात, की ते नंतर कुठे सारले जातात तेच कळत नाही. ती ऐरणही कुठे पहायला मिळत नाही. ती दिसते कशी, बनते कशी, वापरली जाते कशी हे सगळं आता कालबाह्य झालंय. पण प्रश्न अजून ऐरणीवरच असतात. लोहार लोखंडाला आकार देण्यासाठी भट्टीतून लाल लाल करून ठोकण्यासाठी ज्याच्यावर ठेवतो, ते ऐरण! ऐरणीप्रमाणेच ताकास तूर लागू न देणं म्हणजे तरी काय? ती तूर ताकाला कुठे, कशी लावायची ते तरी कुणाला माहीत आहे? फूस लावून पळवून नेली म्हणजे काय केलं? ती फूस कशी असते आणि कुठे लावायची?

तसाच दुसरा शब्द म्हणजे प्रश्न धसाला लावणं. आता धस कुठे मिळतो, त्याला काय काय प्रश्न टांगता येतात तेच कळत नाही. मग कळलं की धस म्हणजे खुंटी, किंवा आपला साधा खिळा. त्यावर प्रश्न लटकवला की तो समोर राहतो, त्यामुळे दिसतो आणि सोडवला जातो एवढंच. ऐरण

काय, पैरण काय, वैरण काय ( वैरण अजूनही आपल्या राजकारण्यांनी चाराघोटाळे करून जिवंत ठेवली आहे.) पैरण आली की सदरा आलाच. पैरण हा मूळ शब्द उर्दूतला..पैराहन म्हणजे वस्त्र. आठवतोय तो ‘‘ पारा पारा पैराहनियाँ हा गुलाम अलीच्या गझलमधला शब्द. चिंध्या चिंध्या झालेल्या हृदयरूपी वस्त्राची अवस्था.‘‘ सदरा म्हणजे काय ? आता कुणालाच त्याचा अर्थ माहीत नाही. मराठी लिपी आहे म्हणून सदर-सदरा-सादर यातला फरक तरी वाचता येतो, आणि अर्थ तरी वेगवेगळा कळतो. इंग्लीशमधे हे लिहिलं असतं, तर सगळ्यांचं स्पेलिंग एकच झालं असतं.

हे स्पेलिंग पाठ करण्यात सगळ्याचंच आजवर बालपण रटाळ झालंय! त्या इंग्रजांनी एवढं आपल्याकडचं नेलं, जरा शब्दांच्या काना-मात्रा-वेलांटी-रफार नेऊन आपल्या इंग्लीश शब्दांना लावले असते तर शोफर, सायकालॉजी, न्युमोनिया, कर्नल असे शब्द आताच्या मुलांपर्यंत सर्वांना लिहायला कितीतरी सोपे झाले असते! अजूनही वेळ गेलेली नाही आता खरंतर ग्लोबल भाषेची आणि लिपीची जरूर पडत चालली आहे.. इंग्लीश लिपी आणि आपल्या कानामात्रा. किती छान होईल वाचन! सबंध सुटी आंबरस ओरपण्यात घालवायची आणि शाळा सुरू झाल्यावर आधी मँगो शब्द शिकायचा आणि मग मँगो शब्दांचं स्पेलिंग पाठ करत बसायचं.

त्याचं फार फार वाईट वाटलं, जेव्हा ‘‘ सेंट जॉर्जेस डायरीज् ’’ हा, मद्रासमधल्या इंग्रजांचा इंग्लंडशी झालेला पत्रव्यवहार वाचायला मिळाला तेव्हा! ईस्ट इंडिया कंपनीने मद्रासमधे वखार घातल्यानंतर तेव्हाच्या इंग्रजांनी पत्रं लिहिली त्यात लिहिलं होतं... आम्ही इथे मँगो नावाचं फळ खाल्लं. मद्रासी लोक आंब्याला मांगई म्हणतात, त्याचं इंग्रजांनी मँगो केलं. मग मांगईचं मॅन्गो करणारांनी मुंबईचं बॉम्बे कसं केलं तेही कळलं.

तीच कहाणी सूपची. सूप म्हणजे हॉटेलमधे जाऊन, चकचकीत मेन्यूकार्डावरची जिव्हालौल्य वाढवणारी नावं वाचून, बाऊलमधून आलेलं कळण-कढण प्यायची गोष्ट. पण धक्का बसला तो महाभारत वाचतांना! विराट राजाच्या पदरी अज्ञातवासात राहायला जाणाऱ्या पांडवांपैकी भीमाने बल्लव म्हणजे आचारी होऊन राहायचं ठरवलं. आणि तो सगळ्यांना भावांना म्हणाला की, ‘‘ सूपानस्य करिष्यामि । कुशलोऽस्मि महानसे। ’’ भीम पाककलेत निपुण तर होताच पण आताच्या भाषेत सांगायचं तर सूप हे त्याचं स्पेशलायझेशन होतं. तऱ्हतऱ्हेची सूपं बनवून तो विराटराजाला खूष करणार होता. म्हणजे आमचा मूळ सूप हा संस्कृत शब्द त्यांनी पळवला ? की नेहमीप्रमाणे आम्ही अनास्थेने घालवला आणि त्यांनी जपून ठेवला ?

त्या क्षणी एक चित्र डोळ्यांसमोर तरळलं...ते म्हणजे कमरेला पंचा गुंडाळून चुलीसमोर घामाघुम झालेला भीम मुदपाकखान्यात एका मोठ्या रांजणात सूप ढवळत बसलाय, विराटराजा सोन्याच्या वाटीतून चांदीच्या चौरंगावर बसून सूप पितोय आणि दुसरीकडे इंग्लंडमधल्या हॉटेलात डोक्यावर उंच शेफची कॅप घालून थाटात तिथला स्वच्छ शेफ सूप ढवळतोय आणि टेबलावर बसून इंग्रज चमच्याने सूप पितोय. आपले लोक मूळचे उत्तर ध्रुवावरून निघाले आणि जगभर पसरले, या लोकमान्य टिळकांच्या विधानाला पुष्टी देणारंच झालं हे!

निर्लेपच्या तव्याचं कोटिंग कमी झालं तेव्हाची गोष्ट. ते लावून घ्यायला दुकानात जाऊन दुकानदाराला म्हटलं की जरा जाड थर लावा हं! पुढची दहा वर्षे तरी ते जाता कामा नये अगदी वज्रलेप झाला पाहिजे. वज्रलेप म्हणजे काय? त्या दुकानदाराने विचारलं. वज्रलेप म्हणजे कधीही न निघणारा. अजंठाच्या लेण्यांमधल्या चमकदार मूर्तींना दिलाय तो! तेवढ्यात त्याच्याकडे दुसरं गिऱ्हाईक आलं आणि तो दुकानदार त्या वाक्याला क्षणभरही चिकटला नाही. ती लेणी पाहतांना ती अपौरूषेय तर वाटतातच पण तो वज्रलेप बनवायच्या कृतीचा वेध घेतला तर ती कृती शोधून काढणाऱ्यांना शंभर नोबेल पारितोषकं दिली तरी ती कमी पडतील असं वाटलं.

वज्रलेप बनवण्यासाठी लागणारं साहित्य म्हणजे समुद्रातून शिंपले आणायचे. त्यात त्या भागातली माती, गाळाची माती, वारुळातली माती, चुना, धान्यांचं तूस, घायपाताचं किंवा गव्हाचं काड, बेलफळ, गुळाची मळी एवढं घालून मिसळायचं. नंतर ते मिश्रण तीन तीन दिवस असं वीस दिवस फिरवायचं. नंतर बनतो तो वज्रलेप. तो लेप मग पाषाणाच्या मूर्तींना लावायचा. म्हणजे त्यावर मोत्यासारखी झळाळी चढते. नंतर त्यावर रंग लावला की तो पक्का बसतो. तोच रंग आजवर टिकलाय. म्हणून त्या मूर्ती इतक्या सुंदर दिसतात.

व्यासपीठ. भाषणासाठी कार्यक्रमासाठी व्यासपीठ हवंच! पण त्याचा खरा अर्थ आहे तो वाचतांना पुस्तक ठेवण्यासाठी केलेला स्टँन्ड. मोठे ग्रंथ वाचणं कठीण होऊ नये म्हणून अर्धवट दुमटलेल्या आकाराची लाकडी बैठक असे ते व्यासपीठ.

असे कितीतरी शब्द! अजूनही आपण वापरतो, आणि नेमका अर्थ काढतो. अगदी ते कालबाह्य झाले असले तरी. नवीन शब्दही जन्म घेत असतात. मग आपण म्हणतो की मराठी भाषा समृद्ध आहे. कारण त्यात खूप शब्द आहेत. पण तरी इतक्या समृद्ध भाषेत समुद्रात पोहणाऱ्या जीवाला मासा शब्द असला तरी त्याच्या मादीला शब्द नाही आणि दुसरीकडे मिठाईवर, तोंडावर

बसणाऱ्या माशी बाईला सगळे पहातात आणि ओळखतात पण तिच्या नराला काहीच शब्द नाही हा विचार कानात-मनात सारखा घोंघावत राहतो, जेव्हा मासा-मासी, आणि माशी-माशा दोन्हीही चूक निघतं तेव्हा. तसंच कावळा आणि कावळी असे तरी शब्द कुठे आहेत? कावळा शब्द नेहमी पुल्लिंगी आणि कबुतर शब्द नेहमीच नपुंसकलिंगी..

असे कितीतरी शब्द, ज्यांचा अर्थ माहीत नाही. अशा शब्दाचा अर्थ कुणी विचारला तर प्रत्येक वेळी - हे मला माहीत नाही - असंच म्हणावं लागतं.

# मोहाची फुलं.

रोजच्या सारखं किराताने रत्नाला उठवलं. रोजच्यासारखं रत्नाकर झोपून राहिला. रोजच्यासारखी रत्नाची आई त्याला रागावली. रोजच्यासारखे रत्नाकरचे भाऊ शिकारीला निघून गेले. किरातानेही नाद सोडला आणि तो मासे पकडायला निघून गेला. संध्याकाळच्या जेवणाची तयारी ससे माहीतर मासे मिळाले तरच होणार. घरातील सगळी निघून गेल्यावर रत्नाकर आरामात उठला. त्याच्या आईची बडबड चालूच होती.

‘‘ तू कामाला कधी जाणार ? “

‘‘ मला मासे जाळयात अडकण्याची वाट पाहात बसायला कंटाळा येतो. ‘‘

‘‘ मग भावांबरोबर शिकारीला का जात नाहीस ? “

‘‘ जनावरांच्या मागे धावायचा मला कंटाळा आहे.

‘‘ मग तुझ्या कुटुंबाला जेवायला काय घालणार ?

‘‘ लग्न झालं की पाहीन. ‘‘

आई गप्प बसली. तापट डोक्याच्या रत्नाकरशी बोलायला कुणी तयारच नसायचं. एक आई बोलते तेवढंच खूप होतं. घरातला कामाचा गाडा ओढून ती पार दमून जायची. तिला फक्त रत्नाचीच काळजी होती. तरूण झाला तरी तो कामाला जात नव्हता. वस्तीती लोकांशीही वैर घेत होता.त्यावरूनही घरात रोज भांडणं होत होती. एक दिवस मात्र स्फोट झाला. रत्नाने संतापून घर सोडून जायची धमकी दिली. किराताने शांतपणे त्याला म्हटलं,

‘‘ जरूर बाहेर पड. तुझ्या पोटातली आग तुला कामाला लावेल. पण एक लक्षात ठेव. निसर्गाने जंगलात खायला भरपूर दिलंय! पण मोहाची फुलं मात्र खाऊ नकोस. त्याने नशा चढेल.

एकदा ती नशा चढली की मन आणि बुध्दी निबर करून टाकेल. मग त्यातून तुझी सुटका होणार नाही. “

रत्नाने लक्ष दिलं नाही. मोहाची फुलं खाण्याची वेळच येणार नाही. जंगलात खूप आहे खायला. रत्ना तिरसटून बाहेर पडला. नुसता वणवण हिंडला. पोटात आग लागल्यावर भानावर आला. दिसतील ते कंद खाऊन झोपला..झऱ्याचं पाणी प्यायला. हिंडत राहिला. चार दिवस गेले. आता त्याला सवय झाली. जंगल त्याला नवीन नव्हतं. नवीन होतं ते एकट्याने राहणं. एक दिवस हिंडता हिंडता जंगलाच्या बाहेर आला. दमून एका झाडाखाली बसला. त्याने पाहिले, एक नागर पायवाटेने चालला होता. रत्नाने त्याला पाहिलं. कुठे चालला असेल हा नागर? नागरानेही त्याला पाहिलं. तो मनोमन घाबरला. त्या भिल्लाच्या जाडजूड मिशा उग्र चेहरा बघून नागर भ्याला. रत्नाने त्याला गाठलं. नागर भेदरला. ते भाव पाहून रत्नाला मोठी मजा वाटली. असा सोज्वळ चेहरा त्याने आपल्या वस्तीत पाहिला नव्हता कधी..

‘‘ काय आहे पोत्यात? ‘

‘‘ धान्य …गावच्या बाजारला विकायला चाललो होतो. ‘‘

‘‘ आण ते इकडे “ नागराने पटकन पोतं त्याच्या हातात ठेवलं. रत्नाला मोठी गंमत वाटली. का घाबरला हा आपल्याला? त्याला कळेना..पण नुसत्या आवाज चढवण्याने त्याच्या हातात धान्याचं पोतं पडलं होतं. रत्नाकर खूष झाला. ते पोतं घेऊन घरी आला. आईसमोर ठेवून, कमावलं आहे मी हे असं म्हणाला. आई चकित झाली. तिने ते शिजवलं आणि त्याला खायला घातलं, पण घरातल्या कुणीही त्या अन्नाला हात लावला नाही. रत्नाच्या लक्षात ते आलं पण त्याला फिकीर नव्हती. मोहाचं पहिलं फूल त्याने पचवलं होतं. त्या नागराच्या डोळ्यातले लुटले गेल्याचे दुःखी भाव त्याला रात्री त्रास देत होते. पण ते एकच दिवस! ते धान्य संपल्यावर रत्ना परत जंगलात गेला, नागरांना लुटून घरी आला. मग असं होतंच गेलं.

रत्नाची कमाई वाढायला लागली. रत्ना निबर होत गेला. रत्नाचं लग्न झालं. किराताने त्याला वेगळं बिऱ्हाड करून दिलं. रत्नाची आता त्याच्या वस्तीतही जरब बसली. एक दिवस रत्ना नेहमीप्रमाणे कमाईला गेला. समोरून एक वाटसरू चाललेला त्याला दिसला. पण त्याच्या अंगाखांद्यावर काहीच नव्हतं. रत्नाने त्याला अडवलं.‘‘ जे काही असेल ते काढ..‘‘

‘‘ माझ्याजवळ तुला देण्यासारखं काहीच नाही..माझ्याजवळ फक्त ज्ञान आहे, ते तू ओरबाडून घेऊ शकत नाहीस..‘‘ मधुर आवाजात वाटसरू म्हणला.

‘‘ जे असेल ते काढ, नाहीतर तुला मारून टाकीन..

‘‘ मला मारूनही तुला काहीच मिळणार नाही. करशील मला मारायचं पाप ? ‘‘

‘‘ रत्ना चमकला. असं उत्तर त्याला कधी मिळालं नव्हतं..

‘‘ कुटुंबाला खायला घालायला मी करतो हे !

‘‘ नाही. कष्टाने ते मिळवता येतं. हे पाप आहे.. कुणी आहे तुझं या पापात वाटेकरी ?

रत्ना चमकला. हडबडला. घरी गेला. बायकोला विचारलं तर ती म्हणाली, माझ्या लेकरांना खायला घालणं हे माझं काम. ते मी ममतेने, निष्पाप मनाने करते. तुमचं पाप तुमच्यापाशी..

रत्ना मग किराताकडे गेला..तुझ्या मार्गाने जाणं आम्हाला शक्य नव्हतं. पापी मनाने आम्ही झोपू शकत नाही.. तुला आम्ही पहिलेच दिवशी सांगितलं होतं, आठवतं ? मोहाचं फूल खाणं पाप आहे. जे खाशील त्यातूनच शरीर बनतं, विचार बनतात. नशा चढणं चांगलं नाही. रत्ना परत जंगलात आला. त्या ऋषींचे पाय धरले. सत्मार्गाला लावण्याची विनंती केली.

‘‘ चल माझ्याबरोबर.. नारद म्हणतात मला..

रत्नाकर त्यांच्याबरोबर गेला. शंकराचं तप करून पवित्र झाला, ज्ञानी झाला..ऋषी झाला. शंकराने आशीर्वाद दिला, तुझ्या हातून अमर काव्याचा जन्म होईल..

सकाळचं वर्तमानपत्र वाचून रत्नाकर बेचैन झाला. ऑफीसमधे गेल्यावरही त्याचं विस्कटलेलं मन ताळ्यावर आलं नाही. काम सोडून घरी आला. चहा पितांना आईला कळवळून म्हणाला,

‘‘ आई, आपल्या खापर खापर खापर पणजोबांनी लोकांना लुटलं, पण मग ते सोडून तप केलं आणि ऋषीपद मिळवलं ना ? आज बघ.. काही स्त्रियांना पैसे खाण्याबद्दल अटक झाली आहे.

त्या आपल्या मुलांवर काय संस्कार करणार? कुणाला तरी नाहक लुटलंच ना त्यांनी? कसं असेल त्यांच्या घरातलं वातावरण?

‘‘ वाल्मिकी एकदाच झाला बाळा.. नारदही एकदाच झाले..ते तरी परत कुठे जन्मले.. संस्काराचं महत्व राहिलंय कुठे आता? संस्कारांवरच अंत्यसंस्कार झालेले आपण पाहतो आहोत ना?

रत्नाकरची आई शबरी थरथरत्या आवाजात म्हणाली. रत्नाला त्यांच्या घरात पिढ्यान् पिढ्या चालत आलेला उपदेश आठवला. मोहाची फुलं वाईट आधी मोहात पाडतात, मग नशा चढवतात, मग मन आणि बुध्दी निबर करतात..त्याच्या अतिसेवनाने मनाला कोड येतं.. ‘‘

रत्नाकर विचारात पडला. आपण नागर झालो की नागर जंगली झाले? त्याला काहीच कळेना! मोहाची झाडं उगवतातच आहेत! त्याच्या सावलीत नागर बसतातच आहेत..

- ------------------------------–

रामायणमधे वाल्मिकी ऋषींचं पूर्वेतिहासातलं नाव रत्नाकर आहे, पण पुराणात त्यांची जन्मकथा वेगळी आहे. त्यात भृगुकुलातील सुमति नावाच्या ऋषींचे ते पुत्र होते. एकदा त्यांची गर्भवती असतांना पत्नी जंगलात गेलेली असतांना दमून एका वृक्षाखाली बसली..तिथून जाणाऱ्या लोकांनी तिला पाहिलं आणि आपल्याजवळची फळं खायला दिली. त्यांनी दिलेल्या त्या फळांचा तिच्या गर्भावर संस्कार झाला. त्यांना जो पुत्र झाला, त्याचे नाव अग्निशर्मा.. पण तो लहानपणापासून चोऱ्या करायला लागला. तेव्हा सुमति ऋषींनी आपल्या दिव्य दृष्टीने त्याच्या या बुध्दीचा शोध घ्यायचं ठरवलं. तेव्हा अग्निशर्मावर चोरांनी दिलेल्या अन्नाचा संस्कार झालेला दिसला. लुटमार करणाऱ्या अग्निशर्माला सप्तर्षी भेटतात आणि त्याला सन्मार्गावर आणतात.

भारतीय संस्कारांमधे अन्नातूनही संस्कार विचार वृध्दी होते असा उपदेश दिला आहे.

# बिल्डर देता का बिल्डर.

घर देता का घर?

वि. वा. शिरवाडकरांचं, नव्हे, नटसम्राट बेलवलकरांचं हे वाक्य मराठी साहित्यात अजरामर झालं, जसं शेक्सपियरचं टू बी, ऑर नॉट टू बी झालं. नटसम्राटांचा तो दयनीय काळ आता गेला. सरकारी राखीव कोट्यातली घरं त्यांना मिळतात. स्वतःचे बंगले असतातच. कुठे ना कुठे सारखे झळकत असतात. त्यांच्याही घरांवर आता प्राप्तीकर खात्याच्या धाडी पडायला लागल्या आहेत. व्याख्यानं, सूत्रसंचालन, मुलाखती, ब्रँड ॲम्बॅसिडर बनतात. खरं तर पैसा आता सगळेच मिळवतात. सरकारी बाबू, राजकारणी, बांधकाम क्षेत्रातले, देवळं काढणारे, विद्यापीठं काढणारे, वास्तुशास्त्रातले, फेंग शुईतले, ज्योतिष सागणारे. सगळेच पैका खूप कमावतात. कॉलेजमधे विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी आणि खासगी क्लासमधे जास्त! नोकरीतला पगार कमी, तरी उत्पन्न जास्त. मग तो पैसा उघड्या जागेत ठेवता यावा म्हणून घरांमधे अडकतो. रस्त्यावरच्या त्यांच्या घरातील एक चौरस फूट फरशी कुणी नेली तरी त्याला १०,००० रुपये मिळणार नसतात. मग त्यांना बिल्डरची गरज लागते. त्यामुळे जमिनीतून पीक उभं राहावं तसं कॉम्प्लेक्सची, नगराची भुईछत्रं उभी राहायला लागली. जंगलं साफ व्हायला लागली. पर्यावरण नासायला लागलं.

आता जरूरी आहे, एका वेगळ्याच बिल्डरची. एका मोठ्या भूखंडावर आमची ही इमारत उभी आहे.

मोठ्या नावलौकिकाची आहे. जगप्रसिध्द आहे. या वास्तूत थोर संशोधक, विद्वान पंडित, अलौकिक प्रतिभेचे लेखक, कवी, गायक, संगीतकार, वादक, खगोलशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, गणिती राहात असत. देशोदेशीचे पर्यटक ही इमारत पाहायला येत, काही काळ मुक्काम करत, आणि परत जायचं नावंच घेत नसत. त्यांनी इथेच आपले संसार थाटले. त्यांना ही वास्तू फारच लाभली म्हणे! शेवटी अतीच झालं तेव्हा या घुसखोरांना घालवायला इथल्या तरुणांचे बाहू

स्फुरायला लागले. भूखंडावरचे मूळचे नागरिक पुढे झाले. या इमारतीवरचं बांधकाम हटवण्यासाठी झगडे झाले, कोर्टकचेऱ्या झाल्या. तुरूंगवास घडले, पण मुलं बधली नाहीत. काहींनी लाठ्या खाल्या, काही दोराला लटकले, काहींनी गोळ्या झेलल्या पण प्रयत्न सोडले नाहीत. शेवटी ते अतिक्रमण करून राहिलेले गेले एकदाचे. मग आमच्या तरुणांना नवीन इमारत बांधायची होती.

'' वंदे मातरम्च्या '' जयघोषात पायाभरणी झाली. इमारत सुंदर करायच्या स्वप्नांनी भारले. आपली इमारत खूप उंच असावी, ती इमारत कशी सुंदर दिसेल या विचाराने कामाला लागले. त्यांना या इमारतीत भरपूर हवा खेळती ठेवायची होती. शेतात मुबलक धान्य पिकवायचं होतं, पाणी खेळवायचं होतं, समृध्दी आणायची होती. रोटी कपडा मकान इथल्या प्रत्येक तरुणाच्या वाट्याला आलंच पाहिजे ही त्यांची उर्मी होती. या तरुणांना ना नोकरी होती, ना त्यांच्याकडे पैसा होता, होती फक्त भव्य स्वप्नं. कष्ट करण्याची अमाप उर्जा..सर्वजण कामाला लागले. इमारतीत शिस्त असावी म्हणून त्यांनी नियमावली केली. कुणी जमा खर्चाचा हिशेब मांडायला घेतला. हळूहळू इमारत उभी राहायला लागली. तरुणांना छोट्या छोट्या खोल्या मिळाल्या. कुणी त्या लाल रंगाने, कुणी भगव्या रंगाने, कुणी हिरव्या, कुणी निळ्या रंगाने रंगवल्या. रंग कोणता का असेना इमारत सुंदर झाली पाहिजे एवढाच ध्यास होता. इमारतीचे मजले वरवर चढायला लागले. मुलांना आनंदी ठेवायला प्रत्येक घरातला कर्ता पुरुष झटायला लागला. या खपणाऱ्यांना स्वार्थाचा लवलेश नव्हता.

दिवस सरले. तरुण प्रौढ झाले. बालकं मोठी झाली. त्यांना शिंगं फुटली. इमारतीच्या गंगाजळीत असलेला पैसा दिसायला लागला. तो घरी न्यायच्या लोभाला कोंब फुटले. कुरबुरी वाढल्या. गुंडगिरीने सगळं साध्य होतंय, ही मागची पापभीरू पिढी घाबरतेय हे लक्षात आल्यावर इमारतीत गुंडांची वर्दळ वाढली. ते पाहून पापभीरू, सरळमार्गी होते, त्यांनाही हा नवीन मार्ग खुणावू लागला. त्यांचीच सत्ता आली. वशिलेबाजीने कामं होतात हे पाहिल्यावर नीतीचे धडे पाठ करायचा अभ्यास बंद झाला. तो मार्ग धुळीखाली गेला. दिसेनासा झाला.

एके काळच्या विचारांवर आधारलेले खोल्यांना दिलेले मूळ रंग इतक्या वर्षांच्या नंतर उडायला लागले. आदर्शचा रंग देण्यापेक्षा नोटपेपर लावलेली भिंत जास्त छान दिसते, अशी नवीन पिढीतील तरुणांची खात्री झाली. नवीन जागा शोधण्यापेक्षा बापाच्याच खोलीत दाटीवाटीने राहायला लागले. कारण त्या जागेचं मोल त्यांना कळलं होतं. कुणी जिन्यातले सात्विकतेचे दिवे

पळवले. इमारतीत अंधारल्यासारखं वाटायला लागलं. अंगणात निष्ठा, तत्त्व, आदराचे पोपडे उडले. भ्रष्टाचाराच्या घुशींनी पाया पोखरला. स्वार्थाची छोटी छोटी पिंपळरोपं कायद्याच्या फटीतून डोकावू लागली. इथली हुशार मुलं उंच भरारी घेणं या इमारतीत शक्य नाही हे कळल्यावर शेजारच्या चकचकीत घरात राहायला गेली. कारण इथे कुणाला कष्ट नकोत. हवा फक्त पैसा.. मिळेल त्या मार्गाने, दुसऱ्याला ओरबाडून..नाहीतर सरकारी खजिन्याला लुटत.. इथला बालक स्थूल झालाय, व्यसनांमुळे तरुण रोगी झालाय, प्रौढ संवेदनाहीन झालाय..अचानक परकी आक्रमण झालं तर सैन्यात भरती होण्यासारखी किती मुलं शिल्लक असतील हा प्रश्न फक्त शहाण्याला भेडसावणारा आहे.

या इमारतीला आता नवीन बिल्डर हवा आहे. इमारतीत ठायी ठायी बोकाळलेल्या आरक्षणाच्या खुर्च्या फेकून देणारा, भ्रष्टाचाराची बिळं बुजवणारा, ज्ञानप्रकाशाच्या खिडक्या उघडणारा.. संशोधनाला प्रशस्त वाट करून देणारा, शेजारच्या इमारतीत राहायला गेलेल्या आपल्या मुलांना जागा करून देणारा..

नवीन पिढीच्या वाह्यात उपद्व्यापांनी हैराण, असहाय झालेल्या जुन्या भाडेकरूंना एक नाव कळलंय.. ‘ भगवंत डेव्हलपर ‘ ...त्याच्या माहितीपत्रकावर छापलंच आहे, ... ‘ संभवामि युगे युगे ‘ त्याची सगळे वाट पाहात बसलेत..

तो अशा कामात खूप हुशार आहे म्हणे..कधीतरी तो येईलच..

# ई साहित्य प्रतिष्ठान

इंग्लंडची लोकसंख्या सहा कोटी आहे. आणि महाराष्ट्राची बारा कोटी. इंग्लीश वाचकांची संख्या आहे शंभर कोटी. आणि मराठी वाचक? कुठे आहेत वाचक? कुठे आहे आपली भाषा जगाच्या नकाशावर? कुठे आहोत आपण?

आमची मायबोली जागतिक दर्जाची भाषा आहे! तिला तो मान जगभरातून मिळायला हवा. आणि बाहेरच्यांनी मान देण्यापुर्वी आपण तो द्यायला हवा. माझा मराठाची बोलु कवतुके... अमृतातेही पैजा जिंके.... माउलींनी दाखवलेलं स्वप्न पूर्ण करू तरच आम्ही शिवबाचे मावळे.

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www.esahity.com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 या नंबर ला Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. download करा.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

टीम ई साहित्य